पुणे, मंगळवार, ११ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 104 • वर्ष ४ थे, अंक १०४ • किंमत ₹ ६ • पाने : १२

राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News

लाडक्या बहिणी मिळाल्या आणि आम्ही धन्य झालो, बारा कोटी प्रियजनांना मान्य झालो. विकासाची केली कामे म्हणून आम्ही पुन्हा आलो... पुन्हा आलो....

महाराष्ट्र... आता थांबणार नाही

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा निर्धार

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.

अजित पवार यांनी महायुती सरकारचा पहिलाच पूर्ण अर्थसंकल्प सोमवारी विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे ३५० वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत, याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.

» पान ७ वर



कृषी

कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७%

कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक ३.३% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरीता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिंचन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.

गृहनिर्माण

नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करणार

राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे. दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे. सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

आरोग्य सेवा

५ किलोमिटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा

राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला ५ किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

शिक्षण

मुलींचा व्यावसायिक शिक्षणात सहभाग वाढविणार

मुलींचा व्यावसायीक शिक्षणातील सहभागासाठी शिक्षण व परिक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अमंलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायिक शिक्षणात सहभाग वाढविण्या करीता शिक्षण व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

क्रीडा

क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजना

राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे.

तीर्थक्षेत्र

तीर्थक्षेत्र विकासासाठी भरीव तरतूद

राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध रके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे.

रोजगार

जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे.

म्हणून आम्ही पुन्हा आलो...

विकासकामांमुळे महायुतीला यश, अजित पवारांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्राचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी मांडला. अर्थसंकल्पीय भाषणात अजित पवार यांनी विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेले यश दाखवले. त्यासाठी लाडक्या बहिणींचे आभार मानले. अजित पवार म्हणाले, लाडक्या बहिणी मिळाल्या आणि आम्ही धन्य झालो, बारा कोटी प्रियजनांना मान्य झालो. विकासाची कामे केली म्हणून आम्ही पुन्हा आलो पुन्हा आलो असे अजित पवारांनी कवितेच्या मार्गातून सांगितले.

अजित पवार म्हणाले, सन २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र व्हावे हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी आम्ही काम करणार आहोत.

» पान ७ वर

औद्योगिक धोरण जाहीर करणार

औद्योगिक धोरण २०२५ लवकरच जाहीर करू. त्यानुसार २० लाख कोटी गुंतवणूक आणि ५० लाख रोजगाराच्या निर्मितीचे लक्ष असणार आहे. चक्रीय अर्थव्यवस्थेसाठी स्वतंत्र क्षेत्रीय धोरण तयार करण्यात येणार आहे. नवीन कामगार नियम तयार करण्यात येणार आहे असे अजित पवार यांनी म्हटले. केंद्राने आयकरात सूट देत मध्यमवर्गीयांना दिलासा दिला.

विकसित महाराष्ट्राच्या दिशेने

मुंबई : शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, विकसित भारत-विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे.

महसुल तूट उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी :

राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची

» पान ७ वर

शिवसृष्टीसाठी आणखी ५० कोटी देण्यात येणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : मुघलांच्या नजरकैदेतून आग्र्याहून सुटका हा शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग आहे. छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल, अशी माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

येणाऱ्या पिढ्यांना शिवरायांच्या स्फुर्तीदायी चरित्राची ओळख अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे करुन देण्यासाठी पुणे शहरातील आंबेगांव येथे चार टप्प्यात भव्य शिवसृष्टी प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यातील दोन टप्प्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम गतीने होण्यासाठी राज्य शासनाकडून आणखी 50 कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

येणाऱ्या पिढ्यांना शिवरायांच्या स्फुर्तीदायी चरित्राची ओळख अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे करुन देण्यासाठी पुणे शहरातील आंबेगांव येथे चार टप्प्यात भव्य शिवसृष्टी प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यातील दोन टप्प्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम गतीने होण्यासाठी राज्य शासनाकडून आणखी 50 कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे अर्थमंत्री म्हणाले.

छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या रक्षण आणि विस्तारासाठी जीवन समर्पित केलेल्या, असीम शौर्य आणि धैर्याने लढलेल्या, सर्व लढायांत विजयश्री

» पान ७ वर

मेट्रोसाठी निधीचा उल्लेख

पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका या प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. पुणे मेट्रो टप्पा टप्पा-२ अंतर्गत खडकवासला – स्वारगेट – हडपसर – खराडी आणि नळ स्टॉप – वारजे – माणिकबाग या दोन मार्गिकांचा ९ हजार ८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे", अशी माहिती अजित पवार यांनी दिली आहे.

#रा

एसटी बसस्थानकातील सुरक्षा 'रामभरोसे'...!

महिलाच ' निशाण्यावर'; त्रिसदस्यीय समितीचा धक्कादायक अहवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : स्वारगेट बसस्थानकात पिडितेवर घडलेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर आता धक्कादायक माहिती उघडकीस येऊ लागली आहे, त्यासाठी नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने त्यासंदर्भात केलेल्या लेखापरिक्षणात एक धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. त्यामाध्यमातून जिल्ह्यातील १४ आगारातील ४२ बसस्थानकांमध्ये सुरक्षा ' रामभरोसे' असून त्यामध्ये महिला आणि तरुणीच ' निशाण्यावर' असल्याचे दाहक वास्तव उजेडात आले आहे. त्यामुळे या सर्व ठिकाणी महिला सुरक्षारसक्षकांची नेमणूक करावी, असे स्पष्ट आदेश या समितीने दिले आहेत.

सध्या या बस स्थानकांमध्ये एकही महिला सुरक्षारक्षक नसल्याने प्रमुख बस स्थानकांमध्ये प्रत्येकी सहा आणि अन्य बस स्थानकांत दोन ते तीन महिला सुरक्षारक्षक नेमण्याचे या अहवालात सुचविण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या निर्देशानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह ग्रामीण

भागातील 'एसटी' महामंडळाच्या १४ आगारांमधील ४२ बस स्थानकांचे सुरक्षाविषयक लेखापरीक्षण करण्यात आले असून, संबंधित अहवाल ४ मार्च रोजी राज्य सरकारकडे पाठविण्यात आला. या अहवालात स्वारगेट, वाकडेवाडी आणि बारामती या प्रमुख स्थानकांमध्ये सुरक्षायंत्रणेत अभाव असल्याचे स्पष्ट करण्यात आले. स्वारगेट आणि वाकडेवाडी या वर्दळीच्या बस स्थानकांमध्ये केवळ प्रत्येकी २३ सुरक्षारक्षक आणि २४ सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, तर बारामती शहरातील बस स्थानकात ४२ सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. उर्वरित ग्रामीण भागातील प्रत्येक बस

स्थानकामध्ये आठ सीसीटीव्ही यंत्रणा असून, ती वाढविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ४२ स्थानकांमध्ये १८० सुरक्षारक्षक आहेत. हे सुरक्षारक्षक खासगी एजन्सीद्वारे नेमण्यात आले असून, त्यामध्ये एकही महिला सुरक्षारक्षक नाही. त्यामुळे प्रत्येक बस स्थानकात महिला सुरक्षारक्षक नेमाव्यात. प्रमुख बस स्थानकांमध्ये प्रत्येकी सहा आणि इतर बस स्थानकांत दोन ते तीन महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक करावे, अशी शिफारसही करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४२ बस स्थानकांत ४० सीसीटीव्ही, ४० अतिरिक्त सुरक्षारक्षक आणि सुरक्षाभिंती वाढविण्याबाबतच्या शिफारशीही करण्यात आल्या आहेत.

'सुरक्षा भिंतींची उंची वाढवावी'

ग्रामीण भागातील नारायणगाव, इंदापूर, भोर, दौंड, बारामती, एमआयडीसी शिरूर, वल्लभनगर, मंचर, राजगुरूनगर, तळेगाव दाभाडे आणि सासवड या आगारांत ३५ हून अधिक बस स्थानके आहेत. त्यांपैकी अनेक बस स्थानकांमध्ये सुरक्षाभिंतींची दुरवस्था झाली असल्याचे तपासणी आढळून आले आहे. अनेक सुरक्षाभिंतीची उंची अपेक्षापेक्षा कमी आहे. त्यामुळे स्थानकात भटक्या कुत्र्यांचा, प्राण्यांचा वावर जास्त असून, प्रवाशांचे सामान चोरी होण्यासारख्या घटना घडत असतात. बस स्थानक परिसरात खासगी प्रवासी वाहनांची वाहतूक होत असते, त्यामुळे अपघात होण्याची संभावना नाकारता येत नाही. त्यामुळे सुरक्षा भिंतींची उंची वाढवून वेळोवेळी दुरुस्ती आणि देखभाल व्हावी, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे

> सुरक्षाविषयक लेखापरीक्षण अहवालानुसार अनेक प्रमुख बस स्थानकांमध्ये सीसीटीव्ही आणि सुरक्षारक्षकांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी असल्याने ही यंत्रणा वाढविण्याबाबतच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. बस स्थानकांतील प्रवाशांच्या वर्दळीनुसार सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जात आहेत. राज्य सरकारकडून मंजुरी मिळताच तातडीने सुरक्षा वाढविण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.
>
> **-प्रमोद नेहूल, –** विभाग नियंत्रक, 'एसटी'महामंडळ, पुणे

- सर्वच बसस्थानकांमध्ये महिला सुरक्षारक्षक आवश्यकच
- सीसी टीव्ही कॅमेर्यांची संख्या वाढवावी
- सीमा भिंतीची उंची वाढवावी
- भटकी कुत्री, प्राण्यांच्या वावरावर बंधने घालावीत
- खासगी प्रवासी वाहतूकीच्या दलालांना आळा घालावा
- सीमाभिंतीची सातत्याने देखभाल व दुरुस्ती व्हावी
- वीज गेल्यानंतरही सीसी टीव्ही यंत्रणा कार्यान्वित असावी

'अभय' देऊनही वीजग्राहक 'निर्भयच'

पुणे प्रादेशिक विभागात पाच जिल्ह्यांमध्ये ३१० कोटी ८४ लाख रुपयांची थकबाकी

प्रत्येकाच्या जीवनात वीज ही काळाची गरज निर्माण झाली असून देशातील प्रत्येक नागरिकांना वीजेशिवाय पर्याय नाही, त्यामुळे महावितरण प्रशासनाच्या वतीने काही अपवाद वगळता सर्व प्रकारच्या ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून त्यामध्ये बहुतांशी प्रमाणात यश येत आहे. मात्र; बहुतांशी ग्राहक वीजबील भरण्यासाठी टाळाटाळ करत असल्याने महावितरणला त्याचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, त्यातूनच खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ बसविताना प्रशासनाल तारेवरची कसरत करावी लागत आहे. विशेष म्हणजे त्यासाठी प्रशासनाने अनेक लाभदायी योजना जाहीर करुनही त्याचा फारसा उपयोग झालेला नाही, ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच आहे.

> गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत थकबाकीचा आकडा वाढत असल्याने प्रशासनाच्या वतीने वसूलीची मोहिम राबविण्यात आली, त्यामध्ये समाधानकारक यश आले असले तरी ही थकबाकी आणखी कमी करण्याचा प्रशानाचा प्रयत्न आहे. त्यामुळे ग्राहकांनीही या मोहिमेत सहभागी होउन थकबाकी भरण्याची आवश्यकता आहे.
> राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, महावितरण, पुणे परिमंडल
>
> **-राजेंद्र पवार,** मुख्य अभियंता महावितरण, पुणे परिमंडळ.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : गेल्या काही वर्षांच्या कालावधीत महावितरणच्या थकबाकीदार ग्राहकांच्या थकबाकीचा टक्का चांगलाच वाढला आहे, त्यातूनच महावितरणचा आर्थिक डोलारा कोसळत आहे. त्यामुळे या वसूलीसाठी प्रशासनाने थकबाकीदार ग्राहकांसाठी ' अभय' योजना राज्यभरात सुरु केली. मात्र; तरीही हे थकबाकीदार ' निर्भय' असून त्यांनी या योजनेला अपेक्षित प्रतिसाद न दिल्याने थकबाकीचा टक्का चांगलाच वाढला आहे. धक्कादायक बाब म्हणजे पुणे प्रादेशिक विभागातील थकबाकी तब्बल ३१० कोटी ८४ लाखांवर जाऊन पोचली आहे. त्यामुळे प्रशासनाचे आर्थिक चाक 'पंक्चर' झाले आहे.

आर्थिक अडचणीत असलेल्या महावितरणकडून घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई सुरू असून गेल्या ३५ दिवसांच्या कालावधीत ५१ हजार ७३५ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

यासोबतच थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांच्या तपासणीचे काम स्वतंत्र पथकांद्वारे सुरु आहे. यामध्ये शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून थकबाकीदार विजेचा वापर करीत असल्याचे आढळल्यास शेजारी व संबंधित थकबाकीदारांविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५/१३८ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

थकीत वीजबिलांपोटी वीजपुरवठा खंडित करणे व खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे सर्व अभियंता, अधिकारी, कर्मचारी सध्या 'ऑन फिल्ड' आहेत. पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंते सर्वश्री राजेंद्र पवार (पुणे), स्वप्निल काटकर (कोल्हापूर) व धर्मराज पेठकर (बारामती) उपविभाग व शाखा कार्यालयांना भेटी देऊन थकबाकी वसूलीचा आढावा घेत आहेत. वीजबिल थकीत असेल तर नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरु आहे. त्यामुळे थकबाकी तसेच चालू वीजबिलांचा भरणा करून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

वीजग्राहकांना केव्हाही व कुठूनही ऑनलाइनद्वारे थकीत व चालू वीजबिल भरण्याची सोय www.mahadiscom.in या वेबसाईटवर तसेच महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध आहे. सोबतच ५ हजार रुपयांपेक्षा अधिक बिल असणाऱ्या सर्व लघुदाब ग्राहकांना आरटीजीएस किंवा एनईएफटीद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.

असा वाढलाय थकबाकीचा टक्का

- पुणे जिल्हा: १९९ कोटी ९९ लाख रुपये
- सातारा- २० कोटी ४० लाख रुपये
- सोलापूर- ४४ कोटी ७ लाख रुपये
- कोल्हापूर- २० कोटी ८० लाख रुपये
- सांगली जिल्ह्यात २४ कोटी ९५ लाख रुपये
- गेल्या ३५ दिवसांमध्ये ५१ हजार ७३५ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित

विद्यापीठातील महत्त्वाची सर्व पदे प्रभारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे विद्यापीठातील सर्व महत्वाची पदे भरण्यास विद्यापीठाकडून दिरंगाई केली जात आहे. ही पदे का भरली जात नाहीत याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सर्वच्या सर्व चारही अधिष्ठाता पदे प्रभारीच आहेत. त्याप्रमाणेच विद्यापीठाचे प्रशासकीय प्रमुख असलेले कुलसचिवपदही प्रभारीच आहे. विद्यापीठातील महत्त्वाची सर्व पदे प्रभारी असून, सर्वत्र प्रभारी कामकाज सुरु आहे.

सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. यशोधन मिठारे यांच्याकडील प्रभारी अधिष्ठाता पदाची जबाबदारी विद्यापीठातील व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुप्रिया पाटील यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यावरुन अधिष्ठाता पदाच्या प्रभारी कामकाजावरुन विद्यापीठात चर्चा सुरु आहे. याबाबत अधिसभा सदस्य डॉ. हर्ष गायकवाड यांनी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे प्रभारी पदावर असलेल्या अधिष्ठातांची तक्रार केली होती. त्यावरुन अधिष्ठाताची जबाबदारी अन्य व्यक्तीकडे देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

डॉ. हर्ष गायकवाड यांनी विद्यापीठाला दिलेल्या पत्रानुसार पुणे विद्यापीठात सर्व अधिष्ठाता पदे हे प्रभारीच आहेत. तसेच, ही प्रभारी पद हे त्यांचे मूळ पदाचा कार्यभार सांभाळून करावयाचे आहे. त्यांनी त्यांचा दिवसभराचा मूळ कार्यभार संपल्यानंतर त्यांना दिलेल्या प्रभारी अधिष्ठातापदास न्याय देणे गरजेचे आहे. मात्र काही अधिष्ठाता विद्यापीठाच्या बहुतांश समित्यांवर असल्याचे दिसून येत आहे. यावरुन प्रभारी अधिष्ठाता म्हणून कार्यरत असणाऱ्या व्यक्तींच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

यापूर्वी अधिष्ठाता पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अर्ज मागविण्यात आले. त्यानंतर अधिष्ठाता पदासाठी आरक्षण लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे पूर्वीची अधिष्ठाता पदाची सर्व प्रक्रिया रद्द करावी लागली. सुधारित जाहिरात कधी प्रसिद्ध केली जाणार आहे, तसेच कुलसचिव हे पद आणखी किती दिवस प्रभारी ठेवणार, याबाबत विद्यापीठाकडून कार्यवाही करणार आहे, यासंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

कविता हा सर्वश्रेष्ठ साहित्य प्रकार: चिन्मयी सुमित

पुणे : एखादी घटना सांगण्यासाठी साहित्यिकांना कथा, कादंबरी यासारख्या साहित्य प्रकारांचा आधार घ्यावा लागतो, त्या ठिकाणी कविता तोच आशय परिणामकारक आणि कमीत कमी शब्दात पोहोचवत असते. या अर्थी कविता हा सर्वश्रेष्ठ साहित्य प्रकार आहे, असे मत प्रसिध्द अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांनी व्यक्त केले.

साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा काव्यदीप पुरस्कार प्रसिध्द कवयित्री चिन्मयी चिटणीस यांना प्रसिध्द अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात आणि त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वा. सावरकर अध्यासन केंद्रात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर साहित्यदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ज्योत्स्ना चांदगुडे, कार्याध्यक्ष धनंजय तडवळकर आणि कवी डॉ. संदिप अवचट आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्यदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ज्योत्स्ना चांदगुडे यांनी केले. सूत्रसंचालन कवयित्री निरूपमा महाजन यांनी केले, तर डॉ. संदीप अवचट यांनी आभार मानले. स्वरचित गझलांच्या गझल मुशायऱ्यामध्ये ज्योत्स्ना चांदगुडे, ज्योत्स्ना रजपूत, स्वाती यादव, डॉ. वैशाली मोहिते, प्राजक्ता वेदपाठक, वासंती वैद्य, अमिता पेठे पैठणकर आणि चिन्मयी चिटणीस सहभागी झाल्या होत्या.

पुणे साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा काव्यदीप पुरस्कार प्रसिध्द कवयित्री चिन्मयी चिटणीस यांना प्रदान करताना प्रसिध्द अभिनेत्री चिन्मयी सुमीत. यावेळी (डावीकडून) धनंजय तडवळकर, चिन्मयी सुमीत, चिन्मयी चिटणीस,ज्योत्स्ना चांदगुडे आणि डॉ. संदीप अवचट.

आव्हानांना तोंड देणाऱ्या नवीन तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करावी : डॉ.जाजू

00000

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : विद्यार्थी आणि संशोधकांचे एकत्र संशोधन कार्य आणि बहुविद्याशाखीय प्रयत्न विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन (एसटीईएम) क्षेत्राचे भविष्य घडवू शकतात. नवीन तंत्रज्ञानामध्ये परकीय आणि स्थानिक गुंतवणूक वाढल्यास शास्त्रज्ञ, अभियंते, तंत्रज्ञ आणि व्यवस्थापन वास्तविक जगाच्या समस्यांना तोंड देणारे संशोधन करू शकतात. उद्योग-शैक्षणिक भागीदारी, प्रत्यक्ष शिक्षण अनुभव आणि नवीन तंत्रज्ञानातील गुंतवणूक हे भविष्यातील एसटीईएम विकासाचे महत्त्वाचे चालक असतील, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. बी. एन. जाजू यांनी केले.

जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटीद्वारा आयोजित दोन दिवसीय विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन (STEM) २०२५ मधील उदयोन्मुख ट्रेंड्सवरील पहिल्या राष्ट्रीय परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी सन्माननीय अतिथी डॉ. आर. एन. यादव आणि डॉ. ए. के. मलिक, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. यू. खरात, कॅम्पस डायरेक्टर कर्नल अजित सिंघवी आदि उपस्थित होते. या दो दिवसीय परिषदेमध्ये 9 वेगवेगळ्या राज्यातील 103 संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

डॉ. बी. एन. जाजू म्हणाले की, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, आणि प्रभावी उपायांसाठी परस्पर-विषय सहकार्यात सहभागी होण्यासाठी नवीन संशोधकांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. सतत शिक्षण, कौशल्य विकास आणि आंतरविद्याशाखीय संशोधनाची आवश्यकता आहे.

> कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स आणि रोबोटिक्स सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचे पारंपारिक विषयांशी एकत्रीकरण उद्योगांमध्ये क्रांती घडवू शकते आणि गंभीर जागतिक आव्हाने कशी सोडवू शकते. संशोधनासाठी आवश्यक व्यवस्था निर्माण करून विद्यार्थी आणि व्यावसायिकांना वास्तविक-जगातील समस्यासंदर्भात प्रकल्प उभारावे लागणार आहे.
>
> **— डॉ. एम. यू. खरात,**
> जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी

'हार्मोनल बदल' या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान

पुणे : पुण्यातील पी.एम शहा फाऊंडेशन आणि वर्धमान प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यामाने महिला दिनाचे औचित्य साधत 'चाळीशीनंतरचे महिलांचे कामजीवन व हार्मोनल बदल' या विषयावर सेक्स आणि रिलेशनशिप तज्ज्ञ असलेल्या डॉ. सबिहा इनामदार यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. येत्या शनिवार दि. १५ मार्च रोजी लॉ कॉलेज रस्त्यावरील एनएफडीसी – राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे दुपारी ३:३० वाजता सदर व्याख्यान संपन्न होणार असल्याची माहिती पी. एम. शहा फाउंडेशनचे संचालक ॲड. चेतन गांधी यांनी कळविली आहे. हा कार्यक्रम फक्त महिलांसाठी असून त्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर विनामूल्य प्रवेश देण्यात येईल.

डॉ. कल्याण गंगवाल अहिंसा, करुणा रत्न पुरस्काराने सन्मानित

पुणे : शाकाहाराच्या प्रचारात अग्रणी असलेल्या डॉ. कल्याण गंगवाल यांना पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवात सारस्वताचार्य श्री देवनंदी आचार्य गुरुदेव यांच्या उपस्थितीत अहिंसा करुणा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदरील सोहळा हा गंगाधाम येथील नाजुश्री सभागृह येथे मोठ्या उत्सवात पार पडला. यावेळी डॉ. कल्याण गंगवाल यांच्यासह त्यांची पत्नी चंद्रकला गंगवाल यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

डॉ. कल्याण गंगवाल यांना जीव दया परोपकार शाकाहार क्षेत्रात काम करणे नवीन नाही. वयाच्या ८१ व्या वर्षीही ते नेहमीच काम करत असतात. सर्वजीवमंगल प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रात २०० ठिकाणी होणारी देवी-देवतांसमोर बलिदानाची प्रथा बंद केली आहे.पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव यशस्वी करण्यासाठी मनीष बडजात्या, विनय चुडीवाल, स्वप्नील पाटणी, शीतल लुहाडिया, देवेंद्र बाकलीवाल आदींचे विशेष सहकार्य लाभले.

नगरपरिषद हद्दीत १०० टक्के मिटरींग करुन घ्या- जिल्हाधिकारी

पुणे : नगरपरिषद क्षेत्रात आदर्श शाळा सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी शहरातील मालमत्ता कर वसुलीसंदर्भात ड्रोनद्वारे सर्वेक्षण करुन १०० टक्के मालमत्ता कराची आकारणी करावी, नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी नियोजन करावे. सुरळीत पाणी पुरवठ्यासंदर्भात पाणीमीटर बसविण्याची कार्यवाही करावी. १०० टक्के मीटरींग करुन घ्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी यांना दिल्या आहेत. पाणीमीटर बसविल्याने पाण्याचा अपव्यय टळेल व पाणी बचत होईल, असा विश्वासही डुडी यांनी व्यक्त केला. मुख्याधिकाऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी या सूचना दिल्या. नगरपरिषद क्षेत्रात अर्बन हेल्थ सेंटर उभारण्यात यावेत यासाठी सध्या तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन घ्यावी. अर्बन हेल्थ सेंटरमध्ये चांगली सुविधा देण्याच्यादृष्टीने दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे आपला दवाखाना या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

श्रीटेक डेटा लिमिटेडमध्ये महिला दिन साजरा

पुणे : श्रीटेक डेटा लिमिटेड (हिंजवडी) येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.श्री टेक डेटा लिमिटेडच्या नव्या लोगोचे अनावरण रघुनाथ देशिंगकर यांच्या हस्ते करण्यात आले.उपस्थित महिलांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.सर्व निमंत्रित महिलांचा सत्कार करण्यात आला.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर सर्व कार्यक्रम मराठीमध्ये पार पडला.

यावेळी संचालक सौ.रश्मी जोशी-देशिंगकर,मुख्य कार्यकारी अधिकारी विजयानंद चौधरी,संचालक ओवी देशिंगकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.संस्थापक व अध्यक्ष श्रीनिवास देशिंगकर यांनी कंपनीच्या प्रगतीची माहिती दिली आणि देशाच्या प्रगतीत आपल्या योगदानाने वाटा उचलण्याचे आवाहन केले.यापुढे कंपनीत ३० टक्क्यांहून अधिक महिलांना कारकिर्दीची संधी देऊन महिला सक्षमीकरणाची जबाबदारी पार पाडली जाईल,असे त्यांनी सांगितले. सौ.रश्मी जोशी-देशिंगकर यांनी सूत्रसंचालन केले. मुक्ता देशिंगकर यांनी आभार मानले.

अर्थसंकल्पात दादांचे पुण्यासाठी कायपण...!

शहरासाठी पोतडी खुली; सर्वसामान्यांमध्ये नवचैतन्य

राज्याचे अर्थमंत्री म्हणून काम करत असलेले अजितदादा पवार यांनी आजच्या अर्थसंकल्पात पुण्यासाठी 'शिष्टाई' करत पुण्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करुन दिला. विशेष म्हणजे त्यासाठी दादांनी पोतडी खुली करत सर्वसामान्य नागरिकांना दिलासा दिला. वाहतूक आणि अन्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी अर्थमंत्र्यांनी पुण्यासाठी 'काय पण...!' अशी भूमिका घेत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकप्रकारे रणशिंगच फुंकले आहे.

स्वप्न पूर्ण करण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर

२०४७ पर्यंत पंतप्रधानांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असेल. अर्थसंकल्पात मोठी घोषणा करताना, महाराष्ट्र सरकारने महागड्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के कर आकारण्यात येणार समृद्धी महामार्गाचाही उल्लेख केला असून समृद्धी महामार्गाचे 88 टक्के काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यात समृद्धी महामार्गाचा विस्तार होणार असून सिंदखेडराजा नोड ते शेगावपर्यंत चौपदरी रस्ता बांधण्यात येणार आहे. फेब्रुवारी 2023 पर्यंत 10 लाख वाहनांनी त्यावर प्रवास केला.

-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

हे तर चॅम्पियन बजेट

उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी आज (10 मार्च) राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आज फडणवीस सरकारने अनेक मोठ्या घोषणा केल्या. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या अडीच वर्षांपासून सुरू असलेल्या लोकाभिमुख योजना आणि पायाभूत सुविधा यांचा योग्य तो संतुलन राखणार हे चॅम्पियन बजेट आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजच्या अर्थसंकल्पाविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. एकनाथ शिंदे म्हणाले, शेषराव वानखेडेंनंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या अजित पवार यांनी यावेळेस देखील हा अर्थसंकल्प मांडतांना समतोल राखत सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

-एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

चौफेर विकासाची मांडणी करणारा अर्थसंकल्प

महायुती सरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजितदादा पवार यांनी आज सादर केलेला अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांचे विकासाचे व्हिजन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या चौफेर विकासासाठी केलेली मांडणी अधिक सुनिश्चित करणारा हा अर्थसंकल्प आहे. शेती, आदिवासी, ऊसतोड मजूर, महिला, नोकरदार, तरुण, शेतकरी, व्यापारी, उद्योजक विविध समाज अशा सर्वच घटकांचा तसेच ऊर्जा, सुरक्षा, शेती, उद्योग, पर्यटन अशा क्षेत्रांचा या अर्थसंकल्पात साकल्याने विचार करण्यात आला आहे.

-चंद्रकांतदादा पाटील,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

अर्थसंकल्पात पुण्याला भक्कम पाठबळ

विकसित भारत - विकसित महाराष्ट्र हे साध्य करण्याचा मार्ग सुकर करणारा राज्याचा हा अर्थसंकल्प आहे. विशेषत: पुण्यातील पायाभूत सुविधा जसे की नवीन मेट्रो मार्ग, हरित ऊर्जा प्रकल्प, सांडपाणी प्रक्रिया तसेच पुणे जिल्ह्यातील कृषि आणि ग्रामीण क्षेत्रसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. ह्याच बरोबर राज्यातील विविध पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी भरीव तरतूद तसेच राज्यातील सांस्कृतिक वारसा जपण्यासाठीच्या नवीन संकल्पना राबविण्यासाठी अर्थसंकल्पात भक्कम पाठबळ देण्यात आलेले आहे. केंद्राचे पाठबळ, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे सहाय्य, योजनांचे सुसूत्रीकरण ह्यांच्या अनुषंगाने मागील योजनांच्या अंमलबजावणी सोबतच राज्यातील विविध नवीन योजनांसाठीच्या आर्थिक तरतुदीमध्ये ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली. आहे हे राज्याची आर्थिक स्थिति चांगली असल्याचेच द्योतक आहे.

माधुरी मिसाळ, नगरविकास राज्यमंत्री

सर्वसामान्यांना वटवृक्षाप्रमाणे आधार देणारा अर्थसंकल्प

केंद्र सरकारने जसा मध्यमवर्गीय, गरीब, शेतकरी आणि महिलांना मदतीची संजीवनी दिली, तसाच दिलासा राज्याच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातही वृद्धिंगत करण्यात आला आहे. महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन धोरण, पर्यटन धोरण, नवे आयटी धोरण, लॉजिस्टिक्स धोरण, आरोग्य पर्यटन धोरण, २०२५ हे सहकार वर्ष म्हणून घोषित करणे आणि अभिजात मराठी भाषा मोहीम दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांसाठी लाडकी लेक आणि लाडकी बहीण यासारख्या योजनांची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.महिला सक्षमीकरणासाठी उमेद मॉल १० जिल्ह्यांत सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने महिलांचे कौशल्यविकास उपक्रम राबवले जाणार आहेत. हे उपक्रम नव्या युगाचे वेध घेणारे ठरणार आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती विधान परिषद

अर्थसंकल्पात आश्वासनांचे बुडबुडे फुटले...

विधानसभा निवडणुकीत महायुतीने आश्वासनांची खैरात वाटली होती. पण सत्तेवर येताच या सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडण्याचे काम केले असून, अर्थसंकल्पाचे सोपस्कार उरकण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे, हा अर्थसंकल्प म्हणजे सर्व घटकांचा भ्रमनिरास आहे.निवडणुकीच्या ऐन तोंडावर लाडकी बहीण योजना राबवण्यात आली. दिवाळीचा वाढीव हप्ता देता यावा, यासाठी निवडणुकीची घोषणाही लांबवण्यात आली. प्रचारामध्ये या योजनेचा मोठा गवगवा करण्यात आला आणि १५०० रुपयांवरून ही रक्कम २१०० रुपये करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. प्रत्यक्षात सरकार आल्यानंतर लाडक्या बहिणींच्या यादीतून नावे कमी करण्यात येत होती. आता तर, पैसे वाढविण्याचा वादा सरकारच्या फायलीमध्ये बंद झाला आहे.

प्रशांत जगताप, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

शिवसृष्टीची कामे वेगाने होणार

महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान, पुणेच्या वतीने साकारत असलेल्या शिवसृष्टीच्या तिसऱ्या व चौथ्या टप्प्याच्या कामांसाठी ५० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केल्याबद्दल महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान महाराष्ट्र सरकारचे आभार मानते अशा शब्दांत प्रतिष्ठानचे विश्वस्त जगदीश कदम यांनी आपल्या भावना व्यक्त केला.

शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्यातील कामांसाठी किमान २८० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून राज्य सरकारने केलेल्या तरतुदीमुळे ही कामे आता वेगाने पूर्ण होण्यास निश्चितच मदत होणार आहे. निधी मिळाल्यानंतर येत्या दोन वर्षांत शिवसृष्टीचे काम वेगाने पूर्ण होईल, असा विश्वास देखील यावेळी कदम यांनी व्यक्त केला.

-जगदीश कदम, विश्वस्त, महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान

बोजा वाहन चालकांवर

राज्य सरकारने जाहीर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये राज्यातील लाईट कमर्शियल व्हेईकल याला आकारला जाणारा आरटीओ चा टॅक्स हा कर यापूर्वी ulw वाहनाच्या वजनाच्या kg वर आकारला जात होता तीन चाकी टेम्पो करता 13500, चार चाकी टेम्पो करता 18900, 407 टेम्पो करिता 28900 असा कर आकारला जात होता परंतु आता एक एप्रिल पासून यापुढे आरटीओ tax कर हा वाहनाच्या वजनावर 7% प्रमाणे आकारला जाणार आहे यामुळे ही ही वाढलेल्या रकमेचा बोजा सर्वसामान्य वाहन चालकांवर पडणार आहे याचा आर्थिक फटका टेम्पो चालकांना बसणार आहे, तसेच खाजगी वाहनाच्या rto करा मध्ये एक टक्का किमतीच्या वाढ केलेली असून यामुळे वाहनांच्या किमतीमध्ये भरमसाठ वाढ होणार आहे त्यामुळे राज्यातील वाहन चालकांना याचा फटका बसणार आहे. सरकारने याबाबत पुनर्विचार करावा

-बाबा शिंदे, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वाहनचालक मालक प्रतिनिधी महासंघ

बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी

लाडकी बहीण योजनेच्या तरतुदी मध्ये १०००० कोटीची कपात. २१०० मिळणार नाहीत, तिन्ही भावांनी मिळून केली तमाम महाराष्ट्रातील बहिणींची फसवणूक. वापरा आणि फेकून द्या हे धोरण राबवत आहेत युती सरकार. पुणे शहरासाठी ठोस तरदूत नाही CNG वर टॅक्स सर्वसामान्य जनतेच्या बजेटला कात्री सामान्यलोकांचा प्रवास महागणार आणि महागाई मुळे त्रस्त आणि राज्याच्या विकास घोषणा फक्त जाहीर केल्या आहेत .

-मृणालिनी मदन वाणी, माजी महिलाध्यक्षा पुणे शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी, (शरदचंद्र पवार)पुणे शहर

जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयश

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेला महायुती सरकारचा यंदाचा अर्थसंकल्प जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात सपशेल अपयशी ठरलाय. शेतकरी कर्ज माफीची घोषणा करण्यात येईल आणि लाडक्या बहिणींना २१०० रूपये मिळतील अशी अपेक्षा होती. महागाई कमी करण्यासाठी, राज्यातील बेरोजगार युवक, विद्यार्थी, शेतकरी, महिला, मजूर आणि एकूणच सर्वसामान्यांच्या हिताचे काहीही ठोस धोरण या सरकारकडे नाही. केवळ पोकळ्या घोषणांचा हा अर्थसंकल्प आहे.

रोहन सुरवसे पाटील,
सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

शेतकऱ्यांना फसवणारा अर्थसंकल्प

आज राज्य सरकारचा अर्थसंकल्प सादर झाला. सभागृहात AI तंत्रज्ञान वापरा म्हणून शेतकऱ्यांना उपदेश करणाऱ्या सरकारने प्रत्यक्षात शेतकऱ्यांना फासावर लटकवणारा अर्थसंकल्प मांडला आहे. विधानसभा निवडणुकीत घसा कोरडा पडेपर्यंत देवेंद्र फडणवीस, अजित पवार,एकनाथ शिंदे यांनी कर्जमाफी करू म्हणून शेतकऱ्यांना सांगितलं होतं. या अर्थ संकल्पात शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनापासून या सरकारने पळ काढला आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या डोक्यावर सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कर्जाचा डोंगर झाला आहे. यातून दररोज आत्महत्या होतं आहेत. सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्यात अपयशी ठरलेलं सरकार भावांतर योजनेच्या स्वतःलाच्याच आश्वासनावर तरी गांभीर्याने विचार करून दिलासा देईल अशी अपेक्षा होती तीही फोल ठरली.

- हनुमंत पवार, प्रवक्ता. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस.

अखेर ठरलं; रविंद्र धंगेकरांचा काँग्रेसला रामराम, शिवसेनेत प्रवेश

पुणे : काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर हे काँगेस सोडणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून चालू होती. अखेर ही चर्चा खरी ठरली आहे. धंगेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केलं की त्यांनी काँग्रेसला आता रामराम केला आहे. त्यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

पत्रकार परिषदेत रवींद्र धंगेकर म्हणाले, "अशा प्रकारचा कोणताही निर्णय हा प्रचंड कठीण असतो." "मी गेल्या १०-१२ वर्षांपासून या पक्षाबरोबर काम करत आहे. पक्षाबरोबर एक कौटुंबिक नातं तयार झालं आहे. पक्षातील सहकारी हे कुटुंबातील सदस्य बनले आहेत. सर्वांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केलं. मी गेल्या वर्षी लोकसभा निवडणूक लढवली, विधानसभा निवडणूक लढवली, या काळात पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी माझ्यामागे मोठी ताकद उभी केली. त्यांच्या जोरावरच मी त्या निवडणुका लढवू शकलो. मी निवडणुकीत पराभूत झालो ती वेगळी गोष्ट आहे. मात्र पक्षातील लोकांनी माझ्यासाठी कष्ट केले. सर्वांनी माझ्याबरोबर ताकद उभी केली होती. त्यामुळेच आता पक्ष सोडताना मला खुप दुःख होत आहे.

> कार्यकर्ते आणि मतदारांशी माझी चर्चा झाली. त्यांचे म्हणणं आहे की आमची कामं कोण करणार? लोकशाहीत सत्ता असल्याशिवाय सर्वसामान्यांना आपण न्याय देऊ शकत नाही, त्यांची कामं करू शकत नाही. अशा वेळी माझी दोन-तीन वेळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट झाली. मी त्यांच्याशी चर्चा केली. मंत्री उदय सामंत हे देखील माझे मित्र आहेत. माझी त्यांच्याशी देखील चर्चा झाली. त्यांनी वारंवार सांगितलं की एकदा आमच्याबरोबर काम करा. **-रविंद्र धंगेकर,** माजी आमदार

होम मिनिस्टरचा खेळ, पैठणी; भन्नाट सहल अन खाना खजाना

पुणे वृत्तपत्र विक्रेता संघातर्फे महिला दिनानिमित्त अनोखा उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने घरोघरी वृत्तपत्र वितरण करणाऱ्या महिलांचा जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाच्या वतीने खेडशिवापूर नजीक प्रथमेश रिसॉर्ट या ठिकाणी सहलीचे आयोजन करून करण्यात आला.

पुणे शहर व पिंपरी चिंचवड मधील घरोघरी वृत्तपत्र वितरण करणाऱ्या पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाच्या महिला सभासदांचा व त्यांच्या परिवारातील महिलांचा सन्मान करण्यासाठी पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष विजय पारगे यांनी नाविन्यपूर्व कल्पना राबवून साधारणपणे २७० महिलांच्या सहलीचे आयोजन करण्यात आले.

प्रथमेश रिसॉर्ट या ठिकाणी सकाळी आठ ते रात्री अकरा वाजेपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन करून यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धा चे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये विजेत्या सविता अरुण निवंगुणे, श्रुती अवनकर, हेमा गुजर या महिलांना प्रथमेश रिसॉर्ट च्या संचालिका पौर्णिमा निंबाळकर व तन्वी निंबाळकर यांच्या हस्ते पैठणी देण्यात आली.

तसेच यावेळी घेण्यात आलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमामध्ये प्रथम क्रमांक आरती बोरकर, द्वितीय क्रमांक नीलम हिरणवळे,तृतीय क्रमांक आदिती हिरणवळे,चतुर्थ क्रमांक प्रतिमा माने, पाचवा क्रमांक प्रियंका भिंगारे यांनी पटकावला. होम मिनीस्टर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेशमा चोपडा यांनी केले.

तसेच माधवबाग च्या वतीने डॉ. मिलिंद सरदार यांनी ऊपस्थित महिलांना आरोग्य कसे सुदृढ ठेवावे व महिलांना आरोग्य विषयी मार्गदर्शन केले.

अध्यक्ष विजय पारगे व प्रेस व्यवस्थापन,पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या तसेच आभार संघटनेचे सचिव अरुण निवंगुणे यांनी मानले. तसेच रिसॉंट नियोजन संघटनेचे सचिव अरुण निवगुणे,ऊपाध्यक्ष दत्ताञय पिसे, खजिनदार संदीप शिंदे, सहखजिनदार महादेव नेमाने, शामभाऊ धायगावे, विश्वस्त यशवंत वादवणे, संतोष मोहोळ, सोमनाथ शिर्के, संघटक सजय फाटक, कैलास नाकते विभागप्रमुख दीपक निवंगुणे,चंदन कोर्हाळकर, संतोष जाधव, बबलू लोहार, गिरीश नगरकर, राहुल चिंचकर या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले

> आमच्या संघटनेच्या परिवारातील महिलांच्या भावना लक्षात घेता यावर्षी नाविन्यपूर्व अशी कल्पना घेऊन संपूर्ण दिवस महिलांना मौज मजा करता यावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते व यापुढेही असेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातील.
>
> **—विजयराव पारगे,**
> अध्यक्ष, पुणे वृत्तपत्र विक्रेता संघ

यंदाचे महिला उद्योजिका पुरस्कार जाहीर

पुणे : शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा उपक्रम असलेल्या याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) तर्फे महिला उद्योजिका पुरस्कार २०२५ वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यांतर्गत वितरित होणारा स्वयंसिद्धा पुरस्कार पुण्यातील गजानन एंटरप्राईजेसच्या संचालिका वैशाली धर्माधिकारी यांना आणि युवा उद्योजिका पुरस्कार आर्टीसन प्रिंट अँड पॅकच्या संचालिका सानिया वाळींबे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच यंदा युवा गौरव पुरस्कार पोलीस निरीक्षक प्रतिभा जोगळेकर यांना प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष विश्राम कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला संस्थेचे कार्यवाह श्रीकांत जोशी, युवा महिला आघाडी सदस्य प्रतिभा संगमनेरकर, स्वाती कुलकर्णी, कार्तिकी जोशी, मंजुषा वैद्य, मंदार महाजन आदी उपस्थित होते.

टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश सभागृहात शनिवार, दिनांक १५ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यसभेच्या खासदार प्रा. डॉ.मेधा कुलकर्णी या असणार आहेत.

महिला दिनानिमित्त आरोग्य शिबीर संपन्न

खडकवासला : महिला दिन व क्रांतिज्योती सवित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोंढणपूर येथे पुणे येथील संजीवन फॉउंडेशन, केअर टेकर सोसायटी, दिनकरराव जावळकर प्रतिष्ठान आणि कोंढणपूर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यामाने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उदघाटन सरपंच पल्लवी सुदर्शन जरांडे आणि उपसरपंच धनंजय मुजुमले यांचे हस्ते करण्यात आले. डॉ सुनिलकुमार थिगळे, कुमार शिंदे आणि डॉ हेमा थिगळे यांनी उपस्थित नागरिकांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. या शिबिरात अडीचशे नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ. फाल्गुनी जपे यांनी त्यांची डोळे तपासणी, डॉ. स्मितल कुलकर्णी यांनी हिमोग्लोबिन, रक्तदाब आणि शुगर तपासणी, डॉ सुरेश निघोट यांनी लहान मुलांची तपासणी आणि स्त्री रोग तज्ञ् डॉ अजिता निघोट आणि डॉ. रितू दवे यांनी महिलांचे आरोग्य व स्तनाचा व गर्भाशयाचा कर्करोग याची तपासणी केली.

या प्रसंगी मा. पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, रवी मुजुमले, अरुण घोगरे, मुकुंद मुजुमले,सुदर्शन जरांडे, शेखर मुजुमले, मारुती मुजुमले,

रणजीत परदेशी,अमोल अरगडे, विजय बेलीटकर, संजय असरकर,आकाश यादव, अमित चव्हाण, संतोष जाधव, रामदास गायकवाड, राजेंद्र मुजुमले, अमोल मुजुमले, पप्पू अण्णा गायकवाड, निवृत्ती वाव्हळ, वर्षाताई मुजुमले हे उपस्थित होते. सूत्रसंचालन कुमार शिंदे यांनी केले तर उपसरपंच धनंजय मुजुमले यांनी आभार मानले.

परमहंस स्वामी स्वरूपानंद जीवनगौरव पुरस्कार

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या परमहंस स्वामी स्वरूपानंद जीवनगौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शुक्रवार, दि.२१ मार्च, २०२५ रोजी स्वामीकृपा हॉल, कर्वे रस्ता, पुणे येथे करण्यात आले आहे. संतसाहित्याचे गाढे अभ्यासक आणि संत नामदेव अध्यासनाचे भूतपूर्व प्रमुख व प्रा.डॉ.अशोक प्रभाकर कामत यांना हा पुरस्कार जाहीर झाला असून त्यांना सदरचा पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभास महाराष्ट्र टाइम्स, पुणेचे संपादक मा. श्रीधर लोणी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या शुभहस्ते आणि मा. प्र -कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे, निवड समिती सदस्य तसेच समाजातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. पुरस्कार प्रदान सोहळ्यापूर्वी संत नामदेवराय यांच्या पाऊलखुणांचा मागोवा (परभणी आणि हिंगोली जिल्हा) या विषयावर परभणी येथील मंदिर स्थापत्य आणि मूर्तीशास्त्राचे तज्ज्ञ अभ्यासक आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक अनिल स्वामी यांचे व्याख्यानही होणार आहे.

पाऊलखुणा उज्वल इतिहासाच्या...!

पुणे श्री महावीर जैन विद्यालयातर्फे उभारण्यात आलेल्या ४०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या भव्य आणि अत्याधुनिक जेएम फायनान्शियल फौंडेशन विद्यार्थीगृह भवनाच्या लोकर्पण सोहळ्याप्रसंगी श्री महावीर जैन विद्यालयाच्या ११० वर्षांचा उज्वल इतिहासाच्या पाऊलखुणा असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.

कंट्रोलला खोटी माहिती देऊन फसवणूक; मद्यपी जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : दारुच्या नशेत पोलीस नियंत्रण कक्षाला खोटी माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या एकाविरुद्ध वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वारजे भागातील रामनगर परिसरात रविवारी ही घटना घडली.

याप्रकरणी निवास नारायण अकोले (वय ४२, रा. रामनगर, वारजे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस शिपाई अमोल सूतकर यांनी वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

वारजे भागातील रामनगर परिसरात एका महिलेवर अत्याचार करण्यात आल्याची खोटी माहिती अकोले याने पोलीस नियंत्रण कक्षाला (११८) दिली. या घटनेची माहिती नियंत्रण कक्षाला रविवारी (९ मार्च) दुपारी अडीचच्या सुमारास मिळाली. त्यानंतर वारजे पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक निलेश बडाख, उपनिरीक्षक आर. आर. भरसट यांनी घटनास्थळी धाव घेतली. गस्त घालणाऱ्या पोलिसांचे पथक त्वरीत तेथे पोहोचले. पोलिसांनी चौकशी केली. तेव्हा रामनगर भागात महिलेवर अत्याचार झाल्याची घटना घडली नसल्यचे उघडकीस आली. पोलीस नियंत्रण कक्षाला अकोले याने खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्याचे चौकशीत उघड झाले.

चार हजार टन आंब्याची निर्यात करणार

एप्रिल महिन्यात शुभारंभ; आंबा उत्पादकांना सोन्याचे दिवस

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत आंब्याला पोषक वातावरण न मिळाल्यामुळे आणि पावसाच्या लहरीपणामुळे आंबा उत्पादकांना त्याचा चांगलाच फटका सहन करावा लागला होता, त्यामुळे कष्ट करुनही बहुतांशी आंबा उत्पादकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला होता. आता मात्र यंदाच्या वर्षी त्यांचे हे नुकसान भरुन काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पणन महामंडळाने घेतला आहे, त्यासाठी मंडळाने यंदा तब्बल चार हजार टन आंबा निर्यातीचे उद्धिष्ठ ठेवले असून त्यासाठी परिपूर्ण सुविधा देण्यात येणार आहेत. मंडळाचा हा उपक्रम यशस्वी झाल्यास यंदाच्या हंगामात आंबा उत्पादकांना ' सोन्याचे दिवस' येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

> जगातील बहुतांशी विकसित देशांमध्ये आंबा निर्यातीकरिता आवश्यक असलेल्या सर्व आंब्यावर करावयाच्या प्रक्रियांचा सुविधा कृषी पणन मंडळाने विकसित केल्या आहेत. या सुविधांचा वापर आंब्यांवर प्रक्रिया करण्यासाठी केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांकडील आंबा निर्यातीस चांगले दर प्राप्त होण्यास मदत होते.
> **-संजय कदम,** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : गतवर्षी पणनच्या सुविधांच्या वापरातून सुमारे तीन हजार टन आंबा निर्यात करण्यात आला होता. चालूवर्षी म्हणजे हंगाम 2025 मध्ये सुमारे चार हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट मंडळाने निश्चित केल्याचे सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशीतील प्रमुख निर्यात सुविधा केंद्रांवरून परदेशात आंबा निर्यातीस एप्रिल महिन्यापासून सुरुवात होईल. त्या दृष्टीने आंबा आयातदार देशांना आवश्यक असलेल्या प्रक्रिया करून देण्याच्या सर्व सोयी-सुविधा परिपूर्ण करण्यात आल्या आहेत.

आंबा निर्यातीसाठी आयातदार देशांच्या निकषान्वये आवश्यक पॅकहाऊस, उष्णजल प्रक्रिया (हॉट वॉटर ट्रीटमेंट), उष्ण बाष्प प्रक्रिया (व्हेपर हीट ट्रीटमेंट), विकिरण प्रक्रिया (इरॅडिएशन प्रक्रिया) ह्या सुविधांची उभारणी मंडळाने वाशीत व राज्यांत इतरत्र केलेली आहे. राज्याचे पणनमंत्री आणि पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल मंत्री यांनी गेल्या महिन्यातच वाशीतील आंबा निर्यातीच्या सुविधेस भेट दिली होती. त्याचा वापर वाढविण्यासंदर्भात त्यांनी सूचना दिल्या असून त्या अनुषंगाने सुविधेवरील कामकाज आता सुसज्ज झाल्याची माहिती पणन मंडळातून देण्यात आली.

देशातून होणाऱ्या एकूण आंबा निर्यातीत दरवर्षी 80 ते 85 टक्के वाटा महाराष्ट्राचा राहतो. केंद्राच्या अपेडा संस्थेने विकसित केलेल्या 'मँगोनेट' या ऑनलाईन प्रणालीवर निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी प्रथम करावी लागते. ही नोंदणी निर्यातीसाठी बंधनकारक आहे. त्या अंतर्गत देशात 18 हजार 539 आंबा बागांची नोंदणी झाली असून त्यापैकी महाराष्ट्रातील संख्या 13 हजार 41 इतकी आहे.

अशी होते प्रक्रिया

- **उष्णजल प्रक्रिया :** 46 अंश सेल्सियसमध्ये 60 मिनिटे आंबा गरम पाण्यात ठेवतात. त्यामुळे आंब्यामध्ये फळमाशी असल्यास नष्ट होते.
- **उष्ण बाष्प प्रक्रिया :** (व्हेपर हीट ट्रीटमेंट) यामध्ये 47 अंश सेल्सियस तापमानात 20 मिनिटे आंब्यावर वाफेचा मारा केला जातो. यामुळे आंब्यामधील फळमाशीचे निर्मूलन होते.
- **विकिरण प्रक्रिया (इरॅडिएशन प्रक्रिया) :** आंब्यावर गामा किरणांचा मारा केला जातो त्यामुळे या प्रक्रियेने आंब्यामधील कोयकिडा व इतर कीड नष्ट होते.

शहरांत ३० ठिकाणी पर्जन्यमापक बसविणार

३० लाख रुपये खर्च अपेक्षित; महिनाभरात होणार यंत्रणा कार्यान्वित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पालिका पावसाच्या स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत सुरू केला जाणार आहे. शहरात गेल्या काही वर्षांत पावसाळ्यात अचानक अतिवृष्टी होण्याचे प्रकार वाढले आहेत. अवघ्या तासाभरातच १०० मिमी पेक्षा अधिक पाऊस पडण्याचे प्रकार वाढल्याने महापालिकेस या पावसामुळे उद्‌भवलेल्या पूरस्थितीवर उपाययोजना करणे शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेऊन आता महापालिकेकडूनच शहरातील पाऊस मोजला जाणार आहे. यासाठी, महापालिकेकडून शहरांत ३० ठिकाणी पर्जन्यमापक बसविण्यात येणार आहेत.यासाठी सुमारे ३० लाखांचा खर्च येणार असून पुढील काही महिन्यांत ही यंत्रणा उभारली जाणार आहे.

हवामान विभाग आणि सीडॅकच्या माध्यमातून पर्जन्यमापक बसविण्याची ठिकाणे निश्चित केली जाणार आहेत. यासाठी गेल्या काही वर्षांत कोणत्या भागात सर्वाधिक पाऊस झाला याचा अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये, प्रत्येक तासाला झालेल्या पावसाच्या माहितीसह ज्या दिवशी हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्या दिवशी एका ठराविक मिमी पेक्षा अधिक पाऊस झाल्यास तातडीने आपत्ती व्यवस्थापन कक्ष, संबधित क्षेत्रीय कार्यालय तसेच त्या भागातील नागरिकांनाही पावसाचा अलर्ट जाणार आहे.

> पावसाळ्यापूर्वी हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात ३० लाखांची तरतूद करण्यात आली असून महापालिकेकडून या कामाचा आराखडा तयार करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.
> **— गणेश सोनुणे,** आपत्ती व्यवस्थापन अधिकारी

चित्रपटांप्रमाणे मराठी मुक्त संगीतालाही अनुदान द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : स्वतंत्र संगीताला चित्रपटांचा आधार नसतो, येथे कलाकार आपण कसे व्यक्त व्हायचे हे स्वत: ठरवतो. त्यामुळे मराठी मुक्त संगीताला स्टार्ट अप असल्यासारखे समजून त्याची सरकार दरबारी नोंद व्हावी आणि मराठी चित्रपटांना जसे अनुदान मिळते तसे अनुदान मराठी मुक्त संगीताला मिळावे अशी अपेक्षा सुप्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांनी व्यक्त केली. संगीतकार अजय नाईक आणि कौस्तुभ दबडगे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र कलामंच व जस्ट कोलॅब यांच्या वतीने आयोजित पहिल्या मराठी इंडी म्युझिक अवॉर्ड्स सोहळ्यात त्या बोलत होत्या.

मराठी इंडी म्युझिक अवॉर्डस् (मिमा) सोहळ्यात चित्रपटेतर (नॉन फिल्म) संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल यावेळी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांना विधानपरिषद सदस्य प्रसाद लाड यांच्या हस्ते 'संगीतरत्न' या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुक्त संगीतातील प्रयत्नांना सरकारी अनुदान मिळाले तर त्यांचा प्रसार जगभर होईल असा विश्वास व्यक्त करीत वैशाली सामंत म्हणाल्या, "आम्ही संगीतातील वेडे मुशाफिर आहोत. या पुरस्काराने आम्हा सर्वांनाच आज एक छोटासा किनारा मिळाला याचे समाधान आहे.

पुणे प्रसिद्ध संगीतकार अजय नाईक आणि कौस्तुभ दबडगे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र कलामंच व जस्ट कोलॅब यांच्या वतीने आयोजित पहिल्या मराठी इंडी म्युझिक अवॉर्ड्स सोहळ्यात आज अशोक पत्की यांनी सन्मानित करण्यात आले.

छत्रपती शिवरायांच्या विचारांची आजही देशाला गरज : माधवी लताजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : छत्रपती शिवाजी महाराज यांनी धर्म, जात, पंथ याच्या पलिकडे जाऊन देशासाठी आणि हिंदू धर्मासाठी काम केले. त्यांच्या विचारांची आजही देशाला गरज असून त्यांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचवण्याची आणि त्या माध्यमातून देशभक्त तरुण घडवण्याची आज गरज आहे, असे मत तेलंगणाच्या रणरागिणी हिंदुत्ववादी नेत्या माधवी लताजी यांनी व्यक्त केले.

राजे शिवराय प्रतिष्ठान आयोजित शिवजयंती महोत्सवाचे उद्‌घाटन जय शिवराय चौक, कर्वेनगर येथे माधवी लताजी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रबोध उद्योग समूहाचे संचालक मोहन गुजराथी, प्रतिष्ठानचे संस्थापक महेश पवळे, अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज स्वप्निल राजे होळकर, अध्यक्ष अतुल गोणते, उद्योजक गणेश पलांडे, मकरंद केळकर व प्रल्हाद बोराडे यावेळी उपस्थित होते.

देशाच्या रक्षणार्थ वीरमरण पत्करलेले भारतीय लष्करातील जवान हुतात्मा अमर पवार यांना नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे पुरस्कार आणि शिक्षण व आरोग्य क्षेत्रात काम करणा-या सेवा आरोग्य फाऊंडेशनला स्व. ज्ञानेश पुरंदरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ ज्ञानेश सेवा समर्पण पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दी निमित्ताने कर्मभूमी किल्ले महेश्वर व धर्मभूमी काशी विश्वेश्वर घाटाची प्रतिकृती व माहितीपट देखील सादर करण्यात आला.

मोहन गुजराथी म्हणाले, त्याग, सेवा, समर्पण या त्रिसूत्रीचा मंत्र मानून राजे शिवराय प्रतिष्ठान कार्य करत आहे. त्यांच्या या कार्याचा आजच्या सर्व तरुणांनी आदर्श घेणे गरजेचे आहे. शिवजयंतीच्या माध्यमातून आजही सामाजिक जागरणाची गरज आहे, केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करून स्मरण करण्यापेक्षा त्यांचे विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये आणून आपण एक वैभव शाली राष्ट्र निर्माण करू शकतो.

महेश पवळे म्हणाले, छत्रपती शिवराय यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी गेल्या वीस वर्षांपासून शिवजयंती उत्सव साजरा केला जात आहे. या माध्यमातून हिंदुत्ववादी विचार असणारे तरुण निर्माण केले जात आहेत. आज पुण्येश्वर मंदिराच्या ठिकाणी मशिद उभी आहे.

> महाराष्ट्राने कायमच देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. आजही महाराष्ट्र सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर असून छत्रपती शिवरायांच्या विचारांनी चालणारा राष्ट्रवादी तरुण या भूमीतून निर्माण होत आहेत. आजही अनेक सैतानी शक्ती हिंदूंच्या मुळावर उठलेल्या आहेत. परंतु छत्रपती शिवरायांचे विचार धारण केलेल्या तरुणांनी त्यांच्या विरोधात उभे राहिले पाहिजे.
> **— माधवी लताजी,** तेलंगणाच्या रणरागिणी हिंदुत्ववादी नेत्या

सहचर्याच्या भावनेला प्राधान्य द्या- शकुंतला काळे

पिंपळे सौदागर : बदलता काळ लक्षात घेता स्त्रीने स्वतः मध्ये बदल करणे गरजेचे आहे. दुसऱ्यासाठी जगत असताना आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, मुक्त मनाने जगावे, एकमेकांशी भांडत बसण्यापेक्षा सहचर्याच्या भावनेला प्राधान्य देऊन परस्परातील नाती बळकट करावी असे प्रतिपादन माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महिला दिनानिमित्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. स्व. बाळासाहेब कुंजीर मैदान येथे हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी व्यासपीठावर पिंपरी - चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ तसेच पी के इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. धनश्री सोनवणे, मा. नगरसेविका निर्मला कुटे, उन्नति सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा, डॉ. कुंदा भिसे, प्रा. रेखा येळंमकर यांची उपस्थिती होती. तर पिंपरी चिंचवड भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, पी के इंटरनॅशनल स्कूल चे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथअप्पा काटे, उन्नती फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे आणि ज्येष्य नागरिक महासंघांचे सरचिटणीस ईश्वरलाल चौधरी यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती.

पिंपरी न्यायालयाचा ३६वा वर्धापन व महिला दिन उत्साहात साजरा

चिंचवड : पिंपरी न्यायालयाचा ३६ वा वर्धापन दिन व महिला दिनाचा सोहळा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे पार पडला. दिनांक ८ मार्च १९८९ रोजी पिंपरी चिंचवड मध्ये पहिले न्यायालय सुरू झाले. एक न्यायालय ते आज सुसज्ज अशा नेहरूनगर येथील इमारतीमध्ये सुरू असलेले एकूण दहा दिवाणी फौजदारी न्यायालय यामागे मोठा संघर्ष पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वकिलांनी केलेला आहे. या मागील ३६ वर्षातील सर्वच आठवणींनी यावेळी उजाळा देण्यात आला.

यावेळी वर्धापन दिनानिमित्त पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने दिनांक २७ मार्च ते ०४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त बालकलाकार कु.आकांक्षा पिंगळे त्याचबरोबर पिंपरी न्यायालयात कार्यरत असणाऱ्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. क्रांती दीपाली दयानंद कुरळे यांच्या यशामागील संघर्षाबद्दल विशेष सन्मान यावेळी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या हस्ते करण्यात आला.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर महोत्सव

पिंपरी : जगद्गुरु संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर

अमृत महोत्सवी वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात गुरुवर्य कुऱ्हेकर महाराजांच्या कीर्तनाने झाली. जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाला येत्या १६ मार्च रोजी अर्थात तुकाराम बीजेच्या दिवशी ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

श्री क्षेत्र आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे अध्वर्यू हभप मारूतीबाबा कुऱ्हेकर महाराज आणि वारकरी रत्न हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांच्या नेतृत्वाने गाथा पारायण सोहळा येत्या ९ मार्च ते १७ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. भंडारा डोंगराच्या पायथ्याला हा सोहळा होत आहे. या पारायण सोहळ्यासाठी १५ हजार भाविक वाचक म्हणून सहभागी होणार असून मुख्य सोहळा तुकाराम बिजेच्या दिवशी होणार आहे. या दिवशी राज्यभरातून सुमारे तीन लाख भाविक गाथा पारायण सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

मी दापोडीतील डॉन म्हणत तरुणावर प्राणघातक हल्ला

दापोडी : मी दापोडीतील डॉन आहे.. आणि तू डॉनशी पंगा घेणार.. थांब तुझा गेम खल्लासच करतो.." असं म्हणत आरोपीने धारदार हत्याराने एका तरुणावर प्राणघातक हल्ला केला आहे. श्रेयस जवळेकर रा. दापोडी याने तरुणावर प्राणघातक हल्ला केला असून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. दापोडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा संतोष शिंगोटे (वय – १७, रा. जाधव चाळ, नरवीर तानाजी मंडळ जवळ दापोडी) याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपी श्रेयस जवळेकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

पिंपरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने चिंचवड येथील जुन्या एल्प्रो कंपनीजवळ नव्याने उभारलेल्या २० लाख लिटरच्या पाण्याचे टाकीचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते झाले.

पालिकेच्या पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

चिंचवड : चिंचवड परिसरातील लोकप्रतिनिधी, तसेच नागरिकांची पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी सातत्याने मागणी होत होती,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या २० लाख लिटर पाण्याची टाकीमुळे या परिसरातील नागरिकांची सोय होणार आहे तसेच सर्वांना स्वच्छ पाणी मिळावे, पाणी पुरवठा नियोजनबद्ध व्हावा, यासाठी पुढील काळातही महापालिकेने अशाच पद्धतीने नियोजन करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने चिंचवड येथील जुन्या एल्प्रो कंपनीजवळ नव्याने उभारलेल्या २० लाख लिटरच्या पाण्याचे टाकीचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले की, 'चिंचवड परिसरातील अनेक भागांतील पाणी पुरवठा सुरळित होण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या पाण्याची टाकीची मदत होणार आहे. महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी हे नागरिकांना उत्तम सेवा मिळाव्यात, नियमित पाणी पुरवठा करता यावा, यासाठी काम करीत आहेत.

कर्करोग प्रतिबंधक लस उपक्रम

दारिद्र्यरेषेखालील महिलांना मोफत लसीचा लाभ

- राज्यभरात अडीच कोटी महिलांसाठी आरोग्य तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे.
- आतापर्यंत झालेल्या शिबिरांमध्ये २१ लाख ४८ हजार ४३५ महिलांची तपासणी करण्यात आली
- ८९२ महिलांना कर्करोगाचे निदान झाले आहे. त्यांना तातडीने पुढील उपचार देण्यात येत आहेत.
- कर्करोग रोखण्यासाठी लसीकरणासोबतच जागरूकता आणि नियमित तपासणी आवश्यक आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सांगवी : दारिद्र्यरेषेखालील महिला आणि ९ ते १४ वयोगटातील मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय अखेर घेण्यात आला आहे. या निर्णयासाठी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत ही घोषणा केली.

महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा आणि स्तनांचा कर्करोग मोठ्या प्रमाणावर आढळत असल्याने त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर, किशोरवयीन मुलींना एचपीव्ही लसीकरणाच्या माध्यमातून संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लसीकरणासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीचा समन्वयाने वापर केला जाणार असल्याची माहिती मंत्री आबिटकर यांनी दिली.

आमदार शंकर जगताप यांची भूमिका

- महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा ठरणारा हा निर्णय घेतला जावा, यासाठी आमदार शंकर जगताप यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे सांगवी येथील अटल महाआरोग्य शिबिरात केली होती. त्याबरोबरच लेखी पत्र पाठवूनही त्यांनी मागणीचा पाठपुरावा केला होता. राज्यातील शाळांमधूनच एचपीव्ही लसीकरण मोफत करण्यात यावे, अशी त्यांची ठाम भूमिका होती.

जनसंवाद सभेत एकूण ८० तक्रार वजा सूचना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : महापालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ८० तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे. नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद नेमून दिलेल्या समन्वय अधिकारी यांनी भूषविले.

पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे १४, १२, ५, ११, ५, ७, १३ आणि १३ अशा एकूण ८० तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

नागरिकांच्या विविध तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत मांडल्या.

- सार्वजनिक स्वच्छतागृहांची निगा राखणे.
- कचऱ्याचे सुयोग्य नियोजन करणे.
- रस्त्यावरील विजेचे खांब दुरुस्त करणे.
- रस्त्याचे डांबरीकरण करणे, ड्रेनेजलाईन दुरुस्त करणे.
- नवीन ड्रेनेजलाईन टाकणे, फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त करणे.
- नियमित पाणीपुरवठा करणे.

पीसीयू स्कूल ऑफ लॉ मध्ये महिला सक्षमीकरणावर परिषद संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पिंपरी : आजची स्त्री ही आधुनिक विचारांची आहे. तिच्या सक्षमीकरणासाठी तिचा स्वतःवर विश्वास हवा. नवीन कायद्याची माहिती झाल्यास आजची आधुनिक स्त्री अधिक सक्षम होईल असे मत पुणे, शिवाजीनगर न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी) अमृत बिराजदार यांनी व्यक्त केले.

पीसीइटी एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पीसीयू मधील स्कूल ऑफ लॉ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त "लिंग आधारित हिंसाचाराचा सामना करण्यासाठी नवीन गुन्हेगारी कायद्याद्वारे महिला सक्षमीकरण" या विषयावर आयोजित केलेल्या "पीसीयू लेक्स इम्पेरियम २०२५" या परिषदेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी परिषदेस कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपाडे, सर्वोच्च न्यायालयातील ॲड. दुर्गा दत्त, त्रयमा लीगलचे संस्थापक ललित कुमार झुंझुनवाला, विभागप्रमुख प्रियांक राणा, सहा. प्रा. प्रदीप यादव, पुलकित अग्रवाल, अदिती चौबे, स्कूल ऑफ लॉ चे प्राध्यापक आणि बीए. एलएलबी आणि एलएलबी चे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी आणि कायदेशीर व्यावसायिकांना संवाद साधण्यासाठी, त्यांचे अनुभव सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या परिषदेत पीसीयूच्या स्कूल ऑफ लॉची महत्त्वाच्या सामाजिक समस्यांवर जागरुकता आणि शिक्षणाला चालना देण्यासाठीची वचनबद्धता असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपाडे यांनी सांगितले.

चऱ्होलीच्या शहरीकरणावर डाक विभागाचा 'स्टँम्प'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पिंपरी- चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या चऱ्होली आणि परिसराच्या शहरीकरणावर आणि डेव्लपमेंटवर अखेर भारतीय डाक विभागाने शिक्कामोर्तब केले आहे. चऱ्होलीला ग्रामीण ऐवजी आता शहरी 'पिन कोड' मिळाला आहे.

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे चऱ्होली येथे असलेल्या शाखा डाक घरामार्फत देण्यात येणाऱ्या पोस्टाच्या सेवांवर अतिरिक्त ताण येत होता. या पार्श्वभूमीवर चऱ्होलीला शहरी पिन

कोड मिळावा आणि डाक उप कार्यालय सुरू करण्याचा निर्णय डाक विभागाने घेतला. त्यासाठी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आणि आज डाक कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी माजी महापौर नितीन काळजे, पुणे क्षेत्राचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये आणि पुणे ग्रामीण डाक विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे उपस्थित होते.

डिलिव्हरी उपडाकघराचा दर्जा मिळाल्यानंतर आता चऱ्होली ला स्वतंत्र 411081 हा पिनकोड प्राप्त झाला आहे. हा पिन कोड चऱ्होली, वडमुखवाडी, निरगुडी, डूडूळगाव व चोवीसावाडी व परिसरातील वाड्या वस्त्या यांना लागु राहील.

डाक मेळाव्याला ग्रामस्थांचा प्रतिसाद...

- यावेळी प्राताविक करताना पुणे ग्रामीण डाक विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे यांनी डाक विभागाच्या सर्व बचत योजना, आधार कार्ड अध्यतन सेवा, डाक विमा योजना,अपघाती विमा योजना तसेच पार्सल पाठवण्याची सुविधा या सेवांचा लाभ चऱ्होली उपडाकघरामार्फत ग्रामस्थांना घेता येणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.

संपादकीय विशेष

‘चॅम्पियन’ भारत, खेळात महारथ!

भारताने वन डे वर्ल्ड कप स्पर्धा- २०२३, टी 20 वर्ल्ड कप स्पर्धा - २०२४ आणि आता चॅम्पियन्स वन डे स्पर्धा - २०२५ या आयसीसीच्या सलग तीन स्पर्धांमध्ये मिळून २३ पैकी २२ सामने जिंकण्याचा विक्रम केला आहे. टी 20 वर्ल्ड कप जिंकल्यावर आम्ही चॅम्पियन्स ट्रॉफीदेखील भारतात आणू, असे म्हणणाऱ्या कर्णधार रोहित शर्माने आपल्या संघावरचा विश्वास खरा करून दाखवला. करंडक जिंकल्यावर हा संपूर्ण संघाने दिलेल्या योगदानाचा विजय आहे असेही त्याने आवर्जून सांगितले. दुबई आंतरराष्ट्रीय मैदानावर खेळल्या गेलेल्या आयसीसी चॅम्पियन्स करंडकाच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला पराभूत करत हा करंडक मिळवण्याची हॅटट्रिक साधली. तत्पूर्वी झालेल्या सलग साखळी सामन्यांमध्ये भारताने एकही सामना न गमावता पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या दिग्गजांचा पराभव केला होता. आठ संघांचा सहभाग असलेली ही प्रतिष्ठेची स्पर्धा एक प्रकारे मिनी वर्ल्ड कपच मानली जाते. भारताच्या फिरकी गोलंदाजीने या सामन्यात कमाल केली. कुलदीप यादवने १० षटके गोलंदाजी करून केवळ ४० धावा देऊन दोन महत्वाचे बळी टिपले. त्याला साथ देणाऱ्या वरुण चक्रवर्तीने आपल्या दहा षटकांमध्ये केवळ ४५ धावा देत दोन बळी मिळवले. त्यांना मोलाची साथ देत रवींद्र जडेजा आणि महम्मद शमी यांनी १-१ बळी मिळवला. कुलदीप यादवने भारताच्या ११व्या आणि वैयक्तिक पहिल्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर या स्पर्धेत सातत्याने उत्तम खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या रचीन रवींद्रचा महत्वपूर्ण बळी मिळवला. हार्दिक पंड्या आणि रवींद्र जडेजा प्रत्येकी फक्त एक गडी बाद करण्यात यशस्वी ठरले असले तरी त्यांनी आपल्या दहा षटकांमध्ये न्यूझीलंडच्या फलंदाजांना प्रत्येकी केवळ तीस धावा देऊन दबाव ठेवला. एका दृष्टीने पाहता न्यूझीलंडच्या आयसीसी करंडक मिळवण्याच्या स्वप्नावर भारतीय फिरकीने पाणी फिरवले असे म्हटले तर वावगे ठरू नये.

तत्पूर्वी, रविवार २३ फेब्रुवारी २०२५ रोजी चॅम्पियन ट्रॉफीमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या महत्त्वाच्या सामन्याकडे भारतीय आणि पाकिस्तानी क्रीडाचाहत्यांच्या नजरा लागल्या होत्या. पारंपरिक महत्त्व असलेल्या आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या दोन संघांमध्ये दुबईमध्ये चकमक झाली. या ब्लॉकबस्टर सामन्यात भारताने पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. विराट कोहलीच्या ५१ व्या एकदिवसीय धडाकेबाज शतकामुळे भारताला हा विजय मिळाला. हा सामना भारतीयांच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा होता, कारण यापूर्वी पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय संघाला तीन वेळा पराभूत केले होते. भारतीय संघाने आता त्यांची बरोबरी केली आहे. क्षणाक्षणाला रंगतदार होत गेलेल्या आणि उत्कंठा वाढवणाऱ्या या सामन्यातील विजयाने भारतात होळीच्या सणाआधीच विजयी रंगांची उधळण झाली. राजकीय क्षेत्रापासून सामान्य जनतेने भारतीय संघावर सोशल मीडियाद्वारे अभिनंदनाचा वर्षाव केला. न्यूझीलंडच्या डावाची सुरुवात रचिन रवींद्र आणि विल यंग यांनी झोकात केली. रचिन या स्पर्धेत सातत्याने चांगल्या खेळाचे प्रदर्शन करत असल्याने त्याच्यावर भारतीय गोलंदाजांचे जास्त लक्ष होते. भारताकडून मोहम्मद शमीने गोलंदाजी सुरू केली. न्यूझीलंड क्रिकेट संघाच्या पाच षटकांनंतर ४५ धावा झाल्या असताना २९ धावांवर रचिन रवींद्रचा कॅच श्रेयस अय्यरने सोडला. त्यातून वरुण चक्रवर्तीने भारताला सावरत पहिले यश मिळवून दिले. त्याने विल यंगला १५ धावांवर बाद केले. कुलदीप यादवने अकराव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर रचिन रवींद्रला बाद केले. त्याला फक्त ३७ धावा करता आल्या, म्हणजेच जीवदान मिळाल्यावर कुलदीपने त्याला फक्त आठ धावा काढू दिल्या. न्यूझीलंडचा स्कोअर कमी ठेवण्यात या विकेटचा फार मोठा वाटा होता. परत कुलदीप यादवनेच धोकादायक फलंदाज केन विल्यमसनला फक्त ११ धावांवर परत पाठवले. त्यावेळी न्यूझीलंड क्रिकेट संघाने २० षटकांनंतर शंभर धावांचा टप्पा पूर्ण केला होता. धडाकेबाज टॉम लॅथमला रवींद्र जडेजाने बाद केले. तो फक्त १४ धावा करून बाद झाला. डॅरिल मिशेलने सावध खेळ करत संघाची धावसंख्या १५० च्या पुढे नेली. त्यानंतर वरुण चक्रवर्तीने ग्लेन फिलिप्सला तर मोहम्मद शमीने जलदगती गोलंदाज डॅरिल मिशेलला ६३ धावांवर बाद केले. ही देखील न्यूझीलंडच्या बाजूने मोठी खेळी ठरली. ब्रेसवेल आणि मिशेल यांच्या अर्धशतकांमुळे न्यूझीलंड क्रिकेट संघाने २५१ धावा केल्या.

भारताच्या डावाची वैशिष्ट्ये सांगायची तर, न्यूझीलंडनंतर फलंदाजीला आलेल्या रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी भारताकडून सुरुवात केली आहे. रोहित शर्माने फक्त ४१ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. शुभमन गिलने मात्र त्याच्या आक्रमक खेळाला आवर घालून सावध पवित्रा घेतल्याचे जाणवत होते. सुरवातीलाच एखादा बळी गेल्याने सोपे वाटणारे टार्गेट तळातल्या फलंदाजांना अवघड जाऊ नये, ही कर्णधाराची योजना असावी. आणि त्याला अनुसरून भारताने 10 षटकांमध्ये एकही विकेट न गमावता ६४ धावा केल्या तर १७ षटकांमध्ये रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शतकी भागीदारी केली. तीच भारताच्या विजयात निर्णायक ठरली असे म्हटले तर वावगे ठरू नये. शुभमन गिलचा ३१ धावांवर सँटनरने बळी घेतला, तो या स्पर्धेमध्ये सातत्याने चांगली गोलंदाजी करत होता. विराट कोहली फक्त एक धाव काढल्यानंतर मायकेल ब्रेसवेलच्याच गोलंदाजीवर बाद झाला. त्यावेळी भारतीय फलंदाजी दबावाखाली आली. त्यानंतर भारताने रोहित शर्माची महत्वाची विकेट गमावली. तो ७६ धावांची खेळी खेळून बाद झाला. मूळच्या भारतीय वंशाच्या रचिन रवींद्रने त्याचा बळी घेतला. काइल जेमीसनने श्रेयस अय्यरला ४४ धावांवर जीवदान दिले पण त्याचा फार फायदा न उठवता तो ४८ धावा करून रचिन रवींद्रकडूनच बाद झाला. त्यानंतर अक्षर पटेलला मायकेल ब्रेसवेलने पायचीत केले. त्याच्या जागी आलेला हार्दिक पंड्या गरज नसताना चुकीचा फटका खेळून झेलबाद झाला. त्यानंतर कुठलेही नुकसान न होऊ न देता के. एल. राहुल आणि रवींद्र जडेजा जोडीने भारताला विजय मिळवून दिला.

आज भारत या सुवर्णस्मृतींमध्ये मग्न असला तरी सातत्यपूर्ण आणि धडाकेबाज खेळीमुळे या खेळात महारथी बनला आहे, हे कायम लक्षात ठेवले जाईल.

जो जे वांछील तो ते लाहो!

मागोवा

जनार्दन पाटील

उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ताज्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, भावनिक मुद्दे आणि विकासाची सांगड घालण्याचा प्रयत्न केला असला, तरी एरव्ही आर्थिक शिस्तीचे भोक्ते असलेल्या अजितदादांना लोकानुनयाचा अर्थसंकल्प का जाहीर करावा लागला, हे कोडेच आहे. असे असले, तरी निवडणुकीत दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता टाळून त्यांनी अर्थसंकल्पावर अधिक बोजा पडू दिलेला नाही.

जनतेचे लक्ष लागून असलेला राज्याचा अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. त्याबद्दल राज्यात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. राज्यात सर्वाधिक अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम अजित पवार कदाचित आणखी दोन वर्षांनी प्रस्थापित करतील. आता ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. ताज्या अर्थसंकल्पाचे वाचन करताना त्यांनी शेरोशायरीचा आधार घेण्याचा मोह टाळला; परंतु शेतकरी आणि मराठी भाषेचा उल्लेख करताना काही काव्यपंक्ती जरूर पेरल्या. एक तासाहून अधिक काळ अर्थसंकल्पीय भाषण करताना अजितदादांची अर्थसंकल्पावरची पकड लक्षात येत असली, तरी त्यातील बऱ्याच कामांच्या घोषणा पूर्वीच झाल्या आहेत. त्यात नावीन्याचा अभाव आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अगदी गेल्या आठवड्यात केलेल्या घोषणांपर्यंतचा समावेश अर्थसंकल्पीय भाषणात असल्याने अर्थसंकल्प हा पूर्वीच्या घोषणांची तुकडेजोड आहे का, असा प्रश्न पडावा अशी स्थिती दिसली. विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात लाडक्या बहिणींना 2100 रुपये देण्याच्या तसेच शेतकऱ्यांच्या नियोजीत कर्जमाफीचा त्यात कुठेही उल्लेख नाही. अर्थात लाडक्या बहिणींसाठी 36 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीची घोषणा त्यांनी केली. या उपक्रमासाठी गेल्या वर्षी जुलै ते फेब्रुवारीदरम्यान 32 हजार कोटी रुपये लागले असताना आता पुढच्या वर्षभरासाठी केलेली तरतूद पाहता लाडक्या बहिणींच्या लाभार्थी संख्येत मोठी घट होणे अपेक्षित धरले आहे. केंद्रीय महालेखापालांनी अनुनयाच्या योजनांमुळे व्यक्त केलेली नाराजी आणि केंद्र सरकारने केलेली कानउघाडणी यामुळे कदाचित आणखी लोकानुनयी जादा खर्चाच्या घोषणा अजितदादांनी टाळल्या असाव्यात.

असे असले, तरी अजितदादांनी अनेक योजनांच्या तरतुदींमध्ये वाढ केली. महिला आणि बालकल्याण, दलित, आदिवासी आदी घटकांसाठी जादा तरतूद केली असली, तरी गेल्या काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता वर्षअखेरीस अनुनयाच्या योजनांसाठी या महत्त्वाच्या घटकांच्या खर्चाला कात्री लावली जाते, हे विसरता येणार नाही. हा अर्थसंकल्प सादर करताना अजितदादांच्या डोक्यात जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपंचायती आणि महापालिकांचा विचार आहे, हे त्यांनी केलेल्या तरतुदीवरून दिसते. पुणे-शिरूर उन्नत मार्ग, नवी मुंबई विमानतळ, वाढवण बंदर, चौथी मुंबई, पुणे-मुंबईतील मेट्रो, नाशिकचा कुंभमेळा आदींबाबतच्या त्यांच्या घोषणा एकतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्तेबांधणी मंत्री नितीन गडकरी किंवा फडणवीस यांनी यापूर्वीच केल्या आहेत. केंद्र सरकारच्या निधीतून उभ्या राहणाऱ्या योजनांचा राज्याच्या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला आहे. अर्थात त्याबद्दल त्यांनी मोदी यांचे आभार मानण्याची कृतज्ञता दाखवली. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. त्याची घोषणा अजितदादांनी केली असली, तरी त्यासाठी तरतूद मात्र अत्यल्प आहे.

अर्थसंकल्पीय भाषणात अजितदादांनी महाराष्ट्राचा विकास, पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, परकीय गुंतवणूक, आद्यौगिक क्षेत्रातील वाढ यासह विविध विषयांवर भाष्य केले. ‘लाडक्या बहिणी मिळाल्या, धन्य झालो; केली विकासाची कामे म्हणून आम्ही पुन्हा आलो.. पुन्हा आलो..’असे म्हणत लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळेच राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्याची जाणीव त्यांनी ठेवली. महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकसित भारत, विकसित महाराष्ट्राचे लक्ष्य ठेऊन महाराष्ट्र विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. महाराष्ट्रात देशी व विदेशी गुंतवणूक आकर्षित होत आहे. महाराष्ट्रात 15 लाख 72 हजार 654 कोटींची गुंतवणूक होत आहे. त्यातून, लाखोंची रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी सांगितले असले, तरी आर्थिक पाहणी अहवालात मात्र उत्पादन क्षेत्रात झालेली घट पाहता ही गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात न होता अन्य क्षेत्रात झाली का, असा प्रश्न पडतो. राज्याचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर करताना त्यांनी केलेली आणखी एक महत्त्वाची घोषणा म्हणजे उद्योगांना पुरवल्या जाणाऱ्या विजेच्या दरातील कपात. अर्थात या घोषणेतही काहीच नावीन्य नाही. वीज नियामक आयोगाला गेल्या महिन्यात महावितरणने

पाठवलेल्या प्रस्तावात त्याचा उल्लेख आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत कमी दर असतील, अशा मोघम घोषणेतून विजेचे दर काय असतील, हे मात्र ध्वनित होत नाही. शेजारच्या कर्नाटक, गुजरात, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशापेक्षा आणि स्पर्धक असलेल्या तमिळनाडूसह अन्य राज्यांपेक्षा कमी दर असतील, तरच उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणूक करतील.

सरकारतफे स्वतंत्र शेती धोरणही नंतर जाहीर करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच ‘ग्रोथ हब’ म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार-बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या 140 बिलियन डॉलरवरून 2030 पर्यंत 300 बिलीयन डॉलर, तर 2047 पर्यंत 1.5 ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया येथून मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासासाठी अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात येणार आहे. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात असमान विकास आणि राज्यातील जिल्ह्यांचे असमान दरडोई उत्पन्न याचा विचार करता मुंबईला आणखी जादा प्रकल्प आणि तुलनेने छत्रपती संभाजीनगर वगळता मराठवाडा, नागपूर वगळता विदर्भ आणि नाशिक वगळता उत्तर महाराष्ट्रात मात्र विकासाला आणखी काही गती देता येईल, याचा विचार केलेला नाही.

महाराष्ट्रात आता नागरी लोकसंख्येचे प्रमाण पन्नास टक्क्यांवर गेले असल्याचा अंदाज आहे. नागरी भागात पायाभूत सुविधा दिल्याच पाहिजेत; परंतु त्याचबरोबर ग्रामीण भागाची उपेक्षा केली, तर शहरांकडे स्थलांतर वाढत जाईल आणि पायाभूत सुविधांवर आणखी ताण पडेल, हे लक्षात ठेवले पाहिजे. मुख्यमंत्री पालकमंत्री असलेला गडचिरोली जिल्हा आता ‘स्टील हब’ म्हणून उदयाला येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्यासाठी 21 हजार 830 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून सात हजार 500 इतकी रोजगारनिर्मिती होणे अपेक्षित आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गाचे जाळे विकसित केले जात असून त्यासाठी पहिल्या टप्प्यात सुमारे 500 कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. एकीकडे राज्याचा खर्च वाढतो आहे. दोन वर्षांमध्ये अडीच लाख कोटी रुपयांचे कर्ज फेडायचे आहे. वित्तीय तूट 45 हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा पुरवणी मागण्यांमध्ये पुन्हा एक लाख कोटी रुपयांपर्यंतच्या मागण्या मांडून आर्थिक शिस्त बिघडवली जाते. महसुली तूट आणि वित्तीय तूट निकषांपेक्षा कमी असल्याचे सांगितले जात असले, तरी ती आणखी कमी ठेवणे आवश्यक आहे. राज्यावरचे कर्ज आता पावणेआठ लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल. त्यामुळे अनावश्यक खर्चावर नियंत्रण आणले पाहिजे; परंतु सध्या इतर पक्षांकडून असलेला दबाव पाहता अजितदादांना आपल्या स्वभावाला मुरड घालावी लागत असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा, वाहतुकीची कोंडी याचा उल्लेख अजितदादांच्या अर्थसंकल्पीय भाषणात होता. एसटीच्या सहा हजार गाड्यांचे सीएनजी आणि पीएनजीमध्ये रुपांतर करण्याची घोषणा त्यांनी केली; परंतु एसटीचे देणे आणि नवीन बसखरेदीच्या तरतुदीचा उल्लेख नाही. राज्यातील वेगवेगळी महामंडळे पांढरे हत्ती ठरत असताना आता आणखी 18 महामंडळाचा बोजा सरकारवर पडणार आहे. सरकारच्या उत्पन्नवाढीला आता मर्यादा आहेत. अजितदादांनी राज्यातील वाहनांवर कर लावून ती महाग केली आहेत तसेच दुसरा मुद्रांक वापरताना त्याची किंमत शंभर रुपयांवरून थेट एक हजार रुपये केली आहे, याचीही नोंद घ्यायला हवी. एकुणात मात्र फारशी करवाढ न लादणारा, मागील पानावरुन पुढे नेणारा असा हा मध्यममार्गी अर्थसंकल्प आहे, असे म्हणता येईल.

भावनांचा आदर करा

समुपदेशन

मी ३२ वर्षांचा तरुण असून गेल्या चार वर्षांपासून एका मुलीच्या प्रेमात आहे. आमच्यात सगळं सुरळीत सुरू होतं. पण आता तिने माझ्यामागे लग्नाचा तगादा लावला आहे. मला तिच्याशी लग्न करायचं आहे. पण वयाची ३५ वर्षं पूर्ण झाल्यानंतरच लग्न करेन हे मी तिला आधीच सांगितलं होतं. पण आता ती याकडे दुर्लक्ष करत असावी. मला चांगली नोकरी आहे. पण लग्नासाठी माझी मानसिक तयारी झालेली नाही. मला थोडा वेळ हवा आहे. पण ती थांबायला तयार नाही. दुसऱ्या मुलासोबत लग्न करण्याची धमकी देऊ लागली आहे. माझं तिच्यावर खूप प्रेम आहे. मला तिला गमवायचंही नाही. मी काय करू?

– चार वर्षांच्या नातेसंबंधांमध्ये आपल्या योजना काही प्रमाणात बदलाव्या लागतात. तुला तीन वर्षांनंतर लग्न करायचं आहे. पण लग्नाबाबत तिच्या वेगळ्या कल्पना असू शकतात. आता लग्नासाठी तुझी मानसिक तयारी नाही म्हणजे नेमकं काय, याचा विचार कर. तुझी बाजू तिला नीट समजावून सांग. दोघांनीही शांतपणे बसून बोलायला हवं. तू थोडा कालावधी कमी कर, ती थोडा कालावधी वाढवेल. तुम्ही दोघांनीही सुवर्णमध्य साधायला हवा. तू आयुष्यात स्थिरस्थावर आहेस. त्यामुळे तुमच्यात दुरावा यायला नको. त्यामुळे एकमेकांना समजून घ्या. भावनांचा आदर करा आणि योग्य तो मार्ग काढा.

खेचाखेची

हात लावू नका...

मन्याला रस्त्यात लावलेले
फलक वाचायचा भारी नाद
असतो.
एकदा रात्री घरी येताना
त्याला एक फलक दिसतो.
रात्र असल्यानं सगळं अंधुक
दिसत असतं. म्हणून मन्या
स्पायडर मॅन सारखा सर सर
खांबावर चढतो.
तिथे बोर्डावर लिहिलेलं
असतं...
...’खांबाला लावलेला रंग
ओला आहे, हात लावू नका.’

वेगळं काही

उत्तराखंडमधील चीनला लागून असणाऱ्या सीमेजवळच्या एका गावात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची गरिबी दूर होते असं म्हणतात. इथे येणाऱ्यांची सगळी पापं धुतली जातात अशीही श्रद्धा आहे. समुद्रसपाटीपासून १०,२४८ फूट उंचीवर असलेलं हे भारताच्या हद्दीतलं अखेरचं गाव आहे. गावाच्या निर्मितीसंबंधी एक आख्यायिका आहे. माणिक शाह नावाचा एक व्यापारी शिवभक्त होता. एकदा प्रवासात चोरांनी त्यांचं मुंडकं छाटलं. त्यानंतरही तो शंकराचं नाव घेत राहिला. प्रसन्न झालेल्या शंकराने त्याच्या धडावर वराहाचं शीर लावलं. यानंतर गावात मणीभद्र या नावाने त्याची पूजा होऊ लागली. या मणिभद्राकडे प्रार्थना केली तर दारिद्र्य दूर होतं असं इथले लोक मानतात.

राशीभविष्य

- **मेष** : प्रवास सुखकर होईल. कार्यक्षेत्र विस्तारेल. लोकांचा तुमच्यावरील विश्वास वाढेल. स्वास्थ्य लाभेल.
- **वृषभ** : आरोग्याच्या जुन्या तक्रारी वाढतील. आर्थिक गुंतवणूक योग्य पद्धतीने करा. प्रवास टाळायला हवा.
- **मिथुन** : भेटीगाठीत अनुकूलता राहील. प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळेल. आनंदी रहाल. वाहनसौख्य लाभेल.
- **कर्क** : अनपेक्षित धनलाभ झाल्यामुळे समाधान वाढेल. द्विधा मनस्थिती सुधारेल. विचार ठाम ठेवावेत.
- **सिंह** : भावंडांचं सहकार्य लाभेल. महत्त्वाचे निर्णय विचाराने घ्यावे. स्थावर प्रश्नातून मार्ग निघणार आहे.
- **कन्या** : व्यवसायात चांगली प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळायला हवा. नव्या कामांना गती मिळेल.
- **तूळ** : पूर्वनियोजित कार्यक्रमात बदल होतील. अपेक्षित घटना घडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.
- **वृश्चिक** : व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध होईल. योग्य व्यक्तींचं मार्गदर्शन लाभेल. अडचणी दूर होतील.
- **धनु** : व्यवसायात फायदा होईल. नशिबाची चांगली साथ लाभेल. आपापल्या क्षेत्रात नावलौकीक वाढेल.
- **मकर** : शैक्षणिक क्षेत्रात प्रगती होईल. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : नोकरीनिमित्त प्रवास घडेल. व्यवसायात स्थिरता लाभेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे.
- **मीन** : जनसंपर्कातून फायदा होईल. नवे प्रकल्प राबवता येतील. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.

सल्ला मोलाचा

ट्रेंडनुसार निवडा एंगेजमेंट रिंग

एंगेजमेंट रिंगच्या काही हॉट ट्रेंड्सविषयी...

* थ्री स्टोन रिंग– या अंगठीमुळे क्लासिक लूक मिळण्यास मदत होते. प्लॅटिनम किंवा गोल्ड या दोन्ही कॉम्बिनेशनसोबत ही रिंग खास दिसते. * यलो डायमंड रिंग– एंगेजमेंट रिंगमध्ये व्हाईट डायमंड कायम ट्रेंडमध्ये होते. पण यावेळी व्हाईट डायमंडची जागा यलो डायमंड रिंगने घेतली आहे. रेडियंट कटने सजलेली ही रिंग नववधूच्या सौंदर्यात भर घालेल यात शंका नाही. * मायक्रो पेव्ह असलेली रोज गोल्ड रिंग– मायक्रो पेव्ह रिंगचा पॅटर्न ऑलटाईम फेव्हरेट आहे. या रिंगमुळे सोबर लूक मिळण्यास मदत होते. साध्या सोप्या डिझाईनची आवड असणाऱ्या तरुणींसाठी हा योग्य पॅटर्न आहे. नेहमीच्या पांढऱ्या रंगापेक्षा रोज गोल्ड रिंग हा प्रकार तरुणींमध्ये लोकप्रिय होताना दिसून येत आहेत. * ओव्हल शेप किंवा कुशन कट रिंग– थोड्याश्या मोठ्या डिझाईनची इच्छा बाळगून असणाऱ्या तरुणींसाठी हा पर्याय सर्वोत्तम आहे. या आकारातील अंगठ्या बोटांमध्ये उठून दिसतात.

११ मार्च

दिनविशेष

- **२०१३** : दिल्लीतील सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपी राम सिंह याची कारागृहात आत्महत्या.
- **२०१४** : छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी केंद्रीय राखीव सुरक्षा दल आणि पोलिसांच्या संयुक्त तुकडीवर केलेल्या हल्ल्यात १५ जवान हुतात्मा.
- **२०१८** : सर्व बँक व्यवहार दागिने क्षेत्रात घडले असून त्यातील सूत्रधार गुजरातमधील असल्याचा पी. चिदंबरम यांचा आरोप.

महत्त्वपूर्ण काही...

दूध का ऊतू जातं?

दुधात प्रथिनं, साखर आणि फॅट्स असे घटक असतात. दूध गरम करायला ठेवल्यानंतर त्यातली प्रथिनं आणि फॅट्स हे घटक वेगळे होतात. प्रथिनं आणि फॅट्सचं तुलनेने हलके असल्याने ते पृष्ठभागावर येतात. यालाच आपण साय म्हणतो. दुधात पाण्याचं प्रमाणही बरंच जास्त असतं. दूध गरम करण्याच्या प्रक्रियेदरम्यान यातल्या पाण्याचं बाष्पीभवन होतं. हे बाष्प वजनाने हलकं असल्याने वर येतं. पण दुधाच्या वरच्या भागात आधीच सायीचा थर तयार झालेला असल्याने हे बाष्प त्याखाली अडकून बसतं. दुधाला अजून उष्णता मिळाल्यानंतर हे बाष्प प्रसरण पावतं आणि दुधाच्या वरच्या भागात जाडसर फे स तयार होतो. यानंतर सायीच्या थराच्या खालच्या भागात अडकून पडलेलं बाष्प हा थर वर सरकवतं आणि अखेरीत या थराला भेदत बाहेर पडतं. बाष्प बाहेर येण्याच्या या प्रक्रियेमुळे दूध आणि साय भांड्याबाहेर सांडतात. मोठ्या दांड्यांचा चमचा दुधात ठेवल्यास बाष्पाला बाहेर जायला मार्ग मिळतो आणि दूध ऊतू जात नाही.

आरोग्यमंत्र

कसं असतं रक्त?

रक्त हा लाल रक्त पेशी, पांढऱ्या रक्त पेशी आणि बिंबिका यांनी बनलेली गुंतागुंतीची रचना असणारा जैविक द्रव पदार्थ आहे. रक्ताचा मुख्य घटक पाणी आहे. रक्त हा एकमेव द्रव उती आहे. रक्तामध्ये लाल रक्तपेशींचं प्रमाण सर्वाधिक असतं. या पेशींमधील हिमोग्लोबिन या घटकामुळे रक्त लाल रंगाचं दिसतं. हिमोग्लोबिनमुळे प्राणवायू आणि कार्बन डायॉक्साइड रक्तात विरघळू शकतात आणि त्यांचं वहन करणं सुलभ बनतं. पांढऱ्या रक्त पेशींमुळे संसर्गाला प्रतिबंध होतो तर बिंबिकांमुळे रक्ताची गुठळी होण्यास मदत होते. पृष्ठवंशी प्राण्यांचं रक्त तांबड्या रंगाचं असतं. संधिपाद प्राणी आणि मृदुकाय प्राण्यांच्या रक्तामध्ये प्राणवायू वहनासाठी हिमोग्लोबिनऐवजी हिमोसायनिन असतं. कीटक आणि काही मृदुकाय प्राण्यामध्ये हिमोलिंफ नावाचा द्रव प्राणवायू वहनाचं कार्य करतो. हिमोलिंफ बंद रक्तवाहिन्यामध्ये नसतं. ते रक्तवाहिन्या आणि शरीर यांच्यामधल्या पोकळ्यांमधून वाहतं. बहुतेक कीटकांच्या रक्तामध्ये प्राणवायू वहनासाठी हिमोग्लोबिनसारखा वाहक रेणू नसतो. कीटकांच्या लहान आकारामुळे त्यांच्या शरीरातील श्वासनाल सर्व भागापर्यंत प्राणवायू वहनाचं कार्य करतात. जंभ पृष्ठवंशी प्राण्यामध्ये पांढऱ्या पेशींवर आधारलेली प्रतिरोधक यंत्रणा असते. या पेशी परजीवी जिवाणूंचा प्रतिकार करतात. बिंबिका या रक्त क्लथन (गोठणे) होण्यासाठी आवश्यक असतात. संधिपाद प्राण्यामध्ये असलेल्या हिमोलिंफमध्ये असलेल्या हिमोसाइट प्रतिरोधक्षम असतात.

पंचांग

मंगळवार, ११ मार्च २०२५
क्रोधीनामसंवत्सर, शके १९४६, फाल्गुन शु. १२, नक्षत्र : अश्लेषा, चंद्रराशी : कर्क, योग : अतिगंड, सूर्योदय : ६.५२, सूर्यास्त : ६.४५

फॉरवर्डस

एकटेपणाचं दुःख, वेदना हलक्या करण्यासाठी कवी म्हणतो...

कुछ तो तन्हाई की रातों में सहारा होता,
तुम न होते न सही ज़िक्र तुम्हारा होता!!

वाचा तर खरं

बारावीनंतर सायकॉलॉजी हा विषय घेऊन पदवी परीक्षा उत्तीर्ण होता येईल. कला शाखा घेऊन तुम्ही सायकॉलॉजीची निवड करू शकता पण विज्ञान शाखा असली तरी सायकॉलॉजी घेऊन बीएससी ऑनर्स करता येईल. संवादकौशल्य, संवेदनशीलता, आत्मविश्वास, समोरच्या व्यक्तीचं ऐकून घेण्याची क्षमता, सहानुभूती, समोरच्या व्यक्तीच्या समस्येशी जोडलं जाण्याची कला तुम्हाला अवगत असायला हवी. इतरांचे प्रश्न सोडवण्यासाठी तुम्ही मानसिकदृष्ट्या सक्षम असायला हवं. खासगी, सरकारी शाळा, विद्यापीठं, रुग्णालयं या ठिकाणी तुम्ही नोकरी करू शकता.

‘राष्ट्र संचार’ (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

युनियन बँक व महाराष्ट्र चेंबर चे कार्य कौतुकास्पद : चंद्रकांत पुलकंडवार

विविध क्षेत्रातील उद्योजकासाठी मार्गदर्शन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

बारामती : विविध क्षेत्रातील नवीन तरुण उद्योजक तयार झाले पाहिजेत, वाढत्या स्पर्धेत ते टिकले पाहिजे व अनुभवी उद्योजकांचा विस्तार झाला पाहिजे तरच वाढती बेरोजगारी दूर होईल. सर्वांना रोजगार प्राप्ती होईल अशा आदर्शवत उपक्रमासाठी युनियन बँक व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड एग्रीकल्चर यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन पुणे विभागाचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकंडवार यांनी केले.

शनिवार दि.७ मार्च रोजी बारामती येथे युनियन बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अग्रिकल्चर बारामती शाखा यांच्या संयुक्त विद्यमानाने उदोजक, व्यापारी, शेतकरी व विविध क्षेत्रातील व्यवसायिक यांच्यासाठी 'सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग व कृषी क्षेत्र ' यांच्या साठी युनियन बँकेच्या विविध योजना, सेवा, सुविधा आदीसाठी बँकेच्या मान्यवरांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्र संगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकंडवार मार्गदर्शन करत होते

या प्रसंगी युनियन बँक चे झोनल हेड नवीन जैन, रिजनल हेड मयंक भारद्वाज, एमआयडीसी चे प्रादेशिक व्यवस्थापक हनुमंत पाटील, डेप्युटी रिजनल हेड श्रीप्रसाद भालवणकर, महाराष्ट्र चेंबर चे विभागीय चेअरमन शरद सूर्यवंशी, व्हा.चेअरमन शिवाजी निंबाळकर,सुशीलकुमार सोमाणी, बँकेचे एम एस एम ई कर्ज विभाग प्रमुख अभिषेक कुमार, बारामती शाखाप्रमुख संजीव कुमार व चेंबर चे सदस्य जगदीश पंजाबी, सुरेश परकाळे, राहुल शहा, पुरण सैनी, शरद गोपाळे व इतर मान्यवर उपस्थित होते. व्यावसायिक, उद्योजक, शेतकरी यांच्या बँकिंग क्षेत्रातील प्रत्येक समस्यांचे निराकरण करण्यासाठी व नवीन उदोजक यांना उभारी देण्यासाठी युनियन बँक प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन झोनल हेड नवीन जैन यांनी सांगितले. याप्रसंगी मोनिका सुर्वे आणि विद्याधर काटे या ग्राहकांनी बँकेने केलेल्या सहकार्या बदल आभार व्यक्त केले. सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीप्रसाद भालवणकर यांनी केले.

> महाराष्ट्र चेंबर नेहमी उद्योजकांचा पाठीशी उभे असून बारामती परिसरातील उद्योजकांचा विविध क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांचे अनुभव मिळावेत म्हणून व्याख्यान, शासन दरबारी उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न, विविध बँकेचे कर्ज मिळावेत म्हणून बँकिंग क्षेत्रातील तज्ञांची कार्यशाळा, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत उद्योजकांचा सन्मान आदी कामे करीत असताना उद्योजकांच्या हिताराठी नेहमी कटिबद्ध राहणार आहे.
>
> -शरद सूर्यवंशी, विभागीय चेअरमन

कार्यक्रमाची वैशिष्ट्ये

- १) शासनाच्या वतीने एमआयडीसी परिसरातील सर्व उद्योजकांना नेहमी सहकार्याची भूमिका राहणार.
- २) विविध कर्ज प्रकरणे मंजुरी चे पत्र मान्यवरांचा हस्ते देण्यात आली
- ३) बँकेच्या विविध योजना, सेवा, सुविधा आदीसाठी बँकेच्या मान्यवरांचे मार्गदर्शन लक्षवेधी होते.

'आयपीएल'मध्ये तंबाखू, अल्कोहोलच्या जाहिराती-विक्रीवर बंदी घालावी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ला सामन्यांच्या वेळी मैदानाच्या परिसरात तसेच सामन्यांच्या प्रसारणा दरम्यान तंबाखू, अल्कोहोलच्या जाहिरातींवर बंदी घालण्यास सांगितले आहे.

यासंबंधी आरोग्य सेवा महासंचलनालयाने (डीजीएसएस) आयपीएलचे अध्यक्ष अरुण सिंग धुमल यांना पत्र लिहीले आहे. दरवर्षी तंबाखूमुळे भारतात १४ लाख मृत्यू होतात, असे पत्रात म्हटले आहे. २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल हंगामापूर्वी सरकारने हा पत्र व्यवहार केला आहे.

या पत्रात 'डीजीएचएस'चे प्रमुख अतुल गोयल यांनी भारतातील हृदयरोग, कर्करोग, दीर्घकालीन फुफ्फुसांचे आजार, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारख्या असंसर्गजन्य आजारांच्या (एनसीडी) वाढत्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी निदर्शनास आणून दिले की देशातील वार्षिक मृत्यूच्या आकडेवारीपैकी ७० टक्क्यांहून अधिक मृत्यूंसाठी तंबाखू आणि अल्कोहोल हे जबाबदार प्रमुख घटक आहेत.

डीजीएचएसच्या पत्रातील तीन प्रमुख मुद्दे

- खेळ आणि संबंधित आयपीएल सामने/कार्यक्रम आयोजित केलेल्या मैदानाच्या परिसरात तसेच प्रसारणा दरम्यान सर्व प्रकारच्या तंबाखू आणि अल्कोहोलच्या जाहिरातींवर पूर्ण बंदी घाला.
- आयपीएलशी संबंधित ठिकाणांवर तंबाखू आणि अल्कोहोल विक्रीवर बंदी.
- तंबाखू किंवा अल्कोहोलशी संबंधित ब्रँडचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे समर्थन करणाऱ्या खेळाडू आणि समालोचकांना प्रोत्साहन देऊ नये.

At a Glance

छत्तीसगडमध्ये ईडीची मोठी कारवाई

नवी दिल्ली : छत्तीसगडमध्ये अंमलबजावणी संचालनालयाची मोठी कारवाई सुरू आहे. कथित दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणाच्या संदर्भात ईडीने छत्तीसगडमधील १४ ठिकाणी छापे टाकले आहेत. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते भूपेश बघेल यांच्या मुलाच्या निवासस्थानी ही ईडीने धाड टाकली आहे. दरम्यान, भूपेश बघेल यांच्या कार्यालयाकडून या कारवाईवर टिपणी करण्यात आली आहे. सात वर्षांपासून सुरू असलेला खोटा खटला न्यायालयात फेटाळण्यात आला असताना, आज सकाळी ईडीचे पाहुणे माजी मुख्यमंत्री, काँग्रेस सरचिटणीस भूपेश बघेल यांच्या मिलाई येथील निवासस्थानी दाखल झाले आहेत. जर कोणी या कटाद्वारे पंजाबमध्ये काँग्रेसला रोखण्याचा प्रयत्न करत असेल तर तो गैरसमज आहे.

उत्तर कोरियाने डागले क्षेपणास्त्र

नवी दिल्ली : उत्तर कोरियाने सोमवारी अनेक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र समुद्रात डागल्याची माहिती दक्षिण कोरियाच्या लष्कराने दिली. याआधीच दक्षिण कोरिया आणि अमेरिका यांनी संयुक्त लष्करी सरावाला सुरुवात केली होती, ज्याला उत्तर कोरिया संभाव्य आक्रमणाची तयारी मानतो. या क्षेपणास्त्र चाचण्या उत्तर कोरियाच्या यंदाच्या पाचव्या चाचण्या असल्याचे दक्षिण कोरियाच्या लष्कराने स्पष्ट केले. हा लष्करी सराव ११ दिवस चालणार असून, याच्या पार्श्वभूमीवर उत्तर कोरियाने अमेरिकेवर आणि दक्षिण कोरियावर गंभीर आरोप केले आहेत.

प्रमुख तीर्थस्थळांसाठी पुण्याहून विशेष रेल्वे हवी

खासदार मेधा कुलकर्णी यांची राज्यसभेत मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : 'भारत गौरव योजने'अंतर्गत पुण्याहून प्रमुख तीर्थस्थळांसाठी विशेष रेल्वे गाड्या सुरु कराव्यात, अशी मागणी खासदार मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेत केली. रेल्वे बजेटवरील चर्चेत कुलकर्णी यांनी नवी दिल्ली - बेंगळुरू आणि नवी दिल्ली - हैदराबाद मार्गावर धावणाऱ्या राजधानी रेल्वे गाड्या दररोज किंवा आठवड्यातून तीन-तीन दिवस पुणेमार्गे वळवल्या जाव्या. पुणे-नाशिक दरम्यान थेट रेल्वे सेवा त्वरित सुरू करावी, अशा मागण्याही केल्या.

खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, पुण्याहून हजारो भाविक वैष्णोदेवी, तिरुपती, चारधाम, काशी, रामेश्वरम आणि शिर्डी येथे प्रवास करतात. मात्र, या ठिकाणी जाण्यासाठी नियमित तीर्थयात्रा गाड्या उपलब्ध नाहीत. 'भारत गौरव योजने'अंतर्गत पुण्याहून धार्मिक स्थळांसाठी विशेष गाड्या चालवल्या पाहिजेत.

पुणे हे देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. मात्र, राजधानी, वंदे भारत किंवा तेजस सारख्या हाय स्पीड ट्रेन्स येथून दिल्ली, कोलकाता, चेन्नई आणि हैदराबाद सारख्या प्रमुख महानगरांना उपलब्ध नाहीत. यामुळे व्यापारी, उद्योगपती, विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठी गैरसोय होते. सध्या नवी दिल्ली ते पुणे दरम्यान सुमारे ३-४ गाड्या धावतात आणि सुमारे १५५० किमी अंतर कापतात. यातील सर्वात वेगवान गाड्या, जसे की झेलम एक्सप्रेस आणि गोवा एक्सप्रेस, सुमारे २५ ते २८ तास घेतात. पुण्याहून राजधानी एक्सप्रेस धावत नाही, त्यामुळे प्रवाशांना राजधानी पकडण्यासाठी प्रथम मुंबईला जावे लागते. दिल्ली ही देशाची राजधानी आहे आणि पुणे हे वेगाने वाढणारे महानगर आहे. म्हणूनच राजधानी एक्सप्रेस किंवा वंदे भारत सारख्या हाय स्पीड ट्रेनची नितांत गरज आहे, असे कुलकर्णी म्हणाल्या.

पुणे आणि हैदराबाद हे दोन्ही आयटी आणि ऑटोमोबाईल हब आहेत पण त्यांच्यामध्ये तेजस किंवा वंदे भारत ट्रेन नाही. ज्यामुळे व्यवसाय आणि पर्यटनावर परिणाम होतो. पुणे आणि नाशिक ही महाराष्ट्रातील दोन प्रमुख औद्योगिक आणि कृषी केंद्रे आहेत. परंतु त्यांच्यामध्ये थेट रेल्वे सेवा नाही, असेही त्या म्हणाल्या.

अमेरिकेवर इस्रायल संतापले

नवी दिल्ली : गाझामधील इस्रायल आणि हमास यांच्यातील तणाव कमी होण्याचे नाव घेत नाही. शस्त्रसंधीचा पहिला टप्पा आठवडा उलटला असून दुसऱ्या टप्प्याची चिन्हे दिसत नाहीत. दरम्यान, रमजानच्या पवित्र महिन्यात इस्रायलने आधी गाझाननागरिकांसाठी मदत साहित्य घेऊन जाणारे ट्रक थांबवले आहेत आणि आता वीजपुरवठा खंडित केला आहे. दरम्यान, गाझा युद्धविरामाबाबत अमेरिका आणि हमासच्या प्रतिनिधींमध्ये गुप्त चर्चा झाली. या गुप्त बैठकीमुळे इस्रायल संतापला आहे. या बैठकीत त्याचा समावेश व्हायला हवा होता, असा इस्रायलचा आरोप आहे. अमेरिकेचे बंधक विषयक विशेष दूत ॲडम बोहलर यांनी हमासबरोबरच्या गुप्त चर्चेबाबत इस्रायलची नाराजी फेटाळून लावत आम्ही इस्रायलचे एजंट नाही.

धंगेकरांच्या राजीनाम्यानंतर सपकाळ यांचा हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : पुण्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. कसबा विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी काँग्रेस पक्षाला राजीनामा दिला आहे. मागील काही दिवसांपासून धंगेकर पक्ष सोडणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. अखेर आता ते काँग्रेसला रामराम करत शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेश करणार आहेत. ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटणार आहेत. या भेटीवेळी पक्षप्रवेशाबाबतची तारीख ठरणार असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मी धंगेकरांबद्दल इतकच बोलेल की, धंगेकर कोण होतास तू , काय झालास तू..., खरंतर अनेक दिवसांपासून धंगेकर जाणार अशा चर्चा होत्या. पक्षाने त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी हा भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या राजकारणाचा एक बळी आहे. शिवसेनेने त्यांना काही देऊ केले असेल, त्याच्यासाठी त्यांना शुभेच्छा, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

पान १ वरून

विकसित महाराष्ट्राच्या दिशेने

राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

मुंबईची अर्थव्यवस्था १.५ ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेणार : आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून भांडवली खर्चातील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलीयन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरीडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.

वस्तु व सेवा करात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के वाढ : वस्तु व सेवा करातून राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे. महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरीता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

राज्याच्या वार्षिक योजनेत ३३ टक्के इतकी वाढ : नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.

योजनांचे मुल्यमापनसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन : राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे : थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल.

म्हणून आम्ही पुन्हा आलो...

महाराष्ट्र आता थांबणार नाही, असा संकल्प मुख्यमंत्र्यांनी केला आहे. विकसित भारत तयार करण्यासाठी आम्ही राज्यातील शाश्वत कामे हाती घेतली आहे. आम्ही कृषी आणि सामाजिक क्षेत्रासाठी काम करणारा हा अर्थसंकल्प आहे. महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही.

अजित पवार यांनी राज्यात होणारी गुंतवणुकीचा आढावा अर्थसंकल्पीय भाषणात घेतला. ते म्हणाले, राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. शासनाने पायाभूत सुविधांवर केलेल्या गुंतवणुकीमुळे देशी आणि परदेशी गुंतवणुकीत वाढ होत आहे. त्यामुळे रोजगार वाढत असून उत्पन्नात वाढ होत आहे. येत्या काळात १५ लाख ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. १६ लाख रोजगारांची निर्मिती होणार आहे. आपण १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा तयार केला आहे. या कार्यक्रमामुळे प्रशासन पारदर्शी होणार आहे. आम्ही उत्कृष्ट कार्यकरणा-या कार्यालयांचा गौरव करणार आहोत.

शिवसृष्टीसाठी आणखी ५० कोटी देण्यात येणार

मिळविणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या खुणा महाराष्ट्रात जिथे आहेत, त्यात कोकणातील संगमेश्वर हे एक प्रमुख ठिकाण आहे. औरंगजेबाच्या महाकाय सेनेशी महाराजांनी बोटावर मोजता येतील एवढ्या शूर मावळ्यांना सोबत घेऊन येथेच पराक्रमाची शर्थ केली. स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या स्वाभिमानी राजाच्या पराक्रमाची स्मृती कायमस्वरुपी जपण्यासाठी संगमेश्वर येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा मी करत असल्याचे अजित पवार म्हणाले.

छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या मौजे तुळापूर आणि समाधीस्थळ मौजे वढु बुद्रुक येथे त्यांच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. दरवर्षी एका प्रेरणादायी गीताला "छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत" पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णयही शासनाने नुकताच घेतल्याची माहिती अजित पवारांनी दिली.छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक महाराष्ट्रात उभारले जाणार आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात मोठी घोषणा केली आहे.

स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येणार असल्याचे त्यांनी अर्थसंकल्प जाहीर करताना सांगितले.

महाराष्ट्र आता थांबणार नाही

राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याद्वारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली.

तपास यंत्रणा त्रास देत असल्याचा कांगावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

बेंगळुरू : सोन्याच्या तस्करीप्रकरणी पोलिसांनी अटक केलेली कन्नड चित्रपट अभिनेत्री आणि डीजीपीची मुलगी रान्या राव हिला बेंगळुरूच्या विशेष न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सोमवारी जेव्हा तिला न्यायालयात हजर करण्यात आले, तेव्हा रान्या न्यायालयात रडली. महसूल गुप्तचर संचालनालयाचे (डीआरआय) अधिकारी आपल्याला त्रास देत आहेत आणि शिवीगाळ करत आहेत, असे कांगावा रान्या हिने केला. मात्र, अधिकारी आपल्याला शारीरिक त्रास देत नसून तोंडी त्रास देत असल्याचे तिने म्हटले आहे. आपण हादरून गेलो असून, भावनिकरित्या तुटलो आहोत, असे रान्या हिने म्हटले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, रान्याने कोर्टात दावा केला की जेव्हा तिने डीआरआय अधिकाऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे थांबवले तेव्हा अधिकाऱ्यांनी तिला त्रास देण्यास सुरवात केली. डीजीपी दर्जाच्या एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याची सावत्र मुलगी हर्षवर्धनी रान्या उर्फ रान्या राव हिला आठवडाभरापूर्वी दुबईहून भारतात १४.५६ कोटी रुपयांच्या सोन्याची तस्करी केल्याच्या आरोपाखाली बेंगळुरू विमानतळावर अटक करण्यात आली असून, २४ मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

पीओकेमधील नागरिक भारतात सामील होण्याची मागणी करतील

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचा दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पाकव्याप्त (पीओके) काश्मीरमधील लोक भारतात सामील होण्याची मागणी करतील, असा दावा संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केला आहे. पाकिस्तान पीओके भारताला सोपवेल अशी अपेक्षा नाही. मात्र, पीओकेचे लोक स्वतःच त्यांना भारतात सामील करून जम्मू आणि काश्मीरमध्ये विलीन करण्याची मागणी करतील, असे राजनाथ सिंह म्हणाले. संरक्षणमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना हे विधान केले आहे.

संरक्षणमंत्री म्हणाले की, ज्या पद्धतीने भारताचा आर्थिक विकास सतत होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची प्रतिष्ठा वेगाने वाढली आहे. ते पाहून पाकव्याप्त काश्मीरमधील लोकांनाही हे समजू लागले आहे की, जर आपल्याला आपला विकास हवा असेल तर आपण भारतासारख्या देशात सामील होऊनच आपल्या प्रदेशाचा विकास करू शकतो. राजनाथ सिंह म्हणाले की, पीओकेला देश नाही, तर एक प्रदेश आहे. जर पीओकेच्या लोकांनी भारतात सामील होण्याची मागणी केली. तर पाकिस्तानला तसे करावे लागेल. यासाठी पीओकेला पाकिस्तानची संमती का लागेल? असे ते म्हणाले. बांगलादेशातील परिस्थितीबद्दल विचारले असता, संरक्षणमंत्री म्हणाले की, भारत नेहमीच आपल्या शेजाऱ्यांशी चांगले संबंध राखू इच्छितो. बांगलादेश देखील आपला शेजारी देश आहे. आपण आपल्या शेजाऱ्यांशी चांगले संबंध राखण्याचा प्रयत्न करतो. कारण आपले माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणायचे की, आपण मित्र बदलू शकतो पण शेजारी बदलू शकत नाही. म्हणूनच आम्हाला आमच्या शेजारी बांगलादेशशी चांगले संबंध राखायचे आहेत.

#रा

लोकसभेत गदारोळ!

मतदार यादीतील अनियमिततेवर चर्चेची विरोधकांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : संसदेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आज सुरू झाला आहे. ४ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात एकूण १६ बैठका होणार आहेत. या काळात केंद्र सरकार वक्फसह सुमारे ३६ विधेयके मांडण्याची तयारी करत आहे. या अधिवेशनात सरकार आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष होण्याची शक्यता आहे. त्याचीच सुरुवात आज विरोधकांनी केली.

देशात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत विरोधकांनी अनेक आक्षेप घेतले होते. त्याचाच मुद्दा उपस्थित करत देशभरात मतदार यादीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत, असे राहुल गांधी यांनी लोकसभेत सांगितले. संपूर्ण विरोधी पक्ष एकत्र येऊन फक्त एवढेच म्हणत आहे की, मतदार यादीवर येथे चर्चा झाली पाहिजे. यावर, विरोधी पक्षाच्या खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना मतदार यादीवर बोलण्याची संधी देण्याची विनंती केली, मात्र त्यावर कोणताही निर्णय झाला नसल्याने विरोधकांनी सभागृहात एकच गोंधळ केला.

राहुल गांधी म्हणाले की, देशभरात मतदार यादीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महाराष्ट्रासह प्रत्येक राज्यातील विरोधी पक्षांनी यावर एका सुरात प्रश्न उपस्थित केले आहेत. तत्पूर्वी, तृणमूल काँग्रेसचे सदस्य सौगत रॉय म्हणाले की, मतदार यादीत काही विसंगती आहेत आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निदर्शनास आणून दिले. मुर्शिदाबाद आणि बर्दवान संसदीय मतदारसंघात आणि हरियाणामध्ये समान निवडणूक फोटो ओळखपत्र क्रमांक असलेले मतदार होते.

रॉय म्हणाले की, तृणमूल काँग्रेसचे एक शिष्टमंडळ नवनियुक्त मुख्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन मतदार याद्यांबाबत चिंता व्यक्त करत आहे. विशेषत: पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचा सखोल आढावा घेण्याची मागणीही त्यांनी केली. टीएमसी खासदार म्हणाले की, मतदार यादीत काही गंभीर त्रुटी आहेत. मतदार याद्यांमध्ये फेरफार झालेल्या महाराष्ट्राच्या संदर्भात याकडे लक्ष वेधण्यात आल्याचे ते म्हणाले. हरयाणातही याकडे लक्ष वेधण्यात आले. आता पश्चिम बंगाल आणि आसाममध्येही तेच करण्याचा आयोगाचा प्रयत्न आहे, जिथे पुढील वर्षी निवडणुका होणार आहेत, असा आरोप त्यांनी केला.

संपूर्ण मतदार यादीचा सखोल आढावा घेण्यात यावा, असे तृणमूल काँग्रेसच्या नेत्याने म्हटले आहे. या यादीत या चुका का झाल्या, हे निवडणूक आयोगाने देशाला सांगावे. त्यात सुधारणा न केल्यास निष्पक्ष निवडणुकीची अपेक्षा करता येईल, असे ते म्हणाले. त्यावर सभापतींनी सरकार मतदार यादी तयार करत नाही, असा युक्तिवाद केला. त्यानंतर राहुल गांधी यांनी स्वत: उभे राहून सभापतींना सांगितले की, मतदार यादीमुळे सरकार बनत नाही, हे आम्हाला माहीत आहे, पण त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

दरम्यान, याअगोदर विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते. मतदार ओळखपत्र क्रमांकांमधील तफावतीपासून ते मणिपूरपर्यंतच्या विविध मुद्द्यांवर चर्चेची मागणी विरोधी पक्ष करत होते. सभापतींनी विरोधी पक्षांना प्रश्नोत्तराचा तास काही काळ चालू ठेवण्याची विनंती केली, परंतु घोषणाबाजी सुरूच राहिली. अखेर लोकसभा अध्यक्षांनी काही काळासाठी कामकाज तहकूब करण्याचा निर्णय घेतला.

योगी आदित्यनाथ यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी दिल्लीत पंतप्रधान मोदींची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास १ तास चर्चा झाली. यावेळी उत्तर प्रदेशातील मंत्रिमंडळ विस्तार आणि भाजप प्रदेश अध्यक्षांच्या नियुक्तीबाबत चर्चा झाली असल्याचे सूत्रांनी सांगितले. याशिवाय मुख्यमंत्र्यांनी महा कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दलही पंतप्रधानांना सांगितले असल्याचे समजते. केंद्रीय नेतृत्वाला पंचायत निवडणुका-२०२६ आणि विधानसभा निवडणुका-२०२७ च्या जातीय समीकरणानुसार प्रदेशाध्यक्षाची नियुक्ती करायची आहे. मुख्यमंत्री योगी आणि राज्य सरकारशी अधिक चांगल्या प्रकारे समन्वय साधू शकेल अशा व्यक्तीची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करावी अशी वरिष्ठ नेतृत्वाची इच्छा असल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री योगी यांचा दिल्ली दौरा महत्वाचा मानला जात आहे.

आंतरराष्ट्रीय ड्रग्ज माफियाला पंजाबमध्ये अटक

नवी दिल्ली : अमेरिकेतील गुप्तचर आणि सुरक्षा एजन्सी फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन्स (एफबीआय)च्या मोस्ट वॉन्टेड यादीतील आंतरराष्ट्रीय ड्रग्ज माफिया शहनाज सिंग उर्फ शॉन भिंदर याला पंजाब पोलिसांनी अटक केली आहे, अशी माहिती पंजाब पोलिसांचे महासंचालक गौरव यादव यांनी सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म एक्स वरुन दिली आहे. शहनाज सिंग उर्फ शॉन भिंदर हा अमेरिकेतील गुप्तचर आणि सुरक्षा एजन्सी फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन्स (एफबीआय)च्या मोस्ट वॉन्टेड यादीत होता. २६ फेब्रुवारी रोजी अमेरिकेत मोठ्या ड्रग्ज रॅकेटचा पदार्फाश करण्यात आला होता. यावेळी ३९१ किलो मेथाम्फेटामाइन (आयसीई), १०९ किलो कोकेन आणि चार बंदुका जप्त केल्या होत्या. अटक केलेल्यांमध्ये अमृतपाल सिंग उर्फ अमृत उर्फ बाल, अमृतपाल सिंग उर्फ चीमा, तकदीर सिंग उर्फ रोमी, सरबसित सिंग उर्फ साबी आणि फर्नांडो वल्लादारेस उर्फ फ्रँको यांचा समावेश आहे ड्रग्ज तस्करांच्या चौकशीवेळी शहनाज सिंग उर्फ शॉन भिंदर याचे नाव समोर आले होते.

उद्धव ठाकरे यांचे दोन शिलेदार शिंदे गटात

मुंबई : ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. उद्धव ठाकरे यांचे दोन खंदे शिलेदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत गेले आहेत. उद्धव ठाकरे गटाचे माजी नगरसेवक राजू पेडणेकर , संजय पवार यांनी आज मुक्तागिरी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. दरम्यान, गेल्या काही दिवसापासून ठाकरे गटात होणारी गळती अजूनही थांबताना दिसत नाहीये. येणा-या काळातही ही गळती सुरूच राहण्याचे संकेत सूत्रांनी दिले आहेत. मुंबईच्या पश्चिम उपनगरातील हे दोन्ही माजी नगरसेवक शिंदे गटात गेल्याने पश्चिम उपनगरातील शिंदे गटाची ताकद वाढली आहे. या दोन्ही नगरसेवकांसोबत त्यांच्या शेकडो समर्थकांनीही शिवसेनेत प्रवेश केला. एकनाथ शिंदे यांनी या दोन्ही माजी नगरसेवकांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचं शिवसेनेत स्वागत केलं. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर तुफान हल्ला चढवला.

भारताच्या विजयानंतर मध्य प्रदेशमध्ये वाद

नवी दिल्ली : इंदूर जिल्ह्यातील महू येथे चॅम्पियन्स ट्रॉफी विजयाचा उत्सव अचानक हिंसाचारात रूपांतरित झाला. खरंतर, विजयानंतर काही लोक विजय मिरवणूक काढत होते, तेव्हा जामा मशिदीजवळ दोन पक्षांमध्ये वाद झाला. यानंतर दगडफेक झाली आणि लोकांनी दुकाने आणि वाहने पेटवून दिली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला आणि अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडण्यात आल्या. परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ही घटना रविवार, ९ मार्च रोजी रात्री १०:३० वाजता घडली. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताच्या विजयानंतर, काही तरुण क्रिकेट प्रेमी मोटारसायकलींवरून विजयी मिरवणूक काढत होते. स्थानिकांनी सांगितले की जेव्हा ते जामा मशीद परिसराजवळ पोहोचले तेव्हा दुसऱ्या बाजूने एका मोठ्या गटाने त्यांच्यावर दगडफेक करायला सुरुवात केली, ज्यामुळे गोंधळ निर्माण झाला.

सोमवारी शेअर बाजारात असलेल्या प्रचंड अस्थिरतेचा फटका गुंतवणूकदारांना बसला. दिवसभर हिरव्या रंगात व्यवहार केल्यानंतर, शेवटच्या तासात जोरदार विक्री झाल्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही लाल रंगात बंद झाले. दिवसाच्या उच्चांकावरून सेन्सेक्स ६२० अंकांनी घसरला, तर निफ्टी २२,५०० च्या खाली बंद झाला. त्यामुळे शेअर बाजारात गुंतवणूकदारांचे सुमारे ५ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. छोट्या आणि मध्यम समभागांमध्येही मोठी घसरण दिसून आली. मिडकॅप निर्देशांक १.४६ टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक २.११ टक्क्यांनी घसरून बंद झाला. निफ्टीचे सर्व १२ क्षेत्रीय निर्देशांक लाल रंगात बंद झाले. व्यवहाराच्या शेवटी, सेन्सेक्स २१७.४१ अंकांनी घसरून ७४,११५.१७ वर बंद झाला, निफ्टी ९२.२० अंकांनी घसरून २२,४६०.३० वर बंद झाला.

अस्थिरतेचा शेअर बाजाराला फटका

गुंतवणूकदारांचे ५ लाख कोटींचे नुकसान

गुंतवणूकदारांचे ४.९२ लाख कोटी रुपये बुडाले

● सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल सोमवारी ३९३.३७ लाख कोटी रुपयांवर घसरले आहे, जे त्याच्या मागील ट्रेडिंग दिवशी म्हणजे शुक्रवारी ३९८.२९ कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप सोमवारी सुमारे ४.९२ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. किंवा दुसऱ्या शब्दांत, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ४.९२ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्स ठप्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : लोकप्रिय मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्स (ट्विटर) ची सेवा मंगळवारी दुपारी अचानक ठप्प झाली आहे. बऱ्याच वापरकर्त्यांनी तक्रार केली आहे की ते प्लॅटफॉर्मवर प्रवेश करण्यास असमर्थ आहेत आणि आधी केलेल्या पोस्ट वाचू शकत नाहीत. दरम्यान, यामागचे कारण उशीरापर्यंत समोर आलेले नव्हते.

डाऊनडिटेक्टर या वेबसाइट्स आणि इंटरनेट सेवांची माहिती डाउनटाइम किंवा डाउनटाइमची माहिती देणाऱ्या प्लॅटफॉर्मनेही एक्स (पूर्वीचे ट्विटर) सेवा डाऊन असून ती योग्य प्रकारे काम करत नसल्याची माहिती दिली आहे. एकट्या भारतात २ हजारांहून अधिक युजर्सनी एक्स ॲक्सेस करण्यात अडचणी येत असल्याची माहिती दिली आहे. याशिवाय अमेरिका आणि अमेरिकेतील १० हजारांहून अधिक युजर्सनी ही सेवा प्लॅटफॉर्मवर काम करत नसल्याची तक्रार दाखल केली आहे.

सोशल मीडिया सर्व्हिस एक्स हा एक जागतिक प्लॅटफॉर्म आहे आणि त्याचे सर्व्हर मोठ्या प्रमाणात लोड होऊ शकतात, विशेषत: जेव्हा एखादी मोठी घटना किंवा बातमी असते. सॉफ्टवेअर अद्यतने किंवा हार्डवेअर समस्या यासारख्या तांत्रिक समस्यांमुळे एक्स देखील डाउन होऊ शकतो ज्यामुळे सर्व्हरवर देखील परिणाम होतो. सध्या कंपनीने यावेळी सेवा बंद करण्याचे कोणतेही कारण दिलेले नाही. साधारणत: डाऊनच्या काही काळानंतर एक्सची सेवा आपोआप पूर्वपदावर येते.

भोपाळमध्ये काँग्रेसचा मंच कोसळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भोपाळमध्ये सोमवारी मंच कोसळून काँग्रेसचे सात नेते जखमी झाले. काँग्रेसचे आमदार जयवर्धन सिंह यांनी सांगितले की, मध्य प्रदेश विधानसभेच्या दिशेने कूच करण्यापूर्वी पक्षाचे नेते रंगमहल क्रॉसिंगजवळ एका सभेला संबोधित करत होते. या घटनेच्या वेळी राज्य सरकारच्या कथित शेतकरीविरोधी धोरणांविरोधात निदर्शने करण्यात येत होती.

काँग्रेस कार्यकर्त्यांनी विधानसभेच्या दिशेने कूच केले, मात्र पोलिसांनी त्यांना वॉटर कॅननचा वापर करून रोखले. मात्र, अधिवेशन वाढवण्याच्या मागणीसाठी काँग्रेसच्या आमदारांनी विधानसभेच्या आवारात निदर्शने केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा समारोप २४ मार्चरोजी होणार आहे.

या अधिवेशनात नऊ बैठका होणार आहेत. विरोधी पक्षनेते उमंग सिंघार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे आमदार विधानसभा आवारातील महात्मा गांधी पुतळ्यासमोर फलक घेऊन आणि काळे मास्क घालून जमले. विरोधी पक्षनेते उमंग सिंघार म्हणाले की, अधिवेशन ला मुदतवाढ मिळावी यासाठी आपण सरकारला पत्र लिहिले होते, परंतु सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही. युवकांना रोजगार नाही, शेतकऱ्यांना वेळेवर खते मिळत नाहीत, राज्यातील जनतेवर कर्जाचा बोजा वाढत असून उन्हाळ्यात पाणी मिळत नाही. सरकारने अधिवेशन वाढवावे, जेणेकरून आमदारांना या मुद्द्यांवर चर्चा करता येईल.

पालो अल्टो

टेस्लाला विरोध : कॅलिफोर्नियातील पालो अल्टो येथील टेस्लाच्या शोरूम समोर निदर्शने करण्यात आली आणि कंपनीचे सर्वेसर्वा एलन मस्क यांना विरोध दर्शविण्यात आला.

भामरागडमध्ये प्रवेशद्वारावरच नक्षल्यांची कोंडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

गडचिरोली : नक्षलवाद्यांचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणा-या दक्षिण गडचिरोलीतील भामरागड तालुक्यातील कवंडे येथे तब्बल एक हजार जवानांनी अवघ्या २४ तासात पोलिस मदत केंद्र उभारल्याने नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला आहे. कवंडे हे गाव छत्तीसगड सीमेपासून केवळ २०० मीटर अंतरावर असल्याने नक्षलवादी येथून गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश करायचे. परंतु हे केंद्र उभारल्यामुळे नक्षलवाद्यांची कोंडी झाली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२६ पर्यंत देश नक्षलवादमुक्त करण्याची घोषणा केल्यानंतर देशभरात नक्षलविरोधी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर छत्तीसगडसह गडचिरोली जिल्ह्यातही नक्षलवादावर अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. यातील भामरागड तालुक्यात येत असलेल्या नेलगुंडा, पेनगुंडा आणि कवंडे ही गावे नक्षलवाद्यांचे नंदवन म्हणून ओळखले जायचे. मात्र, गेल्या ३ महिन्यांत या तीनही गावात गडचिरोली पोलिसांनी रस्ते, मोबाईल नेटवर्कसह पोलिस मदत केंद्र उभारून नक्षलवादाचे कंबरडे मोडले आहे. कवंडे येथून जवळ असलेल्या इंद्रावती नदीपासून छत्तीसगड येथील बिजापूर जिल्ह्याची सीमा आहे. हा परिसर नक्षलवादी कारवायांच्या दृष्टीने अतिसंवेदनशील आहे. कवंडे येथे पोलिस मदत केंद्राची स्थापना झाल्याने लवकरच हा मार्ग पूर्ण होणार आहे. नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या क्षेत्रात ८ किलोमीटर रस्ता बनवून २४ तासांत या पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यात आली. छत्तीसगड सीमेवरून प्रवेश करणा-या नक्षलवाद्यांची यामुळे नाकाबंदी झाली आहे. गेली अनेक वर्षे ही गावे मुख्य प्रवाहापासून लांब होती. या पोलिस मदत केंद्रामुळे शासकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत, असे गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले.

'अबुझमाड'ला घेराव

● कवंडेला नक्षलवाद्यांचे गड अबुझमाडची सीमा लागून आहे. गेल्या काही महिन्यांपासून छत्तीसगडसह गडचिरोली पोलिसांनी अबुझमाडमध्ये शिरून कारवाया केल्या आहेत. छत्तीसगड पोलिसांच्या कारवायांपासून वाचण्यासाठी नक्षलवादी कवंडे परिसरात लपून बसायचे. मात्र, येथेही पोलिस मदत केंद्र उभे राहिल्याने दोनशे चौरस मिटरचा हा भूभाग पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे भविष्यात अबुझमाडमध्ये नक्षलविरोधी अभियान राबविण्यासाठी कवंडे पोलिस मदत केंद्र महत्त्वाची भूमिका निभावणार आहे.

कांदा विक्रीचे पैसे रोख स्वरूपात देणार

राजगुरुनगर आवारात कांदा विक्री, पहिल्याच दिवशी ५ हजार पिशव्यांची आवक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

खेड : राजगुरुनगर बाजार आवारात होणाऱ्या कांदा विक्रीचे पैसे शेतकऱ्यांना रोख स्वरूपात देणार आहोत. तसेच चाकण प्रमाणेच राजगुरुनगर आवारात शेतकऱ्यांसाठी अल्प दरात भोजन सुरू करण्यात येणार आहे अशी घोषणा खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी केली.

खेड कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने राजगुरुनगर आवारात रविवार (दि ९) कांदा खरेदी विक्रीचा शुभारंभ केला. सभापती विजयसिंह शिंदे पाटील उपसभापती क्रांती सोमवंशी यांच्या हस्ते व संचालक अशोक राक्षे, माणिक गोरे,सोमनाथ मुंगसे, रणजीत गाडे, समितीचे सचिव बाळासाहेब धंद्रे यांच्या उपस्थितीत कांद्याच्या लिलावाची सुरुवात करण्यात आली. यानिमित आवारात आयोजित केलेल्या स्वागत समारंभात सभापती

विजयसिंह शिंदे पाटील बोलत होते.

चासकमान, भामा आसखेड आणि कळमोडी धरणाच्या पाण्यामुळे खेड तालुक्यात बागायती क्षेत्र वाढले आहे. रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात कांद्याचे पीक घेतले जाते. उत्पादित कांद्याला चाकण बाजार उपलब्ध आहे. राजगुरुनगरच्या पश्चीम व पुर्व भागातील शेतकऱ्यांना चाकण बाजार लांब पडतो. अशा शेतकऱ्यांचा राजगुरुनगर येथे कांदा खरेदी विक्री केंद्राचा आग्रह होता.त्यानुसार संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. आठवड्यातील मंगळवार, गुरुवार आणि रविवारी राजगुरुनगर आवारात कांदा खरेदी विक्री करण्यात येणार आहे.चाकणचा बुधवार आणि शनिवारचा कांदा व्यापार सुरू ठेऊन अधिकचे कांदा विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे, असे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी सांगितले. उपसभापती क्रांती सोमवंशी यांनीही मनोगत व्यक्त केले.

शुभारंभाला बाजारात ५ हजार कांदा पिशवीची आवक झाली होती. कांदा बाजारात घेऊन आलेल्या शेतकऱ्यांचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी व्यासपीठावर स्वागत केले. आलेल्या सर्व कांद्याचे लिलाव व्यापाऱ्यांनी घेतले. लिलावात दोन हजार ते अडीच हजार रुपये क्विंटल प्रमाणे शेतकऱ्यांना भाव मिळाला. तालुक्यातील अनेक मान्यवर, व्यापारी, आडते आणि तालुक्यातील शेतकरी यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

शेतकरी बांधवांना आनंद

- राजगुरुनगर येथे कांदा खरेदी विक्री सुरू झाल्याने इतरत्र शेतमाल नेताना वेळ आणि वाहतूक खर्चाची बचत होणार आहे. मार्केट जवळच उपलब्ध केल्याने शेतकरी बांधवांची मोठी सोय झाली आहे. त्यामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या संचालक मंडळाचे अभिनंदन करत आनंद व्यक्त केला.

खंडाळे, ता.शिरुर येथे चासकमान कालव्याला सोडण्यात आलेले पाणी.

चासकमान धरणातून शिरुर तालुक्याला आवर्तन

कारेगाव : पाण्याअभावी पिके जळू लागल्याने चासकमान धरणाच्या डाव्या कालव्यातून शिरुर तालुक्याला पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती,शेतकऱ्यांची गरज ओळखून डाव्या कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांनी समाधान व्यक्त केले, यामुळे काही प्रमाणात का होईना पाणीटंचाई दूर होण्यास मदत होणार आहे. चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याद्वारे शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती, वाघाळे, गणेगांव खालसा, खंडाळे, पिंपरी दुमाला व वरुडे या गावांसह कोंढापुरी तलावात शेतीसह नळपाणीपुरवठा योजनेसाठी पाणी सोडण्यात येत असते. उन्हाची तीव्रता वाढल्याने पिकांना पाण्याची गरज ओळखून पाणी डाव्या कालव्याला सोडण्याची मागणी आंबेगाव शिरुर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर पाटील यांसह परिसरातील शेतकरी व नागरिकांनी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे केली होती. नागरिकांना पिण्यासाठी आणि शेतकऱ्यांना पिकांसाठी पाण्याची गरज ओळखून डाव्या कालव्याद्वारे मागील काही दिवसांपासून आवर्तन रांजणगाव गणपती परिसरात सुरु असल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

श्री पांडुरंग विद्यामंदिरात महिला दिन उत्साहात

शिक्रापूर : विठ्ठलवाडी, ता. शिरुर येथील श्री पांडुरंग विद्यामंदिर येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ यांच्या उपस्थितीत संगीता गवारे व सृष्टी तळेकर यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व विशद केले. याप्रसंगी सनराइज इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका पौर्णिमा ढमढेरे, प्रवीणकुमार जगताप, महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेच्या समन्वयक सविता गवारे, ग्रामपंचायत सदस्य लता गवारे, मनीषा गवारी, सारिका गवारी, आरती रायकर, विद्या गवारी, संगीता लंघे, योगिता हरगुडे, शुभांगी जाधव यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान महिलांसह शालेय विद्यार्थिनींचा गुलाब पुष्प देऊन विशेष सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीणकुमार जगताप यांनी केले तर चंद्रकांत शिंदे यांनी आभार मानले.

महिला दिनानिमित्त 'छावा' चित्रपटाचा विशेष शो

लोणी-धामणी : अवसरी बुद्रुक (ता.आंबेगाव) येथे महिला दिनाचे निमित्त रणझुंजार मित्र मंडळ आणि विष्णूकाका हिंगे पाटील सोशल फाउंडेशन यांच्यावतीने सध्या गाजत असलेला शिवपुत्र संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' या चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला होता. चित्रपट पाहण्यासाठी गावातील वाड्या-वस्त्या मधून महिला,लहान मुले आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित लहान मुलांसाठी पॉपकॉर्न, सरबत याची सोय रणझुंजार मित्र मंडळ यांच्यावतीने करण्यात आली होती. हा विशेष शो आयोजित करण्यासाठी आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विष्णूकाका हिंगे, उद्योजक प्रदीप जयवंतराव हिंगे, मनेश चव्हाण,उद्योजक अमित हिंगे,पप्पूराजे हिंगे,विकास हिंगे,सुशांत हिंगे,सचिन हिंगे,अविनाश हिंगे, नवनाथ हिंगे, पवन हिंगे, सुहास हिंगे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष अशोक हिंगे, उपसरपंच अनिल हिंगे यांनी विशेष सहकार्य केले. जागतिक महिला दिनानिमित्त अवसरी गावच्या सरपंच सारिका हिंगे यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या, अशी माहिती युवक कार्यकर्ते प्रशांत बबनराव हिंगे यांनी दिली.

सासऱ्याला सुनेची लोखंडी दांड्याने मारहाण

खेड : 'परसात असलेली गुलाबाची फुले देवासाठी ठेवा सुनबाई,' असे सांगणाऱ्या सासऱ्याला सुनबाईने लोखंडी खोऱ्याने मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार खेड तालुक्यातील रेटवडी येथे घडला. या मारहाणीत साठ वर्षांचे सासरेबुवा गंभीर जखमी झाले आहेत. रामदास गोविंद टाकळकर, (६२, रा. विकासनगर, रेटवडी, ता. खेड) असे मारहाणीत जखमी झालेल्या सासऱ्याचे नाव आहे, तर आरती संदीप टाकळकर असे सुनेचे नाव आहे.

खेड पोलिसात दाखल तक्रारी नुसार, तक्रारदार सासरे रामदास टाकळकर आणि त्यांचा मोठा मुलगा व सुनबाई शेजारी राहतात. त्यांच्यात मतभेद आहेत. शुक्रवारी सकाळी या सुनबाई अंगणा लगत असलेली गुलाबाच्या झाडांची फुले तोडत होत्या. त्यावेळी सासरे रामदास तिथे असल्याने त्यांनी 'सुनबाई ही फुले देवासाठी असूद्या,' असे म्हटले. त्यावर सुनबाईला राग अनावर झाला. सुनबाईनी सगळी गुलाबाची झाडे उपटुन टाकली. सासरे घरात जायला निघाले, तेव्हा मागुन सुनबाई आल्या. त्यांनी जवळच पडलेल्या लोखंडी खोऱ्याने सासऱ्यांच्या डोक्यात मागुन तसेच नंतर छातीवर मारले. त्यांच्या डोक्यातुन रक्तस्त्राव झाल्याने धाकट्या मुलाने उपचारांसाठी राजगुरुनगर येथे आणले.

बंद पडलेल्या बसमुळे मनस्ताप

जुन्या एसटी बस दिल्याने रस्त्यात वारंवार बंद पडत असल्याचे चित्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लोणी-धामणी : आंबेगाव तालुक्यात नवीन एसटी डेपो चालू होऊन एक वर्ष झाले असून मंचर एसटी डेपोला दहा ते पंधरा वर्षाच्या जुन्या एसटी बस दिल्याने या बस रस्त्यात वारंवार बंद पडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. दोन दिवसापूर्वी कळंब येथे प्रवाशांनी भरलेली एसटी बस अचानक बंद पडल्याने प्रवाशांना भर उन्हात ताटकळत उभे राहुन दुसऱ्या एसटीची वाट पहावी लागल्याने प्रवाशांनी, महिलांनी संताप व्यक्त केला आहे.

आंबेगाव तालुक्यात स्वतंत्र एसटी बस डेपो व्हावा ही प्रवाशांची २५ ते ३० वर्ष पासूनची मागणी होती. मागणीचा विचार करून माजी सहकार मंत्री व विद्यमान आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या प्रयत्नातून ताबडेमळा अवसरी खुर्द येथे पाच एकर जागेत मंचर एसटी डेपो मंजूर केला गेला.एक वर्षांपूर्वी या एसटी डेपोचे उद्घघाटन झाले व एसटी डेपो चालू झाला. मात्र राज्य परिवहन महामंडळाने मंचर एसटी डेपोला नवीन एसटी बस देण्याऐवजी दहा ते बारा वर्षांपूर्वीच्या जुन्या व कालबाह्य एसटी बस पाठवल्याने जुन्या एसटी बस रस्त्यावर वारंवार बंद पडल्याचे प्रकार घडत असून यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दोन दिवसापूर्वी कळंब हद्दीत सकाळी ११ वाजता एक एसटी बस अचानक बंद पडली होती. या बस बसमधील प्रवासी महिला लहान मुलांना कडेवर घेऊन रस्त्यावर दुसऱ्या एसटी बसची वाट पाहत होत्या. अचानक एसटी बंद पडल्याने महिलांनी संताप व्यक्त केला. अशा घटना वारंवार घडत असून, एसटी महामंडळाने मंचर डेपोला नवीन १५ ते २० एसटी बस द्याव्यात अशी मागणी पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष भोर यांनी केली आहे.

कळंब (ता.आंबेगाव) गावचे हद्दीत बंद पडलेल्या एसटी बसमुळे ताटकळत उभे राहुन दुसऱ्या एसटी बसची वाट पाहताना प्रवासी.

आठ मेडिकल फोडणारे जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

शिक्रापूर : शिक्रापूर, ता. शिरुर येथे एक महिन्यापूर्वी चोरट्यांनी मेडिकल लक्ष करत एका रात्रीत तब्बल आठ मेडिकलचे शटर उचकटून प्रत्येक मेडिकल मधील रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडली होती. या घटनेतील चोरट्यांना पकडण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला यश आले असून, यलाप्पा परशुराम सुतार, संदीप शंकर सोनार या दोघांसह एका अल्पवयीन युवकाला पोलिसांनी अटक केली आहे.

शिक्रापूर येथे १० फेब्रुवारी रोजी अनेक मेडिकल चालक मेडिकल बंद करुन घरी गेले असताना दुसऱ्या दिवशी सकाळच्या सुमारास शिक्रापूर तळेगाव रोड येथील रमेश मेडिकल, कल्याणी मेडिकल, मातोश्री मेडिकल, श्री स्वामी समर्थ मेडिकल, मलठण फाटा येथील साई मेडिको, न्यू श्रेया मेडिकल, आराध्या मेडिकल तर हिवरे रोड येथील प्रकाश मेडिकल असे आठ मेडिकल चोरट्यांनी फोडून प्रत्येक मेडिकल मधील काही रोख रक्कम चोरी केली सदर घटना काही सीसीटीव्ही मध्ये कैद झाली तर याबाबत तेजस प्रमोद गायकवाड वय २५ वर्षे रा. निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचा तपास करत असताना यातील आरोपी पिंपळे जगताप येथे

येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना मिळाली त्यांनतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दत्ताजी मोहिते, पोलीस ह्वालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजू जाधव, राजू मोमीन, सागर धुमाळ यांनी पिंपळे जगताप येथे सापळा रचत यलाप्पा परशुराम सुतार वय २१ वर्षे रा. नेहरूनगर चिंचवड पुणे व संदीप शंकर सोनार वय १८ वर्षे रा. वल्लभनगर चिंचवड पुणे या दोघांसह एका अल्पवयीन युवकाला याब्यात घेत त्यांच्याकडे चौकशी केली असता तिघांनी गुन्ह्याची कबुली दिली. दोघांना अटक करत पुढील तपासासाठी शिक्रापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर साळुंखे व प्रताप जगताप हे करत आहे.

पुणे जिल्ह्यात एक कोटी टनांहून अधिक ऊसगाळप पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : जिल्ह्यात २०२४-२५ मध्ये एकूण १ कोटी ४९ लाख मेट्रिक टन उसाच्या गाळपाचा अंदाज आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत जिल्ह्यातील १४ साखर कारखान्यांनी सुमारे १ कोटी ३ लाख २५ हजार ४९३ मेट्रिक टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे, तर ९.३५ टक्के सरासरी उताऱ्यानुसार ९६ लाख ५२ हजार ६४४ क्विंटलइतके साखर उत्पादन तयार केले आहे. याचा विचार करता अद्यापही सुमारे ४६ लाख टन उसाचे गाळप होणे बाकी असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून मिळाली.

सद्य:स्थितीत ऊस संपल्याने इंदापूर तालुक्यातील कर्मयोगी व निरा- भीमा सहकारी साखर कारखाने बंद झाल्याचे साखर आयुक्तालयातून सांगण्यात आले. सर्वाधिक ऊसगाळप आणि साखर उत्पादनात इंदापूरमधील बारामती ॲग्रो या खासगी साखर कारखान्याची आघाडी कायम आहे. या कारखान्याने सर्वाधिक म्हणजे १६ लाख ९० हजार ८६ मे. टन ऊसगाळप पूर्ण केले आहे, तर ८.२५ टक्के उताऱ्यानुसार १३ लाख ६१ हजार ५८९ क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. त्या खालोखाल ऊसगाळपात दौंडमधील दौंड शुगर या कारखान्याचा दुसरा क्रमांक लागतो. या कारखान्याने १४ लाख ९१ हजार ६४२ मे.टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे, तर ८.२२ टक्के उताऱ्यानुसार ११ लाख ७९ हजार ७०० क्विंटलइतके साखर उत्पादन हाती आले आहे.

बारामती तालुक्यातील श्रीसोमेश्वर सहकारीने १० लाख ३४ हजार ३७० मे.टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे, तर ११.६ टक्के उताऱ्यानुसार १२ लाख ६ हजार ९०० क्विंटलइतके साखर उत्पादन हाती आले आहे.

स्वच्छता अभियान

पारगांव : पारगांव -शिंदेवाडी रस्त्याच्या दोन्ही बाजूला कचरा टाकण्यात आला होता. या ठिकाणी ग्रामपंचायत सदस्यांनी पाहणी करून स्वतःच स्वच्छता अभियान हाती घेतले. उपसरपंच बाजीराव तांबे, सदस्य निलेश बोत्रे, सदस्य रामकृष्ण ताकवणे व इतर तरुण सहकारी रूपेश ताकवणे, लोकेश शेळके, धर्मा गायकवाड, उमेश जगताप, बंडू ताकवणे, अमर वनशिव यांनी साफसफाई करून सामाजिक उपक्रमाचे दर्शन घडविले.

संत एकनाथमहाराजांचे नावे देण्यात येणारे पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

आळंदी : संत एकनाथ महाराजांचा प्रसार प्रचार व्हावा या उद्देशाने शांतिब्रह्म श्रीएकनाथ महाराज मिशन, पैठण ही सामाजिक संस्था २००६ पासुन कार्यरत आहे. संस्थेतर्फे आज पर्यंत अनेकानेक उपक्रम राबविण्यात आले असुन २०१८ पासुन संत एकनाथमहाराजांचे नावे दर वर्षी एकुण सहा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येत असल्याचे मिशनचे संस्थापक अध्यक्ष नाथवंशज हभप योगिराज महाराज गोसावी पैठणकर यांनी सांगितले.

यंदाचा सर्वोच्च "भानुदास एकनाथ पुरस्कार" संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व संत तुकाराममहाराजांचे वंशज डॉ सदानंद मोरे यांना देण्यात येणार असुन श्रीफळ, ताम्रपट मानपत्र, नाथांचा फेटा, रुपये पंचवीस हजार, नाथांची मूर्ती, एकनाथी भागवत असे पुरस्काराचे स्वरूप राहील. संत एकनाथमहाराज ट्रस्टचे संस्थापक व अधिपती नाथवंशज हभप वै. श्री रंगनाथबुवा ऊर्फ भैय्यासाहेबमहाराज पैठणकर यांचे नावाने देण्यात येणारा दुसरा "वारकरी भूषण पुरस्कार" हा नेकनुरच्या बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती हभप लक्ष्मण महाराज मेंगडे यांना देण्यात येणार आहे.

श्री संत एकनाथमहाराज प्रबोधमार्तंड पुरस्कार हा श्रीसंत निवृत्तीनाथमहाराज संस्थानचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध कीर्तनकार हभप संजयनाना धोंडगे यांना, संत एकनाथमहाराज स्वरमार्तंड पुरस्कार हा वारकरी संप्रदायातील जेष्ठ उपासक आळंदी येथिल हभप आबा महाराज गोडसे यांना, संत एकनाथमहाराज तालमार्तंड पुरस्कार हा पुणे येथिल मृदंगाचार्य तुकारामजी भुमकर यांना तर संत एकनाथमहाराज वारकरी सेवा पुरस्कार हा पैठण येथे नाथ समाधी मंदिर परिसरात भाविकांना गेल्या अनेक वर्षांपासुन विनामोबदला सायंकाळी अन्नदानाची सोय करणाऱ्या राजुसेठ लोहिया यांना प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार दिनांक २१ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता गावातील नाथमंदिर परिसरातील श्रीसंत नरहरी सोनार महाराज संस्थान येथे संपन्न होणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मिशनचे संस्थापक अध्यक्ष नाथवंशज हभप योगिराज महाराज गोसावी पैठणकर यांनी केले आहे.

कष्टकरी महिलांचा सन्मान

इंदापूर : आज जागतिक महिला दिना निमित्त नगर पालिकेतील कष्टकरी साफसफाई करणाऱ्या प्रसिद्धी पासून दूर असणाऱ्या महिलांचा प्रत्यक्ष कचरा प्रकल्पावर जाऊन कष्टकरी महिलांचा सन्मान गुलाब पुष्प व मिठाई देऊन आगळा वेगळ्या पद्धतीने सत्कार केला अशा पद्धतीने सत्कार होताना या महिला भगीनींना गहिवरून आले व डोळ्यात आनंदाश्रु आले .वृक्ष संजिवनी परिवार पतंजली योग समिती इंदापूर शाळा क्र १ व २ यांचे वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी वृक्ष संजिवनी परिवाराच्या सायराभाभी आत्तार तसेच पतंजली योगसमितीच्या वतीने श्री मल्हारी घाडगे यांनी उपस्थित सर्व महिलांच्या कार्याचे कौतूक करून त्यांच्या कार्याचा गुणगौरव करण्यात आला . याप्रसंगी रश्मीताई निलाखे, स्वाती अधटराव, वर्षा पोळ , महिला कॉन्स्टेबल माधुरी लडकत मॅडम,चंद्रकांत देवकर नाना, अशोक अनपट, देवराव मते, हमीदभाई आत्तार व अशोक चिंचकर उपस्थित होते.

जर्मन टेक्नॉलॉजीच्या मशीनद्वारे आरोग्य तपासणी

सासवड : विविध स्वरूपाच्या आरोग्यविषयक शिबिरांद्वारे प्रबोधन व जागरुकता निर्माण करण्याचे काम करणाऱ्या सासवड येथील दळवी मेडीकल फाउंडेशनच्या वतीने नुकतेच एका मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जर्मन टेक्नॉलॉजी असणाऱ्या मशीन द्वारे काहीं मिनिटांत शरीरातील अनेक तपासण्या या वेळी करण्यात आल्या. बाहेर सुमारे आठ हजारांहून अधिक खर्च असणाऱ्या या तपासणीचा परिसरातील सुमारे दोनशे रुग्णांनी लाभ घेतला. येथील संत नामदेव शाळेत दळवी मेडीकल फाउंडेशन व सासवड नागरी महिला पतसंस्थेच्या वतीने आयोजित या शिबिराचे उद्घाटन आमदार विजय शिवतारे यांनी केले. मधुमेह, रक्तदाब, किडनी, संधिवात, नेत्र विकार, मानसिक तणाव, वजन उंची इत्यादी स्वरुपातील तपासणी करून औषधोपचार व सल्ला देण्यात आला. डॉ राजेश दळवी, डॉ प्रवीण बढे, मंगेश भांडवे, विलास बोंडे, शिल्पा जगताप, ओंकार पवार, भुषण पंचवारकर, सविता पालांडे, हर्षदा ढीले, मंजुषा दळवी, रुपाली लोहकरे या डॉक्टर्स व सहकाऱ्यांनी या शिबिरात काम पाहिले. अंकुर शिवरकर, अजित चौखंडे सयाजी वांढेकर, अनिल दळवी यांचेही या शिबिरासाठी विशेष सहकार्य लाभले.

आवक वाढल्याने कांद्याच्या दरात घट

आंबेगाव : आवक वाढल्याने मंचर कृषि उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे बाजारभाव कमी झाले आहेत. रविवारी दहा किलो कांदा १७० रुपये या भावाने विकला गेला, अशी माहिती सभापती निलेश थोरात यांनी दिली. मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला रविवारी १० किलोला १७० रुपये, असा बाजारभाव मिळाला. ३५ हजार पिशवी कांद्याची आवक होवून चांगल्या प्रतीचा कांदा दहा किलोला १७० रुपये या भावाने विकला गेला आहे.
मंचर बाजार समितीत कांद्याची आवक वाढल्याने बाजारभाव कमी झाले आहेत. शेतकरी शेतात काढलेला कांदा लगेच विक्रीसाठी आणत आहेत. कांद्याचे प्रति दहा किलोचे दर पुढीलप्रमाणे : सुपर लॉट १ नंबर गोळा कांदा रुपये १५० ते १७० रुपये, सुपर गोळे कांदे १ नंबर रुपये १३० ते १५० रुपये, सुपर मिडीयम २ नंबर कांद्यास ११० ते १३० रुपये.

जबरदस्तीने शारिरिक संबंध, अल्पवयीन गुन्हेगारास अटक

रांजणगाव गणपती : "मी तुझ्यावर खुप प्रेम करतोय, तु मला खुप आवडतेस," असे म्हणुन जबरदस्तीने दोन वेळा शारीरीक संबंध ठेवणाऱ्या व व कोणाला सांगितले जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या अल्पवयीन गुन्हेगारास रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. अशी धमकी देणाऱ्या अल्पवयीन मुलाविरुद्ध बलात्कार व ॲट्रॉसिटीची तक्रार पीडितेच्या वडिलांनी केली आहे. याबाबत आरोपीला अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात आली असल्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, १७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता व ६ मार्च रोजी रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास कारेगाव, ता. शिरूर येथील मल्हार हिल्स येथे अल्पवयीन मुलगा याने फिर्यादी यांची अल्पवयीन मुली सोबत इन्स्टाग्राम आयडीवर ओळख करून तिच्याशी मैत्री केली. तिच्या राहते घरी घेवुन जावुन "मी तुझ्यावर खुप प्रेम करतोय, तु मला खुप आवडतेस" असे म्हणुन जबरदस्तीने दोन वेळा शारीरीक संबंध केले. तसेच सदर गोष्ट कोणाला सांगितली तर जिवे मारून टाकीन, अशी धमकी दिली. म्हणून त्याच्याविरोधात पीडितेच्या वडिलांनी तक्रार दाखल केली. सदर गुन्हा महिला पोलीस अधिकारी सविता काळे यांनी दाखल करून घेतला असून, पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले हे करत आहेत.

बिबट्यांना रोखण्यासाठी सौर कुंपण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लोणी-धामणी : जुन्नर, आंबेगाव खेड, शिरूर हे तालुके आठवले की समोर बिबट्या येतो. मागील आठ ते दहा वर्षात या चारही तालुक्यात म्हणजेच जुन्नर वन विभाग क्षेत्रात बिबट्यांनी मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घातला असून, बिबट्याच्या हल्ल्यात अनेक मानव तसेच पशुधन मृत्युमुखी पडले आहेत, अथवा जखमी झाले आहेत. या चारही तालुक्यातील नागरिक बिबट्याच्या दहशतीच्या छायेत जगत असून नागरिक, शेतकरी, पशुपालक शेतकरी देखील त्रस्त झाले आहेत. बिबट्याच्या दररोज कुठे ना कुठे होणाऱ्या हल्ल्यावर उपाय म्हणून जुन्नर वन वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या प्रयत्नातून सौर (झटका) कुंपण संकल्पना राबविण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे पशुधन बिबट्याच्या हल्ल्यापासून वाचविण्यात यश येत असल्याची माहिती मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

उत्तर पुणे जिल्ह्यामध्ये जुन्नर, आंबेगाव, शिरूर व खेड हे तालुके बिबट्यांच्या हल्ल्या संदर्भात राज्यामध्ये हॉटस्पॉट बनले आहेत. येथे दिवसागणित होणारे बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी वन विभागवेगवेगळे प्रयत्न करत आहे. त्यातील एक प्रयत्न म्हणून शेतकऱ्यांना वनविभागाकडून सौर कुंपण त्यांना अनुदान देऊन शेतकऱ्यांना बिबट्यापासून आपले व पशुधनाचे संरक्षण करण्यास मदत होत आहे. शेतकऱ्यांच्या घराभोवती हे सौर कुंपण लावून बिबट्याचे अथवा इतर वन्य प्राण्यांचे शेतकऱ्यांच्या असणाऱ्या गोठ्यावर पशुधनावर हल्ले रोखण्यासाठी हा प्रयत्न यशस्वी होताना पाहायला मिळत आहे.

बिबट्याचे वाढते हल्ले रोखण्यासाठी तसेच बिबट्यांपासून संरक्षणासाठी सौर कुंपण वनपरिक्षेत्र कार्यालय मंचर अंतर्गत अति संवेदनशील गावात लोकांच्या मागणीनुसार बसवले जात आहे. वनपरिक्षेत्र कार्यालय मंचर अंतर्गत आत्तापर्यंत २० सोलर कुंपण बसवले असून त्यामध्ये लाभार्थ्यांनी पहिले २५ टक्के रक्कम ७५०० भरावयाचे आहे. वनविभाग ७५ टक्के अनुदान त्यांच्यामार्फत देणार आहे. त्या सोलरकिटमध्ये, सोलर प्लेट, बॅटरी, फायबर पोल, लोखंडी पोल, तार बंडल, डीआय केबल, स्क्रू, ,कॉर्नर ब्लॅक, झटका मशीन व सर्व आवश्यक साहित्य देण्यात येणार आहे. सौर कुंपण हे घराभोवती लावण्यात येणार असून, त्यामुळे वन्य प्राण्यांपासून होणारा उपद्रव, बिबट्यापासून संरक्षण होणार आहे. हे कुंपण पूर्णतः सौर ऊर्जेवर चालणार आहे. सौर कुंपण बसल्यानंतर सौम्य स्वरूपाचा शॉक (झटका) बसणार आहे व या झटक्यामुळे मुळे वन्य प्राणी घाबरून पळ काढणार आहेत. आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी सौर कुंपण बसवले आहेत, त्या ठिकाणी एकदा शॉक लागल्यावर वन्यप्राणी पुन्हा त्या घराकडे किंवा त्या जागेकडे आजतागायत आलेला नाही, असा अनुभव असल्याचे वनपाल सोनल भालेराव यांनी सांगितले.

बिबट्याला विजेचा झटका

● जुन्नर वन विभागामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या गोठ्यात अथवा घरामध्ये सौर कुंपण इन्स्टॉल केले जात आहे. वनविभागा मार्फत ही सर्व यंत्रणा दिली जात आहे. हे सौर कुंपण बसवल्यानंतर जे बिबट्याचे हल्ले आहेत त्याच्यापासून काही अंशी संरक्षण होऊ शकते, या मध्ये फायबरचे पोल आहेत व ज्या धातूच्या तारा आहेत त्याच्यामधून विद्युत प्रवाह मशीन चालू केल्यावर प्रवाहित होतो. त्या दरम्यान बिबट्या अथवा इतर वन्य प्राणी घरात येण्याचा प्रयत्न करतो त्यावेळेस त्याला विजेचा झटका बसतो व तो त्या घरापासून दूर राहतो.

रब्बीच्या पिकाला अवकाळीची धास्ती

गहू, ज्वारी काढणीला वेग

"ढगाळ हवामानामुळे जोमात आलेल्या पिकांवर रोग, किडींनी आक्रमण केले आहे. सततचे बदलत्या हवामानामुळे पिकांवर रोग किडीचा प्रादुर्भाव वाढत असून, फवारणीच्या खर्चात वाढ होऊ लागली आहे. यामुळे शेतकरीवर्ग आर्थिक संकटात सापडत आहेत."
— सिमाताई भुजबळ मा.सरपंच दौंडज ग्रामपंचायत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

वाल्हे : वाल्हे (ता. पुरंदर) परिसरात मागील तीन-चार दिवसांपासून दुपारनंतर, ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने, अवकाळी पाऊसांच्या धास्तीने, शेतकरीवर्ग चिंताग्रस्त होत असून, यामुळे गहू, ज्वारी, हरभरा आदी रब्बी हंगामातील पिकांच्या काढणीस वेग आला आहे. मागील दोन वर्षांपासून, वाल्हे (ता.पुरंदर) परिसरातील शेतकरीवर्ग पाणीटंचाईचा सामना करीत आहेत.

अनेक शेतकरीवर्गाने रब्बी हंगामातील काही पिके मोठ्या संकटांचा सामना करीत, जगविली आहेत. मात्र, अवकाळी पाऊसांच्या सरी कोसळल्या तर, हातातोंडाशी आलेल्या पिकांचे अधिकचे नुकसान टाळण्यासाठी काढणीला आलेल्या गहू, हरभरा, ज्वारी पिकांची काढणीस वेग आला आहे. पुरंदर तालुक्यातील अनेक गावांत मागील काही दिवसांपासून, सकाळ पासूनच कडाक्यांचे ऊन पडत असून, दुपारी दोन नंतर आकाशात ढग दाटून येत आहेत.

यामुळे शेतक-यांच्या जीवाची घालमेल होत आहे. हाता-तोंडाशी आलेली पिके मळणी करून धान्याची रास घरात आणण्यासाठी शेतकरी धडपडत आहे. परिसरात यावर्षी गहु पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी करण्यात आली होती.

पेरणी केलेला गहू काढणीला आला असून, अवकाळी पावसाचे ढग घोंघावत असल्याने धास्तावलेल्या शेतकऱ्यांनी गहु काढणीची लगबग सुरू असल्याचे चित्र आहे.

गहू काढणीची पूर्वीची पद्धत आता कालबाह्य झाली असून, आधुनिक यंत्रांच्या मदतीने, कमी वेळात गहु काढणी होत असल्याने शेतकरी यंत्राने गहू काढणीला प्राधान्य देत असल्याचे दिसत आहे.

सध्या अनेक भागात कधी ऊन, तर कधी ढगाळ हवामान, तर पहाटे थंडी यामुळे गहू, कांदा, मका पिकांना फटका बसत आहे. तसेच भाजीपाला पिकांवरही रोग, किडीचा प्रादुर्भावाची शक्यता निर्णाम झाली आहे.

सासवड परिसरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सासवड : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सासवड परिसरातील विविध क्षेत्रांतील पाच कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. सासवड पोलिस स्टेशन आणि पत्रकार संघ सासवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सासवड पोलिस स्टेशन येथे झालेल्या या कार्यक्रमास पोलिस निरीक्षक ऋषिकेश मुखर्जी, पोलिस उपनिरीक्षक गणेश पाटील, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संजय चव्हाण विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. पारगाव मेमाणे येथील पोल्ट्री व्यवसायिक विमल कैलास बंड, पांगारे गावच्या पोलिस उपनिरिक्षक आशा उत्तम पोटे, वनपुरी

येथील शेतकरी महिला तान्हबाई सुदाम कुंभारकर सासवडच्या आरोग्यसेविका योगिता राहुल भुजबळ व सासवडच्याच मासूम कार्यकर्ती साधना प्रवीण महामुनी या महिलांचा याप्रसंगी साडी चोळी,सन्मान पत्र, शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पत्रकार संघाचे अध्यक्ष सुधीर गुरव यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रम आयोजनाची भूमिका मांडली. पाचही महिलांनी सत्काराला उत्तर देताना कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन केले तर भारती राऊत (बोरावके) यांनी मानपत्राचे वाचन केले. संभाजी महामुनी यांनी उपस्थितांचे आभार मानले. रुपेश भगत, लियाकत मुजावर, ऋषी जगदाळे या पोलिस मित्रांसह गणेश मुळीक जगदिश शिंदे, संदीप जगताप, जीवन कड, तानाजी सातव बाळासाहेब कुलकर्णी, राजेन्द्र बर्गे, सुनील वढणे या पत्रकार मंडळींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

लोणीत तलावांच्या खोलीकरणाला सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लोणी-धामणी : लोणी (ता.आंबेगाव) येथे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये नाम फाउंडेशन यांचे मार्फत गावातील ओढे, नाले, गावतळे, तलाव, बंधारे यातील गाळ काढून खोलीकरणाचे कामास सुरुवात करण्यात आली. यापूर्वी ग्रामपंचायतीने नाम फाउंडेशन यांना पत्रव्यवहार करून गावातील आवश्यक असणारी कामांची यादी मंजुरीसाठी पाठवण्यात आली होती. त्या अनुषंगाने नाम फाउंडेशन यांनी गावातील कामांना मंजुरी देऊन कामे सुरू केली आहे. सदर कामासाठी सरपंच सावळेराम आबाजी नाईक, उद्योजक अनिकेत सावळेराम नाईक, संतोस पडवळ व ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र वामन वाळुंज यांनी यांनी पाठपुरावा करून कामे मार्गी लावले आहेत.

नाम फाउंडेशन यांचे मार्फत गावातील सुरुवातीला दोन तलाव व दोन ओढे खोलीकरणाचे कामे हाती घेण्यात आली आहे.तसेच सदरचे गाळ काढणे व खोलीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर गावात पाणीटंचाई चे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. असे सरपंच सावळेराम नाईक यांनी सांगितले.

नाम फाऊंडेशनच्या वतीने ओढ्याचे खोलीकरण व रूदींकरणाचे काम सुरू करण्यात आहे. यावेळी सरपंच सावळेराम नाईक, शरद बॅकेचे संचालक अशोक आदक पाटील, राजेंद्र वाळूंज, संतोष पडवळ, अकुंश लंके, राहूल भागवत, रामचंद्र कदम, रंगनाथ वाळूंज, सतीश थोरात, पोलीस पाटील संदिप आदाव व ग्रामस्थ उपस्थित होते.

लोणी-धामणी

लोणी (ता.आंबेगाव) येथे पाझर तलाव, ओढा, खोलीकरण व रुंदीकरणास सुरुवात झाली.

नीरेत तब्बल ५० वर्षांनंतर भरला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

स्नेहभेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नीरा : पुरंदर तालुक्यातील नीरा येथील महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता १० वीच्या १९७५ सालातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा राधाकृष्ण मंगल कार्यालयात उत्साहात पार पडला. या मेळाव्यास ६० माजी विद्यार्थ्यी, तत्कालीन माजी शिक्षक उपस्थित होते. यावेळी शाळेतील जुन्या आठवणीने तसेच आपुलकी, प्रेम आणि उत्साहाने माजी विद्यार्थ्यी भारावून गेले होते.

नीरा येथील महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता १० वीच्या १९७५ सालातील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत जुन्या शालेय आठवणींना उजाळा देत रविवारी (दि.९) स्नेहमेळावा भरविला होता. विशेष म्हणजे ९ मार्च १९७५ रोजी दहावीचा पहिला पेपर होता याची आठवण माजी विद्यार्थ्यांना झाली. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. प्रथमतः ओळख परेड करण्यात आली. दहावीत असतानाची प्रकृती तसेच चेहरा पट्टीमध्ये झालेला बदल पाहता उपस्थित सर्वजण एकमेकांकडे आश्चर्यकारकरीत्या पाहात होते.

माजी विद्यार्थी तसेच सा.बां. विभागातील सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता रमेश आगवणे यांनी माळशिरस तालुक्यातील नातेपुते जवळ मांडवी नदीवर ३८ दिवसांत पुल बांधला याची लिम्का बुक मध्ये नोंद झाली. देशासह, परदेशातही सन्मान करण्यात आल्याचे सांगून शिक्षकांनी चांगले मार्गदर्शन केल्या मुळे इथपर्यंत पोहचल्याचे सांगितले.सुरेश नवले, राजन शहा, बाळासाहेब ननवरे, संभाजी आगवणे, धनंजय काकडे, नितीन शहा, संदेश हाके,अशोक शहा, उल्हास शहा यांच्यासह प्रत्येक माजी विद्यार्थी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत ५० वर्षांनी सर्वजण एकत्र भेटल्यामुळे आनंद द्विगुणीत झाल्याचे सांगत होते. ओळखीनंतर जिवलग मित्रांशी चर्चा, गप्पागोष्टी रंगत गेल्या. शेवटी प्रत्येकाने यापुढे एकमेकांशी संपर्क ठेवण्याचा निश्चय करून पुन्हा पुढच्या वर्षी सहकुटूंब भेटण्याचा संकल्प केला. या वेळी तत्कालीन शिक्षक शेळके सर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच दिवंगत झालेल्या शिक्षकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक रमेश आगवणे यांनी केले तर सुत्र संचालन तनुजा शहा यांनी केले, तर आभार नितीन शहा यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन रमेश आगवणे, संभाजी आगवणे यांनी केले.

कोणतं ऑलिव्ह ऑईल घ्यावं?

आहारतंत्र

ऑलिव्ह ऑईलच्या गुणधर्माबाबत आपण बरंच काही ऐकतो. या तेलात फॅट्सचं प्रमाण तुलनेने बरंच कमी असतं. त्यामुळे मधुमेही, हृदयासंबंधी तक्रारी असणाऱ्यांना ऑलिव्ह ऑईल वापरण्याचा सल्ला दिला जातो. बाजारात ऑलिव्ह ऑईलचे विविध प्रकार पहायला मिळतात. त्यापैकी एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह ऑईल अधिक आरोग्यदायी असतं. या तेलावर कमीत कमी प्रक्रिया केलेली असते. त्यामुळे या ऑलिव्ह ऑईलमधले पोषक घटक टिकून रहातात.

साध्या ऑलिव्ह ऑईलवर बरीच प्रक्रिया झालेली असते. या दरम्यान तेलातले पोषक घटक निघून जातात आणि त्याचा शरीराला काहीच लाभ होत नाही. एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह आईलमध्ये अँटी ऑक्सिडंट्सचं प्रमाण बरंच जास्त असतं. तसंच यात लाभदायी फॅट्सही असतात. यातल्या फेनॉलिक नामक घटकामुळे मधुमेहाला प्रतिबंध करणं शक्य होतं. तसंच मेंदूचं आरोग्यही सुधारतं.

रडणे ही फायद्याचे!

रडणे ही एक सामान्य बाब आहे. अनेकदा छोट्या छोट्या गोष्टींवरुन ट्रिगर होऊन लोकांना रडू येते. सामान्यपणे असे म्हणतात की, रडणे ही अतिशय भावुक बाब आहे; पण संशोधनात असे दिसून आले आहे, रडल्याने शरीर आणि मेंदू दोन्ही अतिशय हलके होतात. अगदी बाळाचा जन्म झाल्यावरही तो पहिला रडतो. बाळ रडल्याने त्याचे आरोग्य उत्तम राहिते.

रिफ्लेक्स अश्रू म्हणजे डोळ्यांमध्ये साचलेली धूळ, घाण आणि धूर स्वच्छ करणारे अश्रू. सतत वाहणारे अश्रू तुमचे डोळे ओले ठेवतात आणि त्यांना संसर्गापासून वाचवतात. भावनिक अश्रूंचेही अनेक फायदे आहेत. सततच्या अश्रूंमध्ये ९८ टक्के पाणी असते, तर भावनिक अश्रूंमध्ये ताण संप्रेरके आणि इतर विषारी पदार्थ असतात. संशोधकांना असे आढळून आले आहे, की अश्रू शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढतात.

अश्रूचे प्रकार

* रिफ्लेक्स अश्रू
* सतत अश्रू
* भावनिक अश्रू

रडल्याने स्वतःला शांत करण्यास मिळते मदत होते. रडणे हा कदाचित स्वतःला शांत करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. संशोधनात आढळून आले, की रडण्यामुळे पॅरा-सिम्पेथेटिक नर्व्हस सिस्टम (पीएनएस) सक्रिय होते. पीएनएस तुमच्या शरीराला आराम करण्यास आणि पचन करण्यास मदत करते. काही वेळ रडल्यानंतर शांत वाटू लागते.

आधार मिळतो

नैराश्य येत असेल, तर रडल्याने तुमच्या आजूबाजूच्या लोकांना कळते, की तुम्हाला आधाराची गरज आहे. लहान मूलही लक्ष वेधण्यासाठी रडते. असे केल्याने अनेकांना बरे वाटते. दुःखाचा सामना करण्यास मदत मिळते. दुःख करणे ही एक प्रक्रिया आहे. त्यात दुःख, सुन्नता आणि रागदेखील समाविष्ट आहे. शोक करताना रडणे महत्त्वाचे आहे. हे तुम्हाला या दुःखावर मात करण्यास मदत करते.

जाणून घ्या

त्रास कमी होतो

भावनिक वेदना कमी

दीर्घकाळ रडल्याने ऑक्सिटोसिन आणि एंडोर्फिन बाहेर पडतात. हे चांगले वाटणारे रसायने शारीरिक आणि भावनिक वेदना कमी करण्यास मदत करू शकतात. एकदा एंडोर्फिन बाहेर पडले, की शरीर थोडे सुन्न वाटू शकते. त्याच वेळी, ऑक्सिटोसिन तुम्हाला शांत वाटण्यास मदत करते.

मूड सुधारतो

रडण्यामुळे वेदना कमी होण्यास मदत होतेच; शिवाय मूडही सुधारतो. जेव्हा रडण्याच्या वेळी तुमच्या तोंडातून खूप हवा पटकन आत घेतो, त्यामुळे मेंदूचे तापमान कमी होते. जेव्हा तुमच्या मनाचे तापमान थंड असते, तेव्हा तुमच्या शरीरालाही बरे वाटते. यामुळे मूड सुधारतो.

भावना संतुलित

रडणे म्हणजे फक्त दुःखाला दिलेला प्रतिसाद नाही. कधीकधी तुम्ही खूप आनंदी, घाबरलेले किंवा तणावग्रस्त असतानाही रडता. येल विद्यापीठातील संशोधकांचा असा विश्वास आहे, की अशा प्रकारे रडल्याने भावनिक संतुलन पुनर्संचयित होण्यास मदत होते.

का वाढते काळजी?

आपल्यापैकी अनेकांना विविध चिंता, काळज्यांनी ग्रासलेलं असतं. सतत अस्वस्थता वाटत रहाते. सारखी काळजी करत रहाणं हा एक मनोविकार आहे. ही समस्या वाढायला अनेक बाबी कारणीभूत ठरतात. दैनंदिन आयुष्यातल्या सवयींमुळे मनाला शांतता लाभत नाही. चिंतेचं प्रमाण कमी करण्यासाठी या सवयी सोडणं गरजेचं आहे.

कमी रक्तदाबाची समस्या असणाऱ्यांना कॉफीमुळे बरं वाटतं. पण यामुळे चिंता, काळजीचं प्रमाण कमी होत नाही. कॉफीमुळे हृदय गती वाढते. काळजी वाटू लागल्यावर ही धडधड अधिकच तीव्र होते आणि आपल्याला अस्वस्थ तसंच निराश वाटू लागतं. त्यामुळे सतत काळजी करणाऱ्यांनी कॉफीचं सेवन टाळायला हवं.

आपण कुठे चुकतो?

अपुऱ्या झोपेमुळे काळजीत भर पडू शकते. त्यामुळे दररोज पुरेशी झोप घेणं गरजेचं आहे. अपुऱ्या झोपेमुळे हार्मोन्सचं संतुलन

बिघडतं आणि त्रास अधिकच वाढतो.

सतत स्मार्टफोन आणि सोशल मीडिया ॲप्स तपासत रहाण्याची सवय मारक ठरू शकते. यामुळे चिंतेत भरच पडते. चिंता, काळजी कमी करण्यासाठी वेळेत जेवणं गरजेचं आहे. कामाच्या नादात किंवा इतर कोणत्याही कारणामुळे जेवण टाळल्यामुळे शरीराचं संतुलन बिघडतं आणि आपल्याला अस्वस्थ वाटू लागतं.

तुळशीयुक्त दुधाचे लाभ

सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यात अनेकांवर ताण असतो. धावपळीमुळे थकवा येतो. काहीच करावंसं वाटत नाही. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याने सतत आजारपणं येत रहातात. हा त्रास कमी करण्यासाठी डॉक्टरांकडे धाव घेतली जाते. मात्र विविध औषधी घटकांनी समृद्ध तुळस अनेक विकारांवर रामबाण उपाय ठरू शकते. सर्दी-खोकला झाल्यावर आपण हळद

घातलेलं दूध पितो. त्याचप्रमाणे तुळस घातलेलं दूधही गुणकारी असतं. दुधासोबत घेतल्याने तुळशीचा प्रभाव अनेक पटींनी वाढतो. दररोज ग्लासभर तुळस घातलेलं दूध प्यायल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि अनेक विकारांना दूर ठेवता येतं

तुळस घातलेलं दूध अगदी सोप्या पद्धतीने बनवता येतं. यासाठी तुळशीची चार ते पाच पानं घ्या. एका भांड्यात पेलाभर दूध गरम करा. त्यात तुळशीची पानं घालून दोन मिनिटं उकळून घ्या. दूध थोडं थंड झाल्यावर पेल्यात गाळून घ्या. हे दूध रिकाम्या पोटी घेतल्याने अधिक लाभदायी ठरतं.

आयुर्वेद आणि विकार

तुळसयुक्त दुधामुळे हृदयाला बळकटी मिळते. तुळशीतल्या औषधी घटकांमुळे शरीराला ऑक्सिजनचा पुरवठा अधिक चांगल्या प्रकारे होतो तर दुधामुळे अनेक पोषक घटक हृदयापर्यंत पोहाचतात. तुळस आणि दुधामुळे श्वसनसंस्थेचं कार्यही सुरळीत सुरू रहातं. दिवसभराच्या धावपळीनंतर मेंदूला विश्रांतीची गरज असते. गरम तुळसयुक्त दुधामुळे मेंदू ताजतवाना होतो.

परिणाम ताणाचे

ताणामुळे तुमचं शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. ताण विविध प्रकारांनी आपल्या शरीराचा ताबा घेऊ लागतो. नव्या संशोधनानुसार अतिताणामुळे आपल्या भूकेवरही परिणाम होऊ लागतो. ताण माणसाची खाण्याची इच्छाच मारून टाकतो. त्यामुळे भूक लागत नसेल तर त्यामागे ताण हेही एक कारण असू शकतं.

ॲनॉरेक्सिया नर्व्होसा हा भूकेशी संबंधित विकार आहे. हा विकार जडल्यानंतर माणसाला भूक लागत नाही. खाण्याचं प्रमाण खूप कमी होतं. त्यातच काही ठराविक पदार्थ आणि तेही अगदी कमी प्रमाणात खाल्ले जातात. हा विकार जडलेल्या माणसांच्या मनात आपण स्थूल असल्याची भावना निर्माण होते. प्रत्यक्षात ही माणसं खूप बारीक असतात. ताण आणि भूक यांचा संबंध जोडण्यासाठी शास्त्रज्ञांनी उंदरांवर प्रयोग करून बघितला. माणूस आणि उंदीर यांच्या मज्जासंस्थेत बरंच साम्य असल्यामुळे यातून माणसांशी संबंधित निष्कर्ष काढायला मदत होणार आहे.

आव्हानात्मक किंवा कठीण प्रसंगाला शरीर ताणाच्या स्वरुपात प्रतिसाद देतं. ही परिस्थिती वास्तवात अस्तित्वात असू शकते किंवा माणसाच्या कल्पनाविलासामुळेही उद्भवलेली असू शकते. ताणामुळे हृदयाची गती वाढते. उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होऊ शकते. ताण आल्यावर श्वासांचा वेग वाढतो, स्नायू ताठर होतात.

मनारोग्य

प्रत्येकाची ताणाची व्याख्या वेगवेगळी असू शकते. एखाद्या परिस्थितीचा कोणाला खूप ताण येतो तर कोणासाठी ती सर्वसामान्य बाब असते. त्यामुळे ताणाचे परिणामही व्यक्तिनुसार बदलत जातात. ताणामुळे नैराश्य येऊ शकतं. वर्तणुकीत बदल होतो. शिवाय आपल्याला खूप अस्वस्थही वाटतं. ताणामुळे आपला मनावर ताबा रहात नाही. मनःशांती मिळत नाही. परिणामी आपला आत्मविश्वास कमी होऊ शकतो. एकटेपणा आणि नैराश्याची भावना वाढीस लागू शकते.

प्रचंड तणावग्रस्त असणारी व्यक्ती इतरांना टाळण्याचा प्रयत्न करते. ताणामुळे शरीरातलं बळ नष्ट झाल्यासारखं वाटतं. डोकेदुखीची समस्या निर्माण होते. खूप ताण आल्यावर पोटाच्या तक्रारी निर्माण होतात. जुलाब, उलटी, मळमळ, बद्धकोष्ठता अशा समस्या वाढीस लागतात. काही वेळा ताणामुळे छातीत दुखू शकतं. कान वाजणं, हातापायांना घाम येणं ही सुद्धा ताणाची लक्षणं मानली जातात.

नवसंशोधन

स्लीप ॲप्नियामुळे...

ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप ॲप्निया म्हणजे झोपेत अडथळे येणाऱ्या महिलांना कर्करोग होण्याची शक्यता पुरुषांच्या तुलनेत अधिक असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. युरोपियन रॅस्पिरॅटरी जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित करण्यात आलं आहे. हा विकार असणाऱ्या जवळपास २० हजार प्रौढ रुग्णांच्या आरोग्याची माहिती यासाठी तपासण्यात आली. या तपासणीतून शास्त्रज्ञांनी काही निष्कर्ष काढले आहेत. या पैकी दोन टक्के लोकांना कर्करोगाचं निदान झालं होतं. म्हणजेच स्लीप ॲप्नियामुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. तसंच स्थूलपणा हा स्लीप ॲप्निया आणि कर्करोग अशा दोन्ही विकारांना कारणीभूत ठरू शकतो, असा निष्कर्ष यातून निघत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. तसंच कर्करोगामुळे स्लीम ॲप्नियाचा धोका नसतो हेही समोर आल्याचं शास्त्रज्ञ सांगतात.

दंतारोग्य

कठीण कवचाची फळं खा

तोंडाचं आरोग्य जपण्यासाठी फक्त दोन वेळा दात घासण्यावर भर दिला जातो. मात्र एवढ्यावरच थांबून चालण्यासारखं नाही. दातांना अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी बरंच काही करावं लागतं. जबड्यांना व्यायाम मिळण्यासाठी कठीण कवचाची फळं खाण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. तसंच गाजर, काकडी तुकडे करून खाणं टाळावं. प्रक्रिया केलेले, मऊ पदार्थ कितीही चांगले वाटत असले तरी त्यांचा दातांना काहीच उपयोग होत नाही. पेरू, सफरचंद, पिअर अशी टणक फळं खायला हवीत. मुलांनाही अशी फळं खायला द्यावीत, असंही तज्ज्ञ सांगतात. आपल्या खाण्यापिण्याच्या सवयींवर दातांचं आरोग्य अवलंबून असतं. यामुळे गोड आणि आंबट पदार्थांचं सेवन मर्यादित प्रमाणातच करायला हवं.

डोळ्यांचं आरोग्य

मोतीबिंदू असेल तर...

मोतीबिंदू हा सर्वसामान्य असा नेत्रविकार आहे. शस्त्रक्रियेद्वारे मोतीबिंदू काढून टाकता येतो. पण अनेक जण थंडीमध्ये मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करायला प्राधान्य देतात. मात्र हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. त्यातच मोतीबिंदू फक्त शस्त्रक्रियेने बरा होऊ शकतो. हा विकार बरा करण्याचा दावा करणारी औषधं बाजारात मिळतात. पण या औषधांचा कोणताही लाभ होत नाही. दृष्टी वाढवणारी कोणतीही औषधं बाजारात उपलब्ध नसतात. त्यामुळे अशा भूलथापांना बळी पडता कामा नये. तज्ज्ञ डॉक्टरांकडूनच सल्ला घ्यायला हवा. तसंच वय वाढत असताना आपल्या डोळ्यांची तपासणी आपणच करायला हवी. एक डोळा बंद करून दुसऱ्या डोळ्याने दिसतं का, हे तपासून पहायला हवं.

आजीबाईंचा बटवा

गुणकारी सातूचं पीठ

सातूचं पीठ खूप गुणकारी असतं. ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे मधुमेही सातूचं पीठ खाऊ शकतात. यात लोह, मॅग्नेशियम आणि मँगनीजसारखे घटक असतात. यात सोडियमचं प्रमाणही बरंच कमी असल्यामुळे उच्च रक्तदाबाचे रुग्णही याचं सेवन करू शकतात. सातूच्या पिठामुळे पचनशक्ती सुधारते. यात विरघळणारे तंतूमय पदार्थ असतात. मसालेदार, तळकट पदार्थ खाल्ल्यानंतर शरीराच्या शुद्धिकरणासाठी सातूचं पीठ पाण्यात मिसळून ते पाणी पिता येईल. वजन कमी करायचं असेल तर सातूच्या पिठाचा आहारात समावेश करता येईल. यातल्या तंतूमय पदार्थांमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं रहातं. सातूच्या पिठात फॉलिक ॲसिड हा घटक असतो. महिलांना फॉलिक ॲसिडची खूप गरज असते. त्यातच लाल रक्तपेशींच्या निर्मितीतही फॉलिक ॲसिड महत्त्वाची भूमिका बजावतं.

ई-जीवनसत्त्वाअभावी हात, पाय बधिर

शरीराला योग्यरित्या कार्य करण्यासाठी सर्व जीवनसत्त्वे आणि खनिजे आवश्यक असतात. कोणत्याही जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. असे एक महत्त्वाचे जीवनसत्व म्हणजे 'व्हिटॅमिन ई'. 'व्हिटॅमिन ई' आरोग्यासाठी एक आवश्यक अँटिऑक्सिडेंट आहे. ते मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानीपासून पेशींचे संरक्षण करण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी आवश्यक आहे. हृदयामध्ये गुठळ्या तयार होण्यापासून रोखण्यासाठी 'व्हीटॅमिन ई' आवश्यक आहे.

* शरीरात 'व्हीटॅमिन ई'ची कमतरता असल्यास हात आणि पाय सुन्न होऊ शकतात. त्याची लक्षणे स्नायूंमध्ये कमजोरी, चालण्यात अडचण, डोळ्यांची समस्या, कमकुवत प्रतिकारशक्ती, वारंवार आजारी पडणे, आळस आणि थकवा येणे ही आहेत. १४ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या पुरुष आणि महिलांनी दररोज १५ मिलीग्राम 'व्हिटॅमिन ई' घेणे आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या महिलांना दररोज १९ मिलीग्राम 'व्हिटॅमिन ई' आवश्यक असते. 'व्हिटॅमिन ई'च्या कमतरतेवर मात करण्यासाठी दररोज बदाम खा. आपल्या आहारात मोहरीचा समावेश करा. गहू, सूर्यफूल, करडई आणि सोयाबीन तेल वापरा. पीनट बटर आणि शेंगदाणे खा. भाज्यांमध्ये बीट, कोलार्ड, हिरव्या भाज्या, पालक, भोपळा, लाल भोपळा, मिरची, शतावरी आणि फळांमध्ये आंबा आणि एवोकॅडो यांचा समावेश करा. यामुळे शरीरातील' व्हिटॅमिन ई'ची कमतरता पूर्ण होण्यास मदत होते. कुटुंबातील कोणाला 'व्हिटॅमिन ई'ची कमतरता असल्यास त्याचा धोका असू शकतो. त्यामुळे तीव्र स्वादुपिंडाचा दाह, सेलिआक रोग, कोलेस्टॅटिक यकृत रोग आणि सिस्टिक फायब्रोसिसदेखील हे होऊ शकते.

स्त्री-पुरुषाशिवायही जन्माला येऊ शकते मूल

निसर्गाचा नियमच आहे, की कोणत्याही पुरुष किंवा स्त्रीशिवाय मूल जन्माला येऊ शकतच नाही; मात्र तुम्हाला असे सांगण्यात आले, की या दोघांशिवाय मुल जन्माला येऊ शकते तर कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही. परंतु आता ते शक्य आहे. कारण शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे, की पुढील दहा वर्षांमध्ये स्त्री आणि पुरुषांशिवाय मुल जन्माला येऊ शकते; मात्र ते पूर्णपणे सुरक्षित आणि प्रभावी सिद्ध करण्यासाठी अजून संशोधन आणि चाचणी आवश्यक आहे.

आरोग्य वेध

ब्रिटनच्या 'ह्युमन फर्टिलायझेशन अँड एम्ब्रियोलॉजी अथॉरिटी'ने (एचएफईए) एक अभूतपूर्व खुलासा केला. त्यामुळे जगाला धक्का बसला आहे. हे एखाद्या सायन्स फिक्शन चित्रपटातील कथेसारखे वाटत असले, तरी विज्ञान ते प्रत्यक्षात आणण्याच्या मार्गावर आहे.

अंडी व शुक्राणूचे तंत्रज्ञान

ब्रिटनच्या 'ह्युमन फर्टिलायझेशन अँड एम्ब्रियोलॉजी अथॉरिटी'ने (एचएफईए) च्या म्हणण्यानुसार, शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत अंडी आणि शुक्राणू वाढवण्याचे तंत्रज्ञान प्रत्यक्षात आणण्याच्या अगदी जवळ आले आहेत. 'इन विट्रो गेमेटस्' (आयव्हीजी) म्हणून ओळखले जाणारे हे तंत्रज्ञान भविष्यात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकते.

काय आहे हे 'आयव्हीजी' तंत्रज्ञान?

'आयव्हीजी' तंत्रज्ञानामध्ये प्रयोगशाळेत मानवी अंडी आणि शुक्राणू तयार करण्यासाठी अनुवांशिकरित्या त्वचा किंवा स्टेम पेशींचे पुनर्प्रोग्रामिंग केले जा. 'एचएफईए'चे 'सीईओ' पीटर थॉम्पसन यांनी एका मीडिया स्टेटमेंटमध्ये या तंत्रज्ञानाच्या मदतीने मानवी मूल निर्माण करण्याकरिता एक क्रांतिकारी पाऊल असल्याचे सांगितले आहे. ते म्हणाले, की या तंत्रज्ञानामुळे मानवी अंडी आणि शुक्राणूंची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढू शकते.

अनेक लोकांसाठी वरदान ठरणार?

शास्त्रज्ञांच्या मते, हे तंत्रज्ञान यशस्वी झाले, यासोबतच ते सुरक्षित, प्रभावी आणि सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह झाले, तर ते अनेक लोकांसाठी वरदान ठरू शकते. विविध कारणांमुळे मूल होऊ शकत नाही, अशा जोडप्यांना हे मदत करू शकते. शिवाय, समलिंगी जोडप्यांचे जैविक मूल जन्माला घालण्याचे स्वप्न पूर्ण करू शकते.

'आयव्हीजी'तंत्रज्ञानाचे तोटे

शास्त्रज्ञांच्या मते, या अभूतपूर्व वैद्यकीय पद्धतीमुळे अनेक नैतिक जोखमींचा धोकाही निर्माण होऊ शकतो. आत्तापर्यंतच्या संशोधनातून असे समोर आले आहे, की या नवीन तंत्रज्ञानाला बाळंतपणाशी संबंधित कायद्यांमध्ये मान्यता नाही. हे नवीन तंत्रज्ञान आल्यास नियमांमध्ये बदल करण्याची गरज भासणार आहे. याशिवाय या प्रक्रियेमुळे समाजातील कुटुंबाची पारंपरिक संकल्पना बदलणार का? असा प्रश्न उपस्थित होतो. यामुळे अनुवांशिक विकारांचा धोकादेखील वाढू शकतो. कारण प्रत्येकामध्ये काही दोषपूर्ण गुणसूत्रे असतात. साधारणपणे, यामुळे समस्या उद्भवत नाहीत, कारण आई आणि वडिलांकडून आपल्याला प्रत्येक गुणसूत्रांच्या दोन प्रती वारशाने मिळतात. 'सोलो पेरेंटिंग'मध्ये, दोन्ही प्रती एकाच व्यक्तीकडून येतात. त्यामुळे अनुवांशिक आजाराच्या समस्या अधिक संभवतात.

"जेव्हा तो आणि इतर मोठे खेळाडू संघ सोडतील तेव्हा त्यांना खात्री होईल की भारतीय संघ सुरक्षित हातात आहे. तो म्हणाला की ते खूप छान झाले आहे, आम्हाला ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर परत यायचे होते. तरुणांसोबत खेळणे खूप छान होते. ते पुढे जात आहेत आणि भारताला योग्य दिशेने घेऊन जात आहेत. इतक्या मुलांनी इतक्या प्रभावी खेळी केल्या आहेत आणि इतकी चांगली गोलंदाजी केली आहे की, आमच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच हा विजय शक्य झाला आहे. मी या मुलांशी बोलण्याचा प्रयत्न करतो, माझे अनुभव शेअर करण्याचा प्रयत्न करतो, त्यांना सांगतो की मी इतके दिवस कसे खेळलो. जेव्हा आपण क्रिकेट सोडतो तेव्हा तुम्हाला चांगल्या स्थितीत जायचे असते. गिल, श्रेयस, राहुल या सर्वांनीच अशा प्रभावी खेळी केल्या आहेत. संघ चांगल्या हातात आहे.

— विराट कोहली

ठाणेची उपांत्य फेरीत धडक

अन्वीच्या गोलच्या जोरावर पुण्याची नाशिकवर मात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : रविवारी नेहरूनगर-पिंपरी येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर सुरू असलेल्या अस्मिता हॉकी स्टेट लीगच्या तिसऱ्या दिवशी रविवारी ठाणे संघाने पुणे, नागपूर आणि यवतमाळ यांच्यासोबत उपांत्य फेरी गाठली.

सायंकाळच्या सामन्यांत, अ गटात ठाणे आणि मुंबई उपनगर यांच्यातील लढत गोलशून्य बरोबरीत सुटली. ज्यामुळे दोन्ही संघांचे ४ गुण (३ सामने) राहिले. तथापि, चांगल्या गोल फरकामुळे ठाण्याला पराभव पत्करावा लागला. ठाण्याचा +७ गोल फरक होता, तर मुंबई उपनगरचा +४ गोल फरक होता. अशाप्रकारे ठाण्याने अ गटामध्ये पुण्याच्या मागे दुसरे स्थान पटकावले. दरम्यान, पुण्याने नाशिकला १०-० असे हरवून अ गटामध्ये सलग तिसरा विजय नोंदवला. स्पर्धेच्या गटवार साखळीत अपराजित राहिलेला पुणे (९ गुण; ३ सामने) हा एकमेव संघ होता. सहा गोल करणारी अन्वी रावत (६', १४', १९', २३', २६', २७') पुण्याच्या विजयाची शिल्पकार ठरली. तिला अर्पिता कोंजरे (७'), पर्णवी कानसे (१२' आणि ५२') आणि स्वानंदी कदम (५१') यांची चांगली साथ लाभली.

सकाळच्या सत्रात, रायगडने सांगलीचा ३-० असा पराभव करून ब गटामध्ये पहिला विजय मिळवला, सांगलीचा हा तिसरा पराभव होता . त्यांनी रायगडच्या मागे गटात शेवटचे स्थान पटकावले. रायगडसाठी अलिना अन्सारी (२८'), सई मुळे (३८') आणि पर्णवी खरगे (५८') यांनी गोल केले.

ब गटामधील दुसऱ्या सामन्यात, नागपूरने यवतमाळचा ४-१ असा पराभव करून सलग तीन वेळा उपांत्य फेरी गाठली. पहिल्या सत्रात समृद्धी बर्वेने (१४') संघाला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रात समृद्धी (५९' - पीसी), श्रावणी तुळणकर (५४' - पीसी) आणि भार्गवी उरकुडकरने (३८'; - पीसी) तीन पेनल्टी कॉर्नरवर गोल केले. यवतमाळकडून यथार्थी मांगेकरने (३५') एकमेव गोल मागे केला.

हॅरी ब्रूकची आयपीएलमधून माघार; २ वर्षांच्या बंदीची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : इंडियन प्रीमियर लीग २०२५पूर्वी दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा युवा खेळाडू हॅरी ब्रूकने सलग दुसऱ्या सत्रात न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, त्याला जगातील सर्वात लोकप्रिय फ्रँचायझी लीगमधून दोन वर्षांच्या बंदीला सामोरे जावे लागू शकते. मात्र, याबाबत आयपीएलकडून कोणतेही वक्तव्य आलेले नाही.

नोव्हेंबरमध्ये झालेल्या मेगा लिलावात ब्रूकला दिल्ली कॅपिटल्सने ६.२५ कोटी रुपयांना संघात सामील केले होते. ब्रूकने राष्ट्रीय संघाच्या त्याच्या वचनबद्धतेचे कारण सांगत त्याने हा निर्णय घेतल्याचे सांगितले. चॅम्पियन्स ट्रॉफीमधील गट टप्प्यातून बाहेर पडल्यानंतर जोस बटलरने इंग्लंडचा पांढऱ्या चेंडूचा कर्णधार म्हणून राजीनामा दिला. त्याची जागा घेण्यासाठी ब्रूक हा प्रबळ दावेदार मानला जात आहे. तिन्ही फॉरमॅटसाठी त्याचा इंग्लंड क्रिकेट बोर्डाबरोबरचा केंद्रीय करार सध्या १८ महिन्यांसाठी आहे, त्यामुळे वर्कलोड मॅनेजमेंट हे त्याने एक माघार घेण्याचे कारण ठरू शकते.

हॅरी ब्रूक म्हणाला, "मी आगामी आयपीएलमधून बाहेर पडण्याचा खूप कठीण निर्णय घेतला आहे. मी दिल्ली कॅपिटल्स आणि त्यांच्या चाहत्यांची माफी मागतो. मला क्रिकेट खूप आवडते. मी लहान असल्यापासून माझ्या देशासाठी खेळण्याचे स्वप्न पाहत होतो आणि या स्तरावर माझा आवडता खेळ खेळण्याची संधी मिळाल्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. आता आयपीएलच्या आयोजकांनी नवी नियमावली जाहीर केली आहे. या नियमांच्या आधारे हॅरी ब्रूकवर २ वर्षांची बंदी घातली जाण्याची शक्यता आहे. २०२५ च्या मेगा लिलावापूर्वीच आयपीएलने हा नियम जारी केला होता की लिलावात सोल्ड झालेल्या एखाद्या खेळाडूने लीगमधून आपले नाव मागे घेतले तर त्याला २ वर्षांच्या बंदीला सामोरे जावे लागेल.

टेनिसपटू ऋतुजा भोसले यांचा ग्रेस अँड पॉवर पुरस्काराने सन्मान

पुणे : प्रसिद्ध टेनिसपटू ऋतुजा भोसले याचं ग्रेस अँड पॉवर पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत श्री बालाजी विद्यापीठ, पुणेच्या ताथवडे कँम्पसमधील सभागृहात संपन्न झालेल्या एका कार्यक्रमात प्रसिद्ध कथक गुरु व संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या शमा भाटे यांच्या हस्ते ऋतुजा भोसले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह व दहा हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी एसबीपीयुचे कुलगुरू डॉ. गंगाधर शिरुडे, कुलसचिव डॉ. एस. बी. आगसे, स्कूल ऑफ लिबरल आर्टसच्या प्राचार्या डॉ. प्रीती जोशी, डॉ. अर्चना श्रीवास्तव, विनिता देशमुख, डॉ प्रचीती पुंडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलतांना ऋतुजा भोसले म्हणल्या की क्रीडा क्षेत्रातील माझी कारकीर्द घडवण्यात माझ्या आईचे खूप मोठे योगदान आहे. ती कायमच भक्कमपणे माझ्या पाठीशी उभी राहिली. माझ्या सोबत प्रत्येक सामनाच्या ठिकाणी उपस्थित राहून माझा उत्साह वाढवण्यासाठी ती कायमच प्रयत्न करत असते. क्रीडा क्षेत्रातील व्यस्त वेळापत्रकामुळे मला महाविद्यालयीन जीवनाचा आनंद घेता आला नाही याची थोडी खंत वाटते असे भोसले यावेळी म्हणाल्या.

नोवाक जोकोविचला पराभवाचा धक्का; झँडस्कल्पकडून हार

नवी दिल्ली : ऑलिंपिक पदक विजेता नोवाक जोकोविच याला इंडियन वेल्स ओपन या टेनिस स्पर्धेमध्ये दुसऱ्या फेरीत पराभवाचा धक्का बसला. नेदरलँड्सच्या बोटिक झँडस्कल्प याने नोवाक जोकोविचचे कडवे आव्हान तीन सेटमध्ये परतवून लावत धक्कादायक निकालाची नोंद केली. नोवाक जोकोविचला पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली होती, मात्र दुसऱ्या फेरीतही त्याला मोठे यश मिळवता आले नाही. बोटिक झँडस्कल्प याने नोवाक जोकोविच याच्यावर ६-२, ३-६, ६-१ असा तीन सेटमध्ये विजय साकारला. बोटिक झँडस्कल्प याने पहिला सेट ६-२ असा जिंकत आघाडी मिळवली. त्यानंतर नोवाक जोकोविच याने पुढील सेटमध्ये ६-३ असे पुनरागमन केले, मात्र बोटिक झँडस्कल्प याने तिसऱ्या सेटमध्ये दबावाखाली खेळ उंचावला व ६-१ अशी बाजी मारली. नोवाक जोकोविच याने पॅरिस ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक पटकावले होते. त्यानंतर मात्र त्याला जेतेपदापासून दूरच रहावे लागत आहे. यादरम्यान त्याला दुखापतीचा सामनाही करावा लागला. बोटिक झँडस्कल्प याच्याविरुद्धच्या लढतीत नोवाक जोकोविच याने सुमार खेळ केला. याआधी त्याने पाच वेळा ही स्पर्धा जिंकण्याची किमया करून दाखवली होती. बोटिक झँडस्कल्प याला इंडियन वेल्स ओपन स्पर्धेच्या पात्रता फेरीत पराभवाचा सामना करावा लागला होता, पण ज्या खेळाडूने या स्पर्धेची पात्रता मिळवली होती. त्याने माघार घेतल्यामुळे बोटिक झँडस्कल्प याला मुख्य स्पर्धेत स्थान मिळवता आले.

दिल तो बच्चा है जी!

सुनील गावस्कर भारताच्या विजयानंतर दिसले नाचताना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

दुबई : टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे विजेतेपद पटकावले आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने ९ महिन्यांत दुसरी ट्रॉफी जिंकली आहे. रोहितच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने १२ वर्षांनंतर पुन्हा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी ९ मार्चला खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने उत्कृष्ट गोलंदाजी आणि कर्णधार रोहित शर्माच्या दमदार खेळीच्या जोरावर न्यूझीलंडचा ४ गडी राखून पराभव केला. विजयानंतरचा सुनील गावस्करांचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.

विजयानंतर आधी दोन्ही संघांना म्हणजेच उपविजेत्या न्यूझीलंडला मेडल देण्यात आले. त्यानंतर जेतेपद पटकावलेल्या भारतीय संघाला पांढरे जॅकेट देण्यात आले. यानंतर कर्णधार रोहित शर्मा भारतीय संघाच्या वतीने ट्रॉफी स्वीकारण्यासाठी गेला आणि संपूर्ण संघ सहभागी झाला. भारतीय संघ एकिकडे ट्रॉफी स्वीकारत जल्लोष करत होता. तर दुसरीकडे सामन्यानंतरच्या प्रेझेंटेशनसाठी उपस्थित असलेले सुनील गावस्कर लहान मुलांसारखे नाचताना दिसले. सुनील गावस्करांचा हा व्हीडिओ स्टार स्पोर्ट्सने शेअर केला आहे. या व्हीडिओमध्ये सुनील गावस्कर यांच्याबरोबर अँकर मयंती लँगर आणि भारताचा माजी खेळाडू रॉबिन उथप्पादेखील उपस्थित होते.

गिरिप्रेमी ॲडव्हेंचर फाऊंडेशनतर्फे महिला दिनानिमित्त शिवनेरी किल्ला व नाणेघाट ट्रेक यशस्वी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : गिरिप्रेमी ॲडव्हेंचर फाऊंडेशनतर्फे ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन विशेष शिवनेरी किल्ला आणि नाणेघाट ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि १०० हून अधिक महिलांनी यात सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, स. प. महाविद्यालयातील १० अंध विद्यार्थिनींनीही या ट्रेकमध्ये सहभागी होऊन त्याला एक अनोखे आणि प्रेरणादायक वळण दिले.

ट्रेकला पुण्यातून प्रारंभ करून महिलांनी प्रथम शिवनेरी किल्ल्याला भेट दिली. किल्ल्यावर शिवाई देवीचे दर्शन घेऊन ट्रेकला सुरुवात केली. सर्व सहभागी महिलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळाला वंदन करत एकजुटीने पोवाडे गायले. या कार्यक्रमाने ऐतिहासिक महत्त्व असलेल्या शिवाई देवीच्या स्थानाचा आणि राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांचे नामकरण करत घेतलेल्या नवसाचे महत्त्व अधिक उजागर केले.

यावेळी, जुन्नर येथील महिला स्वयंसेवकांनी गडाची संपूर्ण माहिती उपस्थित महिलांना दिली. गड भेटीच्या नंतर सर्व महिलांनी जुन्नर येथील आदिवासी वसतिगृहाला भेट दिली. वसतिगृहातील विद्यार्थिनींनी लेझीम नृत्य सादर करून महिलांचे स्वागत केले. तसेच, गिरिप्रेमी आणि स्वरूपसेवा संस्थेच्या माध्यमातून या वसतिगृहाला वॉटर प्युरिफायर भेट देण्याचा संकल्प करण्यात आला.

दुपारचे जेवण झाल्यानंतर महिलांनी नाणेघाटला भेट दिली, जिथे नाणेघाटाच्या ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्त्वाबद्दल माहिती देण्यात आली. नाणेघाट गुहांमधील ब्राह्मी लिपीतील पुरातन शिलालेख, सातवाहन राजाचे नाव, तसेच नागनिकेच्या दानाबद्दल माहिती देण्यात आली. ट्रेकच्या शेवटी, नयनरम्य सूर्यास्ताचे दृश्य पाहून महिलांनी चहाचा आस्वाद घेत ट्रेकचा समारोप केला. या विशेष ट्रेकच्या यशस्वितेसाठी गिरिप्रेमी संस्थेच्या महिला गिर्यारोहकांनी व जुन्नर येथील इतिहास अभ्यासकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. इतिहास, निसर्ग आणि सामाजिक जाणिवेचा संगम घडवून हा ट्रेक महिलांसाठी एक प्रेरणादायक अनुभव ठरला.

कैवल्य जाधव, समर, सतीश कराड, पिनाक यांची आगेकूच

पुणे : पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने व आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) यांच्या सहकार्याने आयोजित पीवायसी मोतीलाल ओसवाल खुल्या स्नूकर स्पर्धेत कैवल्य जाधव, समर खंडेलवाल, सतीश कराड, पिनाक अनप यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली. पीवायसी हिंदू जिमखाना, आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत बाद फेरीत समर खंडेलवालने जयंत सजगुरेचा ३-०(५७-१४, ६१-४६, ६७-३३) असा तर, पिनाक अनप याने सलील देशपांडेचा ३-०(७१(६८)-२६, ६०-१५, ६४-२७) असा एकतर्फी पराभव केला. संघर्षपूर्ण लढतीत कैवल्य जाधवने अभिजीत रानडेचा ३-२(०९-८६, ७० (५६)-३२, ७३-३६, ५८-७४, ६२-२५) असा पराभव केला. कैवल्य याने आपल्या खेळीत दुसऱ्या फ्रेममध्ये ५६ गुणांचा ब्रेक नोंदवला. तन्मय जातकर याने निशाद चौघुलेचा ३-२(५३-६२, ६३-५५, ७१-६६, ५७-६६, ७१-३३) असा पराभव केला. सतीश कराड याने सूरज परमानेला ३-०(४६-३४, ४६-२८, ७९-३२) असे पराभुत केले.

फ्रेंडशिप करंडक में रंगारी रॉयल्स्, समर्थ चॅलेंजर, शिवमुद्रा ब्लास्टर्स, रमणबाग फायटर्स उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : चौथ्या 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत रंगारी रॉयल्स्, समर्थ चॅलेंजर, शिवमुद्रा ब्लास्टर्स आणि रमणबाग फायटर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

सहकारनगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूल येथील मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मॅक परदेशी याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे समर्थ चॅलेंजर संघाने नुमवी स्टॅलियन्स्चा ५७ धावांनी पराभव केला. मॅक परदेशी याने ६० धावा आणि सागर इंदुलकर याने केलेल्या ५७ धावांच्या जोरावर समर्थ चॅलेंजर संघाने १५१ धावांचे लक्ष्य उभे केले. या आव्हानाला उत्तर देताना नुमवी स्टॅलियन्स्चा डाव ९४ धावांवर मर्यादित राहीला. सत्यजीत पाले याने केलेल्या अष्टपैलु खेळीच्या जोरावर रमणबाग फायटर्सने नादब्रह्म सर्ववादक संघाचा २६ धावांनी पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करताना रमणबाग फायटर्सने १०८ धावांचे आव्हान उभे केले. याला उत्तर देताना नादब्रह्म सर्ववादक संघाचा डाव ८२ धावांवर रोखण्यात आला.

कैलास व्यास याने केलेल्या ५२ धावांच्या आणि गोलंदाजांच्या अचूक कामगिरीमुळे रंगारी रॉयल्स् संघाने महालक्ष्मी मॅव्हरीक्स्चा ६२ धावांनी सहज पराभव करून अंतिम चार संघांमध्ये आपले स्थान निश्चित केले. पहिल्यांदा फलंदाजी करताना कैलास व्यास याने केलेल्या ५२ धावांमुळे रंगारी रॉयल्स् संघाने १२६ धावांचे लक्ष्य उभे केले. या आव्हानाला उत्तर देताना महालक्ष्मी मॅव्हरीक्स्चा डाव ६४ धावांवर मर्यादित राहीला.

मुंबई सहावं आयपीएल विजेतेपद का जिंकू शकतात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : येत्या २२ मार्चपासून आयपीएलची रंगत अनुभवायला मिळणार आहे. या स्पर्धेसाठी मुंबई इंडियन्सचा संघ सज्ज झाला आहे. याच पार्श्वभूमीवर या संघातील प्रमुख खेळाडू सूर्यकुमार यादव याने आपले मत व्यक्त करताना म्हटले की, हे वर्ष विषम संख्येचे (२०२५) असणार आहे. मुंबई इंडियन्सने पाच पैकी चार विजेतेपद विषम संख्या असलेल्या वर्षी जिंकली आहेत. त्यामुळे यंदाही मुंबई इंडियन्सकडून अपेक्षा असणार आहे. मुंबई इंडियन्सचा संघ कात टाकेल.

मुंबई इंडियन्सच्या संघाने २०१३, २०१५, २०१७ व २०१९ या विषम संख्या असलेल्या वर्षी आयपीएल विजेतेपदाला गवसणी घातली आहे. मुंबई इंडियन्स संघाने सम संख्या असलेल्या वर्षी एक वेळा चॅम्पियन होण्याचा मान संपादन केला आहे. हे वर्ष २०२० होते. सूर्यकुमार यादव पुढे म्हणाला, आमच्या संघातील काही खेळाडू सरावासाठी पोहोचले आहेत. मला वाटते यंदाचे वर्ष स्पेशल असणार आहे.

मॅथ्यू वेड सहाय्यक प्रशिक्षक म्हणून आयपीएलमध्ये परतला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : ऑस्ट्रेलियाचा माजी यष्टीरक्षक-फलंदाज मॅथ्यू वेड आयपीएलमध्ये सहाय्यक प्रशिक्षक म्हणून पुनरागमन करणार आहे. वेड आयपीएल २०२५ साठी गुजरात टायटन्सच्या कोचिंग स्टाफमध्ये सामील झाला. वेडने रविवारी ही माहिती दिली. तो 3 वर्षांनी आयपीएलमध्ये सामील होणार आहे. एक खेळाडू म्हणून, मॅथ्यू वेड २०२२ मध्ये आयपीएल चॅम्पियन बनलेल्या गुजरात संघाचा देखील एक भाग होता.

मॅथ्यू वेडने २०२२ आणि २०२४ मध्ये गुजरात टायटन्सकडून १२ आयपीएल सामने खेळले. ज्यामध्ये त्याने एकूण १६१ धावा केल्या. वेड ऑक्टोबर २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होईल. त्यानंतर लवकरच, तो पाकिस्तानविरुद्धच्या टी-२०साठी आंद्रे बोरोव्हॅकसोबत ऑस्ट्रेलियाच्या प्रशिक्षकपदाचा भाग बनला. कोचिंग स्टाफमध्ये आशिष नेहरा आणि मॅथ्यू वेड हे मुख्य प्रशिक्षक आहेत. तर पार्थिव पटेल संघाचा फलंदाजी प्रशिक्षक असेल. आशिष कपूर आणि नरेंद्र नेगी हे देखील सहाय्यक प्रशिक्षक म्हणून संघाचा भाग आहेत.

अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १२ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

स्वराज, अबीर, रिदीत, प्रांशूल यांचा मुख्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १२ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत स्वराज भोसले, अबीर सुखानी, रिदीत नवले, प्रांशूल पुजारी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून मुख्य फेरीत प्रवेश केला.

एनसीएल टेनिस सेंटर, पाषाण येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत मुलांच्या गटात सहाव्या मानांकित स्वराज भोसलेने दहाव्या मानांकित अभिमन्यू चव्हाणचा ६-२, ६-२ असा सहज पराभव केला. बिगर मानांकित प्रांशूल पुजारी हीने सातव्या मानांकित ऋग्वेद माळसेचा ६-३, ६-१ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. अबीर सुखानीने राजदीप नगरकरचा ६-२, ३-६, १०-६ असा संघर्षपूर्ण पराभव केला. चौथ्या मानांकित रिदित नवलेने चौदाव्या मानांकित रयान जॉर्जचे आव्हान ४-६, ६-३, १०-६ असे मोडीत काढले. पाचव्या मानांकित वीर गायकवाडने नवव्या मानांकित अर्जुन मूर्तीचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. मुलींच्या गटात अव्वल मानांकित मायरा शेखने ऋषिता बालकृष्णाचा ६-०, ६-० असा एकतर्फी पराभव केला. प्रग्या जैनने अवनी पराजेचा ७-५, ६-१ असा पराभव मुख्य फेरी गाठली.